म. ग्रं. सं. ठाणें
विषय वाङ्मय
सं. क्र. 22७2

REFBK-0020720

# तृषार्त

गणेश चौधरी

REFBK-0020720

REFBK-0020720

प्रकाशक :
श्री. वासुदेव जिवाजी महाजन
२८/१ जळगाव हाऊसिंग सोसायटी
जिल्हापेठ, जळगाव

पहिली आवृत्ती :
२० फेब्रुवारी १९७४
(महाशिवरात्र – १८९५)

© श्री. वासुदेव जिवाजी महाजन
जळगाव

किंमत दहा रुपये


मुखपृष्ठ :
श्री. भाऊ समर्थ, नागपूर

मुखपृष्ठ छपाई :
'केसरी' मुद्रणालय, पुणे

मुद्रण व मांडणी :
श्री. वि. गंधे
एम्. ए., डी. पी. एड्., डी. जे.
प्रदीप मुद्रणालय
'यशःश्री', उत्तर अंबाझरी मार्ग,
नागपूर १०

कै. चि. तुषार तुला
आणि तुम्हालाच .. ....

....वृथा माझ्या मनात डोकावून पाहू नको
व्यथा माझ्या अंतरीची जाणूनि घेऊ नको
नाही सोसणार तुला व्यथा माझ्या अंतरीची
उगाच का धडपड हिमालय पेलण्याची....?



ग्रंथालय ... अनुक्रम ... 

# तृषार्ताचा साक्षी

गेल्या पन्नास वर्षांत मी अनेक लहान थोर कवींच्या काव्यसंग्रहांना प्रस्तावना लिहिल्या. पण, आज ज्या या कवीच्या काव्यसंग्रहाला मी प्रस्तावना लिहित आहे, ते कवि श्री. गणेश चौधरी आणि त्यांचा काव्यसंग्रह 'तृषार्त' हे दोन्हीहि असामान्य कोटीतील आहेत. कारण, कवि आहे मनोरुग्ण आणि 'तृषार्त' हे आहे त्यांचे मनोगत !

अशा या असामान्य कवीला पहाण्याचा योग, ता. २२ नोव्हेंबर १९७३ रोजी दुपारी चार वाजता, अचानक आला. नागपूरचे विख्यात कार्यकर्ते श्री. मामासाहेब गंधे हे आपल्याबरोबर येथील मनोरुग्णालयातील वरिष्ठ अवेक्षक श्री. ग. म. लेंभे, त्यांचे सहकारी श्री. वायंगणकर आणि खुद्द कवि श्री. गणेश चौधरी यांना बरोबर घेऊन, त्या दिवशी माझ्याकडे आले. माझी प्रकृति बरी नव्हती. शिवाय, वयोमानानुसार बहिरेपणा आलेला असल्यामुळे, काव्यवाचन किंवा काव्यगायन ऐकण्याच्या स्थितीतहि आता मी राहिलेलो नाही. तरी देखील, त्या दिवशी श्री. चौधरी यांना पाहिल्यावर,– माझ्या मनात एकदम काय आले कोण जाणे ! – श्री. मामासाहेबांनी केलेली त्यांच्या कविता ऐकण्याची विनंति मी तत्काळ मान्य केली. त्याबरोबर, श्री. चौधरी यांनी आपल्या 'अश्रु', 'गुन्हेगार' आणि 'वेड' अशा तीन कविता मला म्हणून दाखवल्या. त्या म्हणत असताना त्यांच्या अंगात संचरलेला जोश, त्यांचे डोळे, ओठ आणि नाकपुड्या यांचे होणारे स्पंदन व मधून मधून झपाटल्यासारखे होऊन ते करीत असलेले हातवारे यांनी माझे लक्ष वेधून घेतले आणि माझ्या मनात विलक्षण सहकंपा त्यांच्याविषयी उत्पन्न झाली. त्या भरात मी या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचे कबूल केले.

त्यानंतर, गणराज्य दिनाच्या महोत्सवाच्या दिवशी, ता. २६ जानेवारी १९७४ रोजी सकाळी दहाच्या सुमारास, श्री. चौधरी यांना पुन्हा पहाण्याची आणि ऐकण्याची संधी मला मिळाली. मनोरुग्णालयाचे अधीक्षक, डॉ. य. वा. केळकर आणि त्यांच्या पत्नी सौ. सुधाबाई यांच्या मजविषयीच्या अकारण

स्नेहभावामुळे, त्या रुग्णालयाच्या 'मनोगत' या मुद्रित वर्षारंभ विशेषांकाचे प्रकाशन माझ्या हातून व्हावयाचे होते. त्या समारंभात 'मनोगता'विषयीचे संपादकीय निवेदन श्री. चौधरी यांनी ज्या वेळी वाचून दाखविले, त्या वेळी त्यांच्या व्यक्तित्वाचा आणखी एक अगदी निराळा असा आविष्कार माझ्या दृष्टीस पडला. तोहि इतका परिणामकारक की, ते जेव्हा वाचता वाचता आपल्या डोळ्यांत आलेले पाणी हातांनी झटकून टाकीत, तेव्हा माझ्याहि डोळ्यांत पाणी तरारत असे. इतका त्यांच्या मनोवेदनांशी त्या वेळी मी समरस होऊन गेलो होतो. माझा दैवयोग असा विचित्र की, फार वर्षांपूर्वी खानदेशातील तत्कालीन तरुण प्रमुख कवि प्रो. श्रीराम अत्तरदे यांना, अगदी याच प्रकारच्या रुग्णावस्थेत, घेऊन त्यांच्या दुःखीकष्टी पत्नी माझ्याकडे आलेल्या होत्या. त्यांना सल्ला आणि त्याहिपेक्षा सहानुभूति हवी होती. म्हणून, मी त्यांना समजावून घ्यावे आणि त्यांच्या कविता ऐकाव्यात, अशी विनंति त्यांच्या पत्नीने मला केली. सौ. शांताबाईने ती विनंति तत्काळ मान्य केली. तिने प्रथम त्या दोघांना गरम कॉफी घ्यावयाला लावले; व नंतर कविता म्हणण्याची त्यांना विनंती केली. तदनुसार प्रो. अत्तरदे यांनी आपल्या तीन चार कविता आम्हाला म्हणून दाखविल्या. अगदी तशाच प्रकारचे व्यक्तित्व आणि त्याच प्रकारचा योग, त्याच खानदेशात जन्मलेले डांभूर्णी येथील कवि–शिक्षक श्री. गणेश चौधरी यांच्याहि बाबतीत इतक्या वर्षांनी यावा, या घटनेचे मला आश्चर्य वाटले.

अर्थात् श्री. चौधरी यांच्या या कविता मी अतिशय जिव्हाळ्याने वाचल्या. त्या मला आवडल्या, असे म्हणण्यात काही फारसा अर्थ नाही. कारण, श्री. भाऊसाहेब समर्थ, श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्यासारख्या नागपुरातील दर्दी रसिकांनी त्या कवितांची प्रशंसा केलेली असून, आकाशवाणी वरूनहि त्या विदर्भातील जनतेला श्री. दारव्हेकर यांनी मोठ्या कळकळीने ऐकवलेल्या आहेत. तेव्हा, ज्या कवीच्या कवितांविषयी इतके अगत्य आणि आपुलकी माझ्या अनेक सुहृदांनी दाखवलेली आहे, त्याच्या कविता वाचून माझे मन हलून गेले किंवा डोळे ओलावून गेले, असे म्हणण्यात काय स्वारस्य आहे ?

मनोरुग्णांच्या मनोजीवनाविषयी नाना प्रकारचे बरे वाईट समज लोकांत साहजिकच रूढ आहेत. तथापि, एवढी गोष्ट मात्र निश्चित की, श्री. चौधरी यांच्यासारखा विज्ञानाचा निष्णात पदवीधर आणि सहृदय शिक्षक हा कोणत्या तरी विलक्षण वादळी आवेगाच्या झपाट्यात सापडून जेव्हा विदेही होऊन जातो, तेव्हा त्या आपल्या पिशाचावस्थेच्या जाणिवेने तिचे वास्तव दर्शन घडविणाऱ्या

अशा प्रकारच्या हृदयंगम कविता तो लिहू शकेल, असे सहसा कोणाला वाटणार नाही. पण श्री. चौधरी यांच्या या काव्यसंग्रहात तो चमत्कार आपल्याला दिसून येतो. मला तर या कविता वाचताना केव्हा केव्हा असे वाटले की, त्यांना गफलतीने मनोरुग्ण समजण्यात आलेले नसेल ना ? इतक्या त्यांच्या काही कविता तर्कशुद्ध आहेत. केवळ त्यांची शब्दांची निवडच वेचक आणि वेधक आहे, असे नाही; तर स्वतःच्या मनाचा क्षोभ ज्या तुटक आणि भेदक पद्धतीने त्यात व्यक्त होणेच स्वाभाविक असते, त्या पद्धतीने तो कळत म्हणा किंवा न कळत म्हणा, या कवितातून अगदी सहजगत्य, व्यक्त होऊन गेलेला आहे. भक्तिमार्गामध्ये भावावेश म्हणून विदेहावस्थेचे एक स्वरूप वर्णन केलेले आहे; व त्या अवस्थेत ज्या प्रमाणे एकदा आर्त भक्त, अष्टसात्विक भाव अंगात दरदरून दाटल्यामुळे, वेडापिसा होऊन गात नाचत सुटतो, तसा थोडासा प्रकार जरी या कवितात काही ठिकाणी असला, तरी सामान्यतः श्री. चौधरी यांनी आपले मनोगत मोठ्या सफाईने आणि चातुर्याने व्यक्त केलेले आहे, हे निस्संशय.

तरीसुद्धा, या कवितात मनोरुग्णाचे म्हणून जे काही विशेष भावावेग असतात, असे म्हणता येईल, त्यांचीहि चेष्टिते मोठ्या हृदयविदारक शब्दांनी चित्रित झालेली मधून मधून आढळतात.

> वाऱ्यात मिसळला वारा, छायेत मिसळली छाया
> मग कोठे उरली काया ? मी छायेतच जाणार
> रंगात मिसळता रंग, गंधात मिसळता गंध
> रूपात हरविले रूप, की जेथे होती अरूप
> तेथे मी जाणार
>
> मातीत मिसळता माती, मरणाची कवणा क्षिती
> युगायुगाचा अमृतदाता, का मृत्यूला उरणार
> तो मृत्यु दयाळू, आहे कृपाळू, गुजगोष्टी करणार
> तेथे मी जाणार

अशा प्रकारचे श्री. चौधरी यांचे हे उद्‌गार वाचल्यावर, आपल्या मनात असा संभ्रम उत्पन्न होतो की, हा कवि खरोखरी रुग्ण आहे की उन्मनस्क असा आर्त भक्त आहे ? मुसलमानी धर्मात अशी एक समजूत आहे म्हणतात की, परमेश्वराची ज्या वेळी एकाद्या माणसावर अवचित कृपा होऊन जाते, त्या वेळी त्या कृपेचा उन्माद चढलेल्या त्या माणसाला लोक पागल, पिसाट, पिशाच समजतात. पण तो असतो मात्र अवलिया! श्री. चौधरी यांच्या या कविता वाचतांना

मला अनेकदा त्यां समजुतीचा प्रत्यय येऊन गेला. त्याबरोबरच शेक्सपियरच्याहि हॅम्लेट नाटकातील एका गमतीदार विधानाची आठवण झाली. हॅम्लेटला लोकांनी वेडा ठरवल्यानंतर, त्याचे ते वेडातले बरळणे ऐकून, त्याच्या चुलत्याचा दरबारी खुषमस्कऱ्या पोलोनिअस म्हणतो, "याच्या वेडाला सुद्धा काही एक पद्धत आहे!" तेहि उद्‌गार श्री. चौधरी यांच्या या कवितांना लागू पडतात. त्यांना स्वत:लाहि, आपल्या मनाच्या रुग्णतेइतकीच, त्याच्या आरोग्याचीहि जाणीव असावी, असे मला वाटते. म्हणूनच, त्यानी असा खणखणीत सवाल केलेला आहे की,–

आणि...आणि जर मी अमृत असेन–
तर विषकुंभात लपविता कशाला ?
किंवा मी जर तारा असेन–
तर कृष्ण मेघात छपविता कशाला ?

–हा त्यांचा रोकडा सवाल ऐकून, मनोरुग्णालयाचे वरिष्ठ अधिकारी किंवा त्यांचे तेथील स्नेही जर कुंठित होऊन गेलेले असतील, तर मला त्यात काही नवल वाटणार नाही !

असा हा तृषार्ताचा टाहो रसिकांच्या हृदयाला जाऊन भिडेल, याबद्दल मला शंका नाही. पण, हा टाहो काही, केवळ मृगमेघाच्या जलबिंदुसाठी चोच उघडून, आभाळाकडे ताटकळत पाहाणाऱ्या चातकाचा नाही. तर हा तृषार्त जितका चातक, तितकाच चकोरहि आहे ! म्हणून, मृगमेघाप्रमाणे पौर्णिमेचा अमृतकुंभ ज्या वेळी आकाशात षोडष कलांनी तळपत असतो, त्या वेळी त्याच्या सुषमेचे सुधाबिंदु आपल्या मुखात पडावेत, म्हणून चोच उघडून तो आक्रन्दत आहे. अर्थात् ही नुसती जलतृष्णा नाही; तर तितकीच सुधातृष्णा,– सुखभोगतृष्णाहि– आहे ! तेव्हा, अशा या तृषार्ताची ही दुहेरी तृषा कोण कशी शमविणार ? ती भगवंताने शमवावी आणि त्याला तृप्त, तुष्ट आणि शांत करावे, एवढीच माझी प्रार्थना !

धन्तोली, नागपूर
१५–२–१९७४

ग. त्र्यं. माडखोलकर

# लागेबांधे

१९७० चा जानेवारी महिना, मी अगदी नुकताच नागपूरमधे बदलून आलो होतो. परदेशातून बांधून आणलेली आठवणींची शिदोरी अगदी ताजी होती. कधीकाळी उपयोगी पडतील म्हणून अनेक अनुभव डोळयात आणि स्मृतीत दाटीवाटीने साठवून ठेवलेले होते. मी संस्थेत नवीन होतो व ओढवलेली जबाबदारी पेलण्याचा अंदाज बांधत होतो. नवीन ओळखी होत होत्या. नवे अनुभव येत होते. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे एके दिवशी मी नवीन रुग्ण तपासत होतो. एक व्यक्ति स्टुलावर आणून बसवली गेली, होय बसवली गेली हेच खरे ! कारण मी मान वर उचलून पाहिले तो एक सडसडीत शामवर्णीय तरुण–स्वत:विषयीचे देहभान हरपलेला–की जो मान वर करण्याच्या व डोळे उघडून बघण्याच्या अवस्थेत नव्हता. आणि उघडलेच तरी लांबवर शून्यात लावलेली नजर व अत्यन्त विक्षिप्त असे हावभाव याच गोष्टी प्रामुख्याने लक्षात येत होत्या. 'नाव काय ?' मी विचारले, उत्तर नाही. 'कोठून आला ?' याही प्रश्नाला उत्तर नाही. आणखी काही प्रश्न विचारले, पण त्रासिक मुखावर काहीच परिणाम नाही. पण क्षणार्धात 'माझं कोणी नाही . . मला मरायचं आहे, मला मरायचं आहे,' असेच काहीतरी तो पुटपुटला. गणेश चौधरी यांच्या भेटीचा श्रीगणेशा हा असा झाला.

प्रत्येकाच्या जीवनात असे काही प्रसंग व अशा काही व्यक्ति येऊन जातात की हे असे का घडावे याचा संभ्रम पडावा किंवा सहवासाच्या सुखद् आठवणी, मदतीची जाणीव पुष्कळ काळपर्यंत मनात घोळत रहावी. पूर्वजन्मीचे काही लागेबांधे या पलिकडे त्याला दुसरे उत्तर असल्याचे माझे ऐकिवात नाही. श्री. गणेश हे चांगले कवी आहेत, चांगले शिकलेले आहेत असे ते येथे दाखल होण्यापूर्वी मी ऐकले होते. त्यामुळे हेच ते 'गणेश' हे समजल्यावर कुतुहल पुष्कळच वाढले.

'कवी' लोकांचा स्वप्नाळूपणा व विक्षिप्तपणा प्रसिद्ध आहे तो इतका की, कवी व वेडा यांना 'राजा' बरोबर एकाच पंक्तीत बसवले गेले आहे. त्यांना

पूर्ण आचार व विचार–स्वातंत्र्य आहे. अमूक एक गोष्ट प्रमाणभूत असे त्यांचेवर बंधन नाही. कवी काय किंवा मनोरुग्ण काय यांचा असा काही खास वैयक्तिक वैचारिक प्रवाह असतो की त्याचे कसावर ते बाहेरील अनुभवांचे तावून सुलाखून विश्लेषण करीत असतात. विक्षिप्तपणाच्या त्रिज्येने अहंकाराच्या वर्तुळात स्वतःला कोंडून घेणारे – यांचेपासून तो 'ब्रम्हांड गिळून चिमणीच्या अंड्यात लपणारे' नवकवी आपण ऐकले असतील. आणि मग मात्र कवी व मनोविकृती यांची जवळीक का याचा काहीसा उलगडा होत असेल. बाकी काव्य आणि जीवन यांचा घनिष्ठ संबंध आहे खरा. मला वाटते की, जीवनामधले काव्य हरवून बसलेला तो वेडा व काव्यामधे जीवन शोधणारा तो कवी ! आणि यांच्या सीमेवर कुठेतरी स्वतःला वास्तवतेवर स्थिर करणारा व समाजाशी 'लागेबांधे' सांगणारा तो रास्त कवी, बाकी सगळे एकतर मस्त कवी किंवा स्वस्त कवी – एव्हढीच व्यावहारिक विभागणी !

श्री गणेश चौधरी यांचे व्यक्तिगत जीवन अत्यन्त वादळी आहे. अनेक मानसिक संघर्षांच्या ठिणग्यांनी हा माणूस होरपळून काळा पडला आहे. तरी काव्याची व शब्दांची धार मात्र विजेरी आहे. इतकी की दुसऱ्यांच्या अंधारलेल्या मनाला उजाळा देऊन जाईल. संघर्षातून विचारांचे व विकारांचे विलक्षण मंथन झाले. त्यातून आलेला महाविषारी अनुभव त्यांनी गिळला आहे. त्यामुळे ते काहीसे खचले, उदास झाले. पण आपल्या काव्यामृताने त्यांनी इतरांना वैचारिक जीवन दिले आहे. वधस्तंभाला भोज्याप्रमाणे शिवून हा माणूस माघारी फिरला व आपल्या दैवाशी पाठशिवणीचा खेळ खेळला. मनोरुग्णालयात आला तो केवळ पूर्वजन्माचे लागेबांधे म्हणूनच.

श्री चौधरी यांना या रुग्णालयात अेक विशिष्ठ स्थान प्राप्त झाले आहे. तसे पाहिले तर त्यांचे जे शासकीय वर्गीकरण आहे ते 'गुन्हेगार मनोरुग्ण' म्हणून ! अजून पुष्कळसे चांगले संस्कार आमच्या अंगवळणी पडावयाचे आहेत. अगोदरच 'मनोरुग्ण' आणि त्यातून 'गुन्हेगार' म्हणजे आम्हाला आमचेवर कोणीतरी 'डबल बॅरल' बंदूकच रोखून धरली असावी इतके आम्ही गोंधळतो. म्हणूनच उपेक्षा आणि तिरस्कार यांच्या काटेरी बोचण्या सहन करीत त्यांना जीवनाचा मार्ग पाऊलवाटेने किंबहुना आडवाटेने सुद्धा आक्रमावा लागतो. अेका विशिष्ठ मर्यादेपलीकडे गुन्हेगार रुग्णांना मोकळेपणाने फिरण्याची व वागण्याची मुभा नसते. उपचार व पुनर्वसन, तसेच करमणूक व विरंगुळा म्हणून जेव्हा जेव्हा श्री चौधरी यांना खास सवलती दिल्या तेव्हा त्याचा त्यांनी अत्यंत विश्वासाने चांगला उपयोग करून घेतला व रुग्णालयाचे नाव समाजात उंचावले.

कवी संमेलन, नभोवाणी, प्रसिद्ध नियतकालिके यांनी तर चौधरींचे कौतुक केलेच पण पुष्कळ रुग्णांना त्यांनी 'लिहीते' केले हाच खरा अतुट लागाबांधा.

तसे पाहिले तर गुन्हा आणि वेड या अेकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जीवनाच्या जुगारात हे नाणे कोणत्या बाजूवर पडते अेव्हढेच फक्त पहावयाचे असते. आता हा 'जुगार' केव्हा आणि कसा सुरू होतो याचे विवेचन खूप करता येईल. पण ते येथे अप्रस्तुत ठरेल. अेक मात्र नक्की की आयुष्यात आलेल्या विलक्षण असहायतेच्या वा वैफल्याच्या जाणीवेतून मार्ग काढण्यासाठी ही निकडीची व निर्णायक नाणेफेक होते.

श्री चौधरी फार हळवे व सत्शील आहेत. कदाचित् कळत न कळत जोपासलेल्या अत्यंत धारदार संस्कारक्षम मनातूनच त्यांनी नवीन 'लागेबांधे' जोडलेले आहेत व कदाचित् जुन्यातून बंधमुक्त होण्याचा प्रयत्नही त्यातूनच उद्भवलेल्या भीतिपोटी झाला असावा. सुरुवातीच्या काही दिवसांच्या उपचारानंतर ते चांगले सुधारले. त्यांच्या काव्याला, विचाराला गती आली. कवितेमागून कविता प्रसवू लागल्या. या छंदात ते रमू लागले. त्यांच्या सुरुवातीच्या कवितातून विलक्षण औदासिन्य प्रगटले आहे. भोवतालची दुःखे जाणून त्यांचेवर प्रहार करण्यासाठी उगारलेली मूठ हा गृहस्थ चटकन् अंतर्मुख होऊन स्वतःवरच वापरतांना आढळतो, त्यावेळी मात्र मन हेलावते. श्री चौधरी यांनी आमच्यावर फार प्रेम केले आहे. मनोरुग्णांचे स्वास्थ्याविषयी व हक्काविषयी त्यांना विलक्षण जिव्हाळा आहे. त्यांनी आम्हाला वेळोवेळी नुसत्या कवितांचे व भाषणांचे फुलोरेच नाही तर रक्त, घाम आणि अश्रूही भरपूर दिले आहेत. नोव्हेंबर ७० च्या संपातल्या आठवणी रुग्णांचे व आमचे हृदयात अजून ताज्या आहेत. हे सर्व घडते ते केवळ पूर्वजन्मीचे लागेबांधे म्हणूनच. कधी कधी त्यांच्या हट्टीपणाचा अनुभव पण मी घेतला आहे. कधी विकृत विचार, कधी विक्षिप्त वागणूक, कधी विलक्षण मागणी, या सगळयावर मात करण्यासाठी उपचारांचे बरेच 'शॉक्स' त्यांनी व कळत न कळत मीही सहन केले आहेत. आमचा आणि त्यांचा फार मोठा लागाबांधा आहे तो 'मनोगता' मुळे. १९७० साली या त्रैमासिकाचा उदय या रुग्णालयात झाला तो केवळ चौधरीवर भिस्त ठेवून. त्यांनी भरघोस व दर्जेदार लिखाणांनी आमचे त्रैमासिक सजविले. मुद्रित अंक काढण्याच्या बाबतीत त्यांनी दिलेली प्रेरणाच कारणीभूत झाली. आम्ही आव्हान स्वीकारले व यशस्वी करून दाखविले.

कवितांचा संग्रह प्रकाशित करावा ही त्यांची फार जुनी स्वप्ने आहेत.

आज ती येथे साकार होत आहेत यात आम्हाला अभिमान आहे. मनोरुग्णालयातून मनोरुग्णांच्या कवितांचा ग्रंथ प्रकाशित होणे, मला वाटते साऱ्या जगात असा हा पहिलाच प्रसंग असेल. अमेरिकेत क्लिफोर्ड बीअरने "A mind that found itself" हे पुस्तक लिहीले. त्यात त्याने वेडयाच्या इस्पितळात रुग्ण असतांना स्वत:ला आलेले अनुभव लिहीले आहेत. या त्याच्या पुस्तकामुळे सगळे अमेरिकन राष्ट्र मनोरुग्णाविषयीच्या दृष्टिकोनाबाबत ढवळून निघाले व आधुनिक मानसोपचाराचा जन्म झाला. असाच काही लागाबांधा 'तृषार्त' निर्माण करेल यात मला तरी संशय नाही.

दिनांक १७ फेब्रुवारी १९७४

डॉ. य. वा. केळकर
एम्. बी. बी. एस्., डी. पी. एम्. (मुंबई)
अधीक्षक,
मनोरुग्णालय, नागपूर

# मनोगत

मला माझं मनोगत लिहायचंय ! काय लिहावं हा एक प्रश्नच आहे ! आणि काय लिहू नये हा त्याहून मोठा प्रश्न ! आणि कवीनं असं मनोगत लिहावं का ? हा देखिल प्रश्नच ! पण तरी देखिल मला लिहीलंच पाहिजे ! खरचं लिहीलं पाहिजे ! मी लिहायला लागलो की माझ्या मनातील प्रश्नांचे हे प्रचंड हिमनग वितळायला लागतील आणि प्रवाहरूप घेतील...या हिमनगांच्या आड मी स्वतःला लपवू इच्छित नाही. प्रवाहात वाहणं आवडेल मला, बुडणंही आवडेल मला. पण मी किनाऱ्यावरील माझ्या रसिकांना दिसलो पाहिजे. स्पष्ट, सरळ;...पोहतांना, वहातांना आणि बुडतांना देखिल—! कारण मला काही लपवूनही ठेवायचं नाही. आणि काही अंगावर गोंदवूनही घ्यायचं नाही !

हा कविता-सग्रह कधी प्रकाशित होईल असं मला केव्हाच वाटलं नव्हतं—आणि त्या दुर्दैवी घटनेनंतर मी कधी कविता लिहीन हे तर माझ्या स्वप्नातही नव्हतं—

कविता !

कविता कॉलेजात शिकत असताना लिहिल्यात. पुढे विद्यार्थ्यांना शिकवीत असताना देखिल लिहिल्या. हलक्या, फुलक्या, प्रासंगिक...सटरम्-फटरम् ! क्वचित इकडे तिकडे प्रकाशित झाल्या की मला उगीचच वाटायचं मी कवी आहे ! एक गोड गैरसमज—! मी शास्त्राचा पदवीधर—वाङ्‌मयाशी माझा संबंध कमीच ! पण वाचलंय मात्र खूप...त्यामुळेच संवेदनेला टोक आलेलं. लेखन जमलं की आनंद—न जमलं की धुसफूस ! आमचे वार बहुधा फुसकेच— ! मी कविता काय लिहिणार ? अन् काव्यसंग्रह ? भलतंच काहीतरी—!

पण एवढं मात्र जाणवत होतं—हे काहीतरी 'बीज' माझ्यात आहे—!

पण जेव्हा हवसं वाटत होतं तेव्हा ते रुजलं नाही अन् आता मात्र रुजलं, वाढलं, फोफावलं—विचित्र परिस्थितीत, वेड्या मनस्थितीत—महा प्रलयानंतरच्या सर्वनाशानंतर—त्याचं स्वागत कसं करू ?

उरातले सर्व दीप वेड्या वादळात विझले गेले. आणि उरली भयाण भीषण रात्र. आणि त्या रात्रीत भुतासारखा वावरणारा मी.

भ्रम, भास, चक्कर यांनी भ्रमिष्ठ झालेला. रक्ताळलेला. हे असह्य आहे. व्यथा, वेदना आणि दुःख याशिवाय काही उरलंच नाही. आणि मी का जगलो, कसा जगलो मला काही काहीच कळलं नाही. जितका हा भयानक विस्फोट कसा झाला, का झाला हे कळलं नाही तितकाच. फक्त जाणवतात माझ्या मनात होणारे विकृत, विचित्र, विक्षिप्त विचारांचे क्षणोक्षणी होणारे आघात. त्या आघाताचे हजारो आवर्तनं, प्रत्यावर्तनं–आणि त्यांनी दबलेला, भ्यालेला, भेदरलेला मी झोपेविना जाणाऱ्या बेचैन रात्री–आणि त्यातून पळवाट काढण्यासाठी दारू ढोसणारा मी– ! आणि ज्यानं मला वेडं केलं ते माझं–'काचेचं मन', 'पारदर्शक मनं', 'नग्न मन !'

ऋतु बदलले, दोन पावसाळे आले आणि गेले. माझ्या डोळ्यात मात्र आषाढ तळ ठोकून होता. मनात अस्ताव्यस्त विचारांचा कल्लोळ होता. नग्न मनाच्या विकृतीचा अक्राळ विक्राळ वणवा होता. आणि माझा प्राणपक्षी उडून जाण्यासाठी तळमळत होता. सरण रचलं जाईपर्यंत त्याला मढ्यात रहाणं भाग होतं.

–आणि त्याचवेळी माझ्या हातात स्वामीजींचे ग्रंथ आले. स्वामीजी म्हणजे स्वामी विवेकानंद. केवढी ताकद आहे त्यांच्या अकेका शब्दात. केवढं चैतन्य आहे त्यांच्या अकेका वाक्यात. केवढं सामर्थ्य आहे त्यांच्या वाणीत. शब्दांना जिवंत करणारा, अमृत पाजणारा हा महान् प्रेषित . . .

तरी या ग्रंथांचं वाचन सुरू असताना होणारे विकृत भास आणि 'तो' चे आवाज किती विलक्षण छळ करीत होते माझा. 'तो' च्या आवाजाचा चकवा क्षणाक्षणाला मला पिळून काढीत होता. दिवसातून–रात्रीतून होणाऱ्या हजारो आवर्तनामुळे आघातामुळे मला काही शब्द आठवतात–आणि मी बेचैन होतो–अजूनही !

आणि याचवेळी एक दयार्द्र, सत्वशील, थोर माणूस माझ्या जीवनात आला. त्या थोर माणसाचं नांव डॉ. डी. एम्. अडवे ! त्यांच्या दृष्टीत दिसलेली कणव–हुबेहुब माझ्या आतेभावासारखी, चष्म्याची फ्रेम–तश्शीच ! आज मला वाटतं–तेच प्रेम घेऊन आलेला, मला जाणू बघणारा आणि जाणणारा हा पहिला माणूस. कुणास ठाऊक होतं हा माणूस कोण आहे ते ? आणि कुणास ठाऊक आहे मी त्यांच्याशी काय बोललो ते ? पण जाणवत होतं माझा कुणीही

नसलेल्या या जगात हा माझा कुणीतरी आहे ! कोण आहे ?...खरंच कोण आहे ? आहे कुणीतरी...पण खूप जवळचा ! मला कळलंही नाही तो सद्गृहस्थ मला 'सायकोथेरपी' देत आहे. आणि असंच केव्हातरी भावनांचा एक कल्लोळ उरात दाटला—फार फार वेगळं काहीतरी जाणवलं. माझ्या वेदनेनं प्रथमच शब्दरूप घेतलं आणि तब्बल दीडदोन वर्षानंतर मी पहिली कविता लिहून गेलो— 'अश्रू' !

( अश्रू हा शब्द ऱ्हस्व आहे हे मला माहीत आहे पण
ते वहातात तेव्हा दीर्घकाल ! म्हणून लिहीलाय् दीर्घ )

त्या या कविता कधी प्रकाशित होतील असं स्वप्नात तरी वाटण्याची शक्यता आहे का ? जेव्हा जगण्याची शाश्वति देखिल नकोशी होती तेव्हा अफलातून विकृतीतून जन्मलेल्या या कवितांच्या प्रकाशनाची खात्री हवीशी वाटेल काय ?

पण माझ्या जीवनात जितकी उलथापालथ झाली तितकी क्वचितच कुणाच्या जीवनात झाली असेल ! डॉ. अडबे यांची बदली झाली तेव्हा मी अक्षरश: कासावीस झालो होतो.

त्या निरोप समारंभात मी म्हटलं होतं—

मेघ, मग तो मृगमेघ असो वा चैत्रमेघ असो; त्याचं अंतरंग अनंत जलकणांनीच व्यापलेलं असतं ! पण अेकाला वरसण्याचा वर असतो तर दुसऱ्याला विरण्याचा शाप असतो ! अेक असंख्य जलधारांच्या रूपानं व्यक्तरूप घेतो तर दुसऱ्याच्या अव्यक्त रूपास व्यक्त होण्यास आधारच नसतो ! अशाच अेका शापित चैत्रमेघानं – वेड्या पुजाऱ्यानं आपल्या थिटया शब्दात पण भाविक अंत:करणानं वाहिलेल्या या "दुर्वा'—

रे देवदूता, अंतरीचा भाव तुला दावू कसा ?
चैत्रातील मेघ मी सांग रे वर्षू कसा ?....

वर्षाविसे वाटते शापभ्रष्ट मी परी
अंतरीची आर्द्रता पाही रे तू तरी
भक्ताचा प्रभूचरणी भाव माझाही तसा ...
चैत्रातील मेघ मी सांग रे वर्षू कसा ?

—आणि अखेरच्या चरणात मी म्हटलं होतं—

दु:खहारी दवा दिलीस तू दूवा आता घेऊन जा
फुलं कोठून आणू मी या दुर्वा तू घेऊन जा

तूच मुक्याला वाणी दिली, हा शब्दही माझा म्हणू कसा
चैत्रातील मेघ मी सांग रे वर्षू कसा ?

पण मला मनोरुग्णालयात आणलं गेलं आणि लगेच येथे वन्दनीय डॉ. य. वा. केळकर साहेब 'अधीक्षक' म्हणून आलेत. आणि सत्य सांगायचं म्हणजे त्यांच्या पावलांनी येथे देवमाणूस आला.

ते रुग्णात मिसळणारे, त्यांना प्रोत्साहन देणारे आहेत. नव्या नव्या आधुनिक कल्पनांनी भारावलेले आहेत. नव्याची हौस आणि जुन्याचा सोस यांचा मनोज्ञ संगम त्यांच्या प्रयोगशील, प्रेमळ आणि प्रसन्न व्यक्तिमत्वातून प्रकट होत असतो. आणि याहीपेक्षा ते सच्चे डॉक्टर आहेत. रुग्णाविषयीच्या आत्मीयतेनं आणि सहानुभूतीनं त्यांचं हृदय थवथवलेलं आहे. त्या हृदयातून नेहमी आपुलकी ओथंवत असते. आणि म्हणूनच जेव्हा एखादा गायक मनोरुग्ण येथे येतो, तेव्हा वाटतं हे रुग्णालय नाही–संगितालंय आहे ! जेव्हा एखादा चित्रकार येतो तेव्हा वाटतं हे रंगालय आहे ! जेव्हा एखादा विद्याधर येतो तेव्हा वाटतं हे विद्यालय आहे ! रुग्णाला त्याच्या क्षेत्रात योग्य तो वाव देऊन त्याचा आत्मविश्वास जागृत करणारा हा महान डॉक्टर आहे. आणि इतकं असूनही त्यांच्यातील 'माणूस' हा डॉक्टरपेक्षा अधिक विलोभनीय आहे ! म्हणूनच त्यांनी अधिकार गाजविला नाही, तर सहकार वाढविला ! मनोरुग्णालयावर एक अनमोल संस्कार केला ! ही स्तुति नाही तर वस्तुस्थिती आहे आणि तिचा मी गर्व वाहातो !

पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही, पण वंदनीय डॉ. केळकर साहेबांनी याच जन्मी मला नवा जन्म दिला अशी माझी ठाम श्रद्धा आहे आणि म्हणूनच 'ऋणाभार' कवितेत त्यांच्याविषयी मी म्हटलं आहे–

तव स्पर्शाने पाषाणातुन हुंकार मूर्त फुटतो
या शिल्पाचा कणकण हा तुझीच गाथा गातो . .

किरण वळतो माघारी ना धजतो शिरण्या रानी
दुर्दैवाचा पहाड काळा घेई निद्रा कुंभकर्णी
शिल्पकार कुणी आगळा वाट स्वये वळवूनी
अहर्निश यत्ने घडवी येथे कैलास भव्य–लेणी
पाषाणाला जाग येता, तो गीत तुझे गातो . . .

कुणी रांजण सात भरतो अपुल्या पापाने
आत्मजागृती वेड्याला त्या तुझिया कृपेने
माणसातला माणूस जेव्हा असा जागा होतो
रे प्रेषिता, मुखामुखातुन शब्द अेक जागतो
धनुर्धारी आम्ही पाहीला ते रामायण गातो...

फासे द्युताचे उलटे पडती मनी तिमिर दाटतो
अन् बुद्धीचे वस्त्र फेडण्या मोह पाशवी उठतो
बळ होई लुळे पांगळे पितामह लज्जित होतो
पंचज्ञानेंद्रियावरती अधर्म राज्य करीतो
महाभारत हे अमुचे तू चक्रधर शोभतो...

मातृप्रितीची मंगल महती कोट्यावधी गाती
प्रत्येकाचे परी तेधवा शब्द थिटे पडती
प्रतिपाळ माझा मम पित्याने अशा प्रितीने केला
ते पाहूनी तो लेकुरवाळा विठ्ठल काळा पडला
रे प्रेषिता, त्यांचेठायी तूच मला दिसतो...

मायबाप, ओंकार आहे तुझिया रूपात
कसा वर्णावा म्या पामरे तो भाव शब्दातीत
तू असाच राही धनको, राहीन मीही ऋणको
तुझ्या ऋणाची ही श्रीमंती जन्मोजन्मी लाभो
साभिमान तव उपकारांचे कर्ज घेत नाचतो...

या मनोरुग्णालयानं माझ्यावर असीम प्रेम केलं आहे! आणि या रुग्णालयावर मी नितांत प्रेम करतो! या मातीनं मला पुनर्जन्म दिला आहे! ही माती मी अभिमानानं माझ्या भाळी लावतो! या मातीच्या कणाकणाचा अणूरेणूचा मी आजन्म ऋणी आहे! . ... आणि माझा इन्सुलीनं उपचार सुरू झाला तेव्हा श्री देशकर साहेब उपचारक होते! श्री देशकर साहेब रसिक – स्वतः कवि! नंतर आले ते श्री पटेल अंकल! काव्यविव्य म्हणजे भलतंच काहीतरी! म्हणजे ऐकणार पण शौक नाही! शौक खेळण्याचा. खरा खिलाडूवृत्तीचा हा माणूस! खेळकर, मनमोकळा, दिलखुलास! मला मनोरुग्णालयात खेळायला शिकवलं ते यांनीच! उपचार (आणि औपचार देखिल!) बारापर्यंत संपायचा! अन् नंतर दुपारी सुरू व्हायचा कॅरम! सर्व व्यथा, वेदना, पीडा यांना गुंढाळून ठेवायला भाग पाडून रुग्णाला खेळात ओढायचं

रमवायचं ! अंकलबरोबर अगदी पैजेवार खेळ सुरू व्हायचा, जिद्दीनं, अिर्षेनं ! मग क्लृप्त्या करामती, यांना ऊत यायचा ! हास्य–विनोदात वॉर्ड खदखदायचा ! जल्लोष आणि आनंदी आनंद ! त्यात दादांच्या (श्री लक्ष्मणराव अहीरकर) मिश्कील विनोदाची भर. . .चहापान मग छुट्टी !

तसेच येथील व्यवसायोपचार विभागाचे प्रमुख श्री. अेस्. जी. जयस्वाल आणि (तेव्हाच्या) कु. वैजयंती मराठे यांनी माझ्या मानसिक स्थैर्यासाठी अनेक प्रयत्न केले. कितीतरी कविता, कितीतरी कथा, नाटयाच्या रूपरेखा यांच्या बाबतीत मी हिरीरीनं हुज्जत घातली आहे. ओ. टी. चं वातावरण त्यावेळी अतिशय खेळकर, प्रसन्न होतं. दादाला कोणताही विषय वर्ज्य नव्हता. नवीन आलेल्या रुग्णाच्या व्यथा-वेदना समजून घेऊन त्याला 'हाताळण्यातील' त्यांचं कौशल्य अप्रतिम आहे.–आणि जेव्हा जेव्हा वेड्यासारखा वागलो तेव्हा तेव्हा त्यांनी मला सांभाळून घेतलं आहे.

तर जेव्हा जेव्हा म्हणून विविध मेडीकल कॉलेजातील विद्यार्थी यायचे तेव्हा तेव्हा मी त्यांना माझ्या कविता अैकवायचा ! खरोखर त्या युवक आणि युवतींचा मी अत्यंत आभारी आहे. माझ्या कवितांची पातळी त्यांनी दिलेल्या खुल्या दादमुळेच मला कळून आली. मला कुणीच वा कुणाचाच शब्द देखील आठवत नसला तरी देखील त्यांच्या उत्स्फूर्त अभिप्रायांचा अेकत्रित परिणाम मात्र माझ्या मनात आहे ! निदान मी काय म्हणतो ते कुणाला तरी कळतं हे काय थोडं झालं ? तरीपण का कुणास ठाऊक कविता वाचण्यापूर्वी मला वाटून जायचं मी या सर्वांना व्यवस्थित 'बोअर' करणार आहे ! आणि तरी देखील रुग्णालयातील माणसं माझं उगीचंच 'कौतुक' करणार आहेत ! रुग्णाचं–वेडं–मन दुखवायचं नाही म्हणून !

पण या तरुणाजवळ सर्व मामला खुल्लम खुल्ला ! 'क्या बेहतरीन लिखते हो यार' पासून तो 'कोअी और चीज सुनाव यार' पर्यंत ! अय्या.! 'कित्ती सुंदर !' पासून तो 'इश्श्य, काही तरीच' पर्यंत !!

वन्दनीय डॉ. केळकर साहेबांच्या प्रेरणेने येथेही कवि-संमेलने, मुशायरा यांचे कार्यक्रम आयोजित केले गेले ! प्रत्येक वेळी नागपुरात नामांकीत कवि आणि प्रसिद्ध शायर आले होते. कधी कर्मचारी वर्गातील कवि आणि मनोरुग्ण कवि यांची कवि–संमेलने झालीत. तर शहरात कोण्या मंडळानं कविसंमेलनात मला बोलाविल्यास डॉ. केळकर साहेबानी मला आनंदानं पाठविलं ! मी अपराधी मनोरुग्ण असूनसुद्धा श्री. लेंभेसाहेब माझी जबाबदारी स्विकारीत.

परिणाम अेकच ! मी कवी आहे असं मला उगाचच वाटायला लागलं !!

मनोरुग्णालयातर्फे मनोरुग्ण आणि कर्मचारी यांच्या सहकार्याने निघणाऱ्या हस्तलिखित त्रैमासिक 'मनोगत'च्या (आता आमचे 'मनोगत' मुद्रित स्वरूपात प्रकाशित झाले आहे.) प्रत्येक अंकाच्या प्रकाशन प्रसंगी येथे अनेक सहृदय माणसे येऊन गेलीत. त्या निमित्ताने तर कधी अन्य कारणाने माझी त्यांच्याशी भेट वा पत्रभेट झाली. त्यातील बहुतेकांनी माझ्याबद्दल आपुलकी व्यक्त केली. त्या थोर पुरुषांनी मला कळत नकळत धीर दिला. मी अंधारात कोसळलो असतांना मला उठविण्यासाठी क्षणभरच का होईना पण ते वाटेत थांबले !

महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री माननीय बाळासाहेब चौधरी आणि माजी सभापती माननीय बाळासाहेब भारदे यांनी माझं कौतुक केलं ! गुरुदेव पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी आकाशवाणीवर माझ्या 'सीमान्त', 'सूर्यः मध्य-रात्रीचा' या अेकांकिका सादर करून मला नवी दिशा दाखविली. आकाशवाणी नागपूर केंद्रानं मला अमोल सहकार्य दिलं आहे ! श्री. जनार्दन शिंदे, श्री. वसंतराव अंधारे, आणि केंद्राधिकारी यांनी वेळोवेळी सहाय्य दिलं !

'दै. महाराष्ट्र'चे माजी संपादक कै. भाऊसाहेब पंडीत आज हयात नाहीत हे अेक मोठं शल्य आहे ! त्यांनी तर अेक अग्रलेखच लिहीला होता आणि त्यांच्यामुळेच मला अनेक तरुण मित्र मिळाले. श्री. मा. ज. कानेटकर, पद्मश्री श्री. पां. वा. गाडगीळ, श्री. ना. रा. शेंडे, डॉ. प्रा. मनशासाव आणि कविवर्य श्री. या. मु. पाठक, प्रा. वसंतराव वऱ्हाडपांडे, श्री. ग. म. जाधव यांच्यासारख्या साहित्यिकांनी मला प्रोत्साहन दिले. अनेक कविसंमेलनात नागपूरातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कवींनी मला त्यांच्यात सामावून घेतले. कविवर्य ग. गो. कात्यायन यांच्यासारख्या जबरदस्त माणसाचे आशीर्वाद मला नेहमीच लाभलेत.

तसेच श्री. सुधाकरराव नाईक, काँग्रेसचे आमदार श्री. जे. टी. महाजन, जनसंघाचे आमदार श्री. रामभाऊ म्हाळगी आणि कॉम्रेड स. ना. भालेराव या सर्व 'पक्ष' कारांनी केव्हाना केव्हा माझ्या 'लेखना'ची 'वकीली' केली !

या सर्वांचे ऋण व्यक्त करावे ते कोणत्या शब्दात ?

मला ठाऊक आहे कदाचित् ते मला विसरले असतील ! कदाचित् मी त्यांचे शब्द विसरलो असेन ! पण मनाच्या मरगळलेल्या स्थितीत त्यांनी जो दिलासा दिला तो मात्र अपूर्व होता. प्रत्येक उत्सवात दिवे लागतात अन् प्रत्येक उत्सव संपल्यानंतर ते दिवे विझतात.

मी विझलेल्या दिव्यांचा धनी आहे ! त्यांना पेटविण्याचा प्रयत्न करणारा कितीही मोठा असो वा लहान असो तो माझा आहे ! अन् तो जर क्षणभरही माझा नसेल तर माझा या जगात कुणीच नाही – – – अगदी कुणीच नाही !

आणि म्हणूच ज्यांनी कळत न कळत मला केव्हातरी काहीतरी दिलंय् त्यांचं मनापासून ऋणांकन करावं म्हणून खटाटोप ! अन्यथा हे 'मनोगत' लिहिण्याचं काही कारणच नाही !

खरंच या रुग्णालयातील ते दिवस किती चांगले होते, जेव्हा फार समजत नव्हतं. सर्वांबद्दल आदर आणि प्रेम होतं. सकाळी व्यवसायोपचार विभागात जावं श्री जैसवाल आणि कु. मराठे यांच्यावरोबर गप्पा ठोकाव्यात, दुपारी इन्सुलीन-वार्डात जावं, श्री पटेल अंकलबरोबर पैजेनं कॅरम खेळावा, सायंकाळी लायब्ररीत लेम्भेसाहेबाबरोबर वादविवाद घालावा. मनसोक्त रडण्याचे, मनसोक्त हसण्याचे आणि मनसोक्त लिहिण्याचे ते दिवस पानगळीसारखे गळून पडले . . . . नवीन रुग्ण आले की जुने बाजूला पडतात . . . . अलगदपणे. अगदी नकळत. नवे त्यांचं वेड घेऊन येतात. आणि जुन्यांना घरी जाण्याचे वेध लागतात. काही जातातही . . . पण काहींना मनस्थिती ठीक असूनही कोणी नेत नाही . . अन् अपराधी मनोरुग्ण-? त्यांना तर सरकार सोडत नाही . . . सर्व बहर गळून जातो, येथे प्रयत्नपूर्वक जोपासलेलं अेक अेक फूल कोमेजून जातं, सर्व मार्ग बंद ! . . . खरंच आपलं कोणीच नाही तर ! हा सर्वच आभास होता . . . आपुलकीचा ! पुढाऱ्यांनी उद्‌घाटनाच्या फिती कापण्यापेक्षा— फाईलसवरच्या लाल फिती कापल्या तर-? . . . पण घर, दार, संसार सरकार काही काहीच आपलं नाही ! आपल्या आहेत या चार भिंती ! वेडया-सारखे आपण आपलेपणानं या चार भिंतीत उत्सव साजरे करतो आहोत . . . पण येथे आहे फक्त पोकळी ! . . .

या चार वर्षात अेक जिद्दी माणूस माझ्या पाठीशी सतत उभा राहिला आहे! त्या माणसाचं व्यक्तीमत्व मला फणसासारखं वाटतं ! वरून जितकं ओबडधोबड आणि रखरखीत तितकंच आतून गोड आणि मधूर ! ज्याच्याशी वाद घालावे, विवाद उकरून काढावे, इर्षेनं वादात झगडावे, भांडावे आणि शेवटी नम्र व्हावे असा हा माणूस ! तब्बल चार वर्षांपासून मी या माणसाचा मेंदू कुरडतोय् ! हुज्जत घालतोय्! पण हा जिद्दी, काहीसा हट्टी माणूस मला पुरून उरलाय ! चार वर्षे 'मनोगता'चा संपादक, क्लब डेचा संचालक, आणि मनोरंजन विभागातील मनोरुग्णाचा पालक या नात्यानं हा माणूस झटतोय् ! का ते देव जाणे ! पण माझ्यासारखा सुतासारखा सरळ आणि प्रसंगी भांडखोर माणूस विरळाच !

तरीही मला मान्य केलंच पाहिजे हा एक जबरदस्त जिद्दी माणूस आहे ! आणि 'तृषार्त' प्रकाशित होत आहे. ते या थोर माणसाच्या अविश्रांत मेहनतीमुळेच.

आणि याच माणसाचे – वन्दनीय श्री. ग. म. लेम्भेसाहेब यांचे ऋण मला या ठिकाणी व्यक्त करावयाचे आहे ! आणि ते व्यक्त करणं माझ्या आवाक्या-पलीकडील बाब आहे.

मला आवर्जून सांगावसं वाटतं की पुस्तक छापण्याकरिता जेवढी धावपळ धडपड करावी लागते ती सर्व श्री. लेम्भेसाहेबांनी केली आणि म्हणून 'तृषार्त' आपल्यासमोर येऊ शकला !

अेकं मला मान्य केलंच पाहिजे की या कालावधीत मी जवळ जवळ दोनशे कविता लिहिल्यात ! आणि माझ्या मनस्थितीच्या चढउताराचा हा काव्यरूप आलेख जेवढा आहे तेवढा छापावा हा माझा आग्रह होता. तथापि त्यातील केवळ १११ कविता 'तृर्षात' मध्ये आहेत. यातील पहिल्या चार ओळी, 'अक्षयी', 'वेणा' 'आम्रतरुखाली' 'मृगनक्षत्र' या पाच कविता ही दुर्घटना घडण्यापूर्वीच्या आणि उरलेल्या सर्व कविता वेडया कालावधीतील !

या सर्व कवितांची निवड माझे सुहृद कविमित्र श्री. सू. ना. वायंगणकर यांनी केली आहे ! तेव्हा कविता नावडल्यास जो दोष द्यावयाचा तो त्यांना द्यावा !!

परंतु या दोनशे कवितांचं ओझं रसिकांना 'असह्य' झालं असतं ते त्यांनी 'सुसह्य' केलं म्हणून वाचक त्यांचे आभार मानतील हे निःसंशय !!

तसेच मध्यवर्ती कारागृह, नागपूरचे अधीक्षक श्री. बाबासाहेब तोरस्कर आणि जेलर श्री. चौधरी, तसेच माझ्यावर नितान्त प्रेम करणारा बंदी श्रीराम आणि शालीक यांचा मी सदैव ऋणी आहे !

तसेच माझे मनोरुग्ण मित्र यांचा मी कसा उतराई होऊ ? अितकं निस्सीम आणि निर्व्याज प्रेम त्यांनी माझ्यावर केलं आहे.

माझ्यासारख्या वेडयाच्या कविता संग्रहाला सुप्रसिद्ध समर्थ साहित्यिक श्री. ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांची प्रस्तावना लाभावी हे मी 'तृषार्त'चं भाग्य समजतो. त्यांच्यासारखे विद्वान आणि व्यासंगी तसेच निर्भिड आणि परखडही तेच ! या तपस्व्याची 'प्रस्तावना' म्हणजे मी दुर्लभ आशीर्वाद समजतो. आणि ते आशीर्वाद पेलण्याचं सामर्थ्य माझ्याठायी नाही हे मी जाणतो. मी त्यांचा आजन्म ऋणी आहे.

सुप्रसिद्ध चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांनी 'तृषार्तचे' मुखपृष्ठ अत्यंत आत्मीयतेनं रंगवलंय. 'तृषार्ता'बाबत त्यांनी जी आपुलकी दाखविली ती तृषार्त कधीच विसरणार नाही.

तसेच श्री. बलवंत शंकर दाते, 'कलाभुवन' ६६६, सदाशिव पेठ, पुणे २ यांनी ब्लॉक करून दिला आणि केसरी मुद्रणालय ५६८ नारायण पेठ यांनी वेळेवर छापून दिले त्याबद्दल श्री. अ. पां. आफळे आणि त्यांचे सहकारी यांचा मी आभारी आहे. 'केसरी'चे हे सहकार्य मी लोकमान्यांचा आशीर्वाद समजतो. तसेच 'धनश्री'चे श्री. भालचंद्र शेटे आणि श्री. भालूकाका लेम्भे यांचा मी ऋणी आहे.

'तृषार्त'चे प्रकाशक, वन्दनीय श्री. वासुदेव जिजाजी महाजन- (मथुरा भवन २८/१ जळगाव हाऊसिंग सोसायटी, जिल्हापेठ, जळगाव ) हे खरेखुरे 'प्रकाशक' आहेत. माझ्या कवितासंग्रहालाच नव्हे तर जीवनात देखील त्यांनी मला प्रकाश दाखविला आहे. माझा स्वच्छंद स्वभाव त्यांच्या शिस्तबद्ध चौकटीत आणि नियमबद्ध चाकोरीत कधीच रूळला नाही, तरी त्यांनी लहानपणापासून माझ्यावर जे असीस प्रेम केलं त्यावर मात्र जरूर भाळला आहे ! आते भाऊ असले तरी ते मला ती. आईवडीलांचे ठायी आहेत. आजपर्यंत मी त्यांच्यासमोर नेहमी रित्या हातानं गेलो आहे ! पण आज मला अेक आगळाच आनंद होत आहे ! देवा, अखेर मी तुला नैवद्य दाखविलाच ! ही बाभळीची फुलं तुला आवडोत वा नावडोत अखेर मी तुझी पुजा केलीच ! देवा 'तृषार्ता'चे सर्व हक्क तुझ्याच स्वाधीन ! देवा, या जन्मात तुमचे ऋण माझ्याच्याने फिटणार नाहीत ! आणि मी तसा प्रयत्नही करणार नाही ! मला हा 'देवाण घेवाण' हा 'व्यवहार' कधीच जमला नाही ! कारण मला सवयच जडून गेली आहे, कुणी काही अप्रूप दिलं की ते मी कधीच परत करीत नाही ! आणि मी कुणाला काही दिलं की ते कधीच परत घेत नाही.

'प्रदीप मुद्रणालयाचे मालक, लेखक व थोर कार्यकर्ते श्री. श्री. वि. गंधे यांनी अगदी पहिल्या भेटीतच मला जिंकलं ! 'तृषार्त' सर्वतोपरी सुबक ठरावा म्हणून त्यांनी अत्यंत आपुलकीनं प्रयत्न केलेत. मुद्रणाव्यतिरिक्त अनेक बाबतीत त्यांनी उत्साहाने सहकार्य दिले. 'धंदा' म्हणून मी 'तृषार्त'कडे बघत नाही' हे शब्द त्यांनी अक्षरश: पाळले. आणि सत्य सांगायचं म्हणजे त्यांनी मला 'सांभाळून' घेतले. मी त्यांचा आणि सौ. इंदुताई गंधे यांचा ऋणी आहे

शेवटी अितकंच–

'तृषार्त' हे अेक वेड आहे, अेक नशा आहे, अेक झिंग आहे! माझ्या विकृत तरीही प्रामाणिक मनाची ही अेक हाक आहे! प्रेमार्त हृदयाची ही अेक साद आहे! काहीतरी अपूर्व असं हरवून वसल्याची खंत आहे! आणि प्रेमासाठी व्याकूळ जीवाची तडफड आहे! अेका निरर्थक जीवनात अर्थाभास निर्माण करणारा हा अेक तृषार्तसा सूर आहे! या जगाच्या बंधनातून मोकळा होण्यासाठी उत्सुक असलेल्या तृषार्ताला,– मरणावस्थेत अखेरच्या क्षणाला घोटभर पाणी तोंडात टाकतात– तसं या मनोरुग्णालयानं केलं, आणि माझ्या दुर्दैवानं ते घोटभर पाणी अमृतासारखं ठरलं!–आणि मी जिवन्त राहिलो! मला कळत नाही की मी जिवन्त आहे की मृत आहे! जरा मागे वळून पाहिलं, भूतकाळाकडे नजर टाकली की अनेक आठवणी पानांच्या सळसळीसारख्या सळसळत येतात, काही लख्ख, काही धूसर, काही स्पष्ट, काही अस्पष्ट! आणि प्रत्येक स्मृती अेकेक वेदना घेऊन येते आणि माझ्या डोळ्यातून झरणाऱ्या अश्रूंचा थेंब अन् थेंब पीत रहाते! आत्मघाताचा विचार मनात आला की ही व्यथा अक्षरशः मोहरून जाते! बहरानं नुसती लदलदून जाते! माझं जगणं तिला मंजूर नाही आणि मलाही नाही!

–आणि येथपर्यंतच्याच कविता 'तृषार्त' मध्ये आहेत.

दिनांक ७–२–१९७४ गणेश चौधरी

# पूर्वप्रसिद्धी

**आकाशवाणी, नागपूर केंद्र :**

भैरवी, ...चं घेऊन बसलात काय ?, नशिब, निखारा, असणे काही असेचना, फसवणूक, वचन.

**तरुण भारत, नागपूर :**

घरटे, होईन म्हटलं, दुखणं

**लोकमत, नागपूर :**

आम्ही

**प्रज्वलंत, नागपूर :**

बाळा हाक कुणा मारू, शून्य

**ग्रामस्वराज्य, यवतमाळ :**

छाया

**धनश्री, पुणे :**

हुरहुर, उमरखय्याम, तू कणभर फुलता, आता नका विचारू, रुंझलेल्या डोळीयात, खांद्यावरूनी ओझे, दुःख माझे नाव, देह आणि आत्मा, ओल्या तंद्रीत,

**स्वान, नागपूर :**

पार्टी,

**भूमिसंग्राम, परिवर्तन, जळगांव :**

अश्रू, हा माणूस झोपलाय्

— सर्व संपादकांचे मनःपूर्वक आभार.

●●

# अनुक्रम


तृषार्ताचा टाहो
लागेबांधे
मनोगत
अश्रू
वृथा
गुन्हेगार
तेथे मी जाणार, आता, घरास मी जाणार
छाया
एकटा
हे प्रभो
अर्ध बुडबुडा
"डोळे एकदा तपासून पाहा"
शपथ
पोळा
एक वाईट असतं
अिथं माणूस दिसतो
उमाळा
रात
वेड
गीत
शिळा
छंद
खेळणं
मी स्टॅग्नॉसॉरस
स्मृति
पंखा
कमळ
अरे,...पहा !
वारकरी
हुरहुर
भास
मासा
हा माणूस झोपलाय
...चं घेऊन बसलात काय ?
हात
जखम
आता उजाडेल
नशिब
बाभुळीची फुले
खोड जुनं
जर
तुटलेला तारा
निखारा
असणे काही असेचना
खेळी
फसवणूक
सुधारणा
वचन
पेला
मुखवटे
असेच जुळते नाते
आरसा
वढाळ ढोर
भरतीच्या लाटेसंगे
स्वप्नभूल

संभ्रमित
शस्त्रक्रिया
पोरका
मर्डर
शर
बाळा हाक कुणा मारू
रांगोळी
येऊ नको
प्रवास
क्रंदन
नक्षी
शून्य
हसणे केवळ वरवर असते
पौर्णिमा
वाटचाल
उमर खय्याम
प्रेमधर्म
घरटे
देवाशप्पत आज किनई...!
कोजागिरी
नाते
जीवन
आम्ही
तफावत
कळभोगी
खडा
दुखणं
तू कणभर फुलता
छंद
आता नका विचारू
रूंझलेल्या डोळियात
जाहला सूना पिंपळपार
खांद्यावरूनी ओझे
ठिणगी
माझं आहे
अजून
कधीमधी
दु:ख माझे नाव
दर्शन
रात
त्रिशूळ
देह आणि आत्मा
ओल्या तंद्रीत
कटीवस्त्रात कामिनी
ही रात्र रात्र वेडी
नागवा
होईन म्हटलं
नाहीतर
पाटी
कमळ
माझे शब्द किती भोळे
गझल
अक्षयी
वेणा
आम्रतरूखाली
मृग नक्षत्र
रे, हिमालया
'भैरवी'

● ●

# अश्रू

सर्वस्व गेले कंगाल जाहलो
सर्वच गेले एकटाचि उरलो
गतस्मृतींचा अता आसरा
अशाच वहातील अश्रुधारा

सारे मजला गेले सोडून
नका अश्रुंनो, जाऊ तोडून
द्या अश्रूंनो एकच मज वर
नित्य वहावे तुम्ही झरझर

अश्रूंनो बोला, भाषा मनाची
माझ्या आणिक गेलेल्यांची
जगा अश्रूंनो असे मी तोवर
नसेन जरी मी, रहा धरेवर

तुम्ही अश्रूंनो दैवत माझे
तुम्ही अश्रूंनो आधार जीविचे
श्रान्त पथिक हा, मी अश्रूंनो
न्हाऊ घाला नित अश्रूंनो

वहा अश्रूंनो मुक्तपणाने
गा अश्रूंनो गीत पुराणे
अश्रूंनो सांगा जुनी कहाणी
छेडा आणिक आर्त विराणी

अशी वहावी अश्रूसरिता
सामर्थ्य तुझे हे गंगामाता
धुवा अश्रूंनो कलंक आता
तुमच्या पुढती विनम्र माथा

अनंताच्या वाटेवरती
गेले पुढती मम सांगाती
अता अश्रुंनो, कशास कुढणे
आलो जेथून तेथे जाणे ○ ○

३० जुलै १९६९

# वृथा

वाट चालतो वृथा, अजून ही, वाट चालतो वृथा
नुरली प्रीती, नुरले जीवन, उरली व्याकुळ व्यथा

चंदनाचे बन जळाले
बाभुळीचे रान माजले
गंधपाकळ्या गळूनी गेल्या, उरला कां काटा

जिथे छेडिली तान सुरेली
ती मैफील आता उडून गेली
आणि उरली आर्त विराणी विराण व्याकुळता

जिथे अमृत सिंधू होता
तिथे तुषारही नुरला आता
विषण्ण सागर कांठ बघतो, तळ कोरडा रिता

पाय थकले, मनही खचले
अंतर आहे अजून उरले
त्राण न उरले, हाल न सरले, सुदूर उंच माथा

असेच वेडे वादळ आले
पिल्लासह ते घरटे पडले
पाखरांची किलबिल गेली, वृक्ष कुढतो अता

या जन्माची सोबत गेली
नाती गोती सर्व संपली
डाव अपुरा खेळुन गेले, आणि संपली कथा ००

८ ऑगस्ट १९६९

# गुन्हेगार

कलंकित अमुचे जीवन, आम्ही गुन्हेगार
माणुसकीचा तुम्ही घडवा, आम्हास साक्षात्कार

सल कसलासा रुजे खोलवर
जैसे रुजते तण भूमीवर
क्षणात वणवा ठिणगीचा अन् उडतो हाहाकार

जाणूनि कुणी का काटे पेरितो
तरीही काटा उगवित असतो
अजाणता हो घडते काही, मग पुढती अंधार

समाजशत्रू आम्हा म्हणती
समाजातुनी परि अमुची निर्मिती
महापुरातिल वृक्षापरी कां आम्ही वाहवणार

कुणी बांधिती इमल्या माडद्या
कुणी पळविती मोटारगाड्या
त्राण संपुनी कुणि कोसळतो, तो कसचा उठणार

कुठे मिष्ठान्नाचे सहस्र भोजन
कुणी अन्न कणास्तव फिरती वणवण
कुठे कोरडे शिळे अन्न अन् पाण्याचा भडिमार

तलम वसनांचे कुठे ढिगारे
कुठे अब्रूची दिसती लक्तरे
अंधाराचे वस्त्र नेसुनी, कुणी फिरती दारोदार

कुठे पांडित्याचे दिवे पाजळती
कुठे अज्ञानाचे किडे वळवळती
कुठे निशाणी डावा अंगठा, कुठे लेखनाधार

कुणी हिरे लाख मोजतो
खळगीसाठी कुणी खचतो
कमविणारा हात एकटा, दहा तिथे खाणार

कुठे कुणाच्या रंग महाली
नृत्य आणिक तान रसीली
पाल्याचा कुठे पिऊनि काढा, बालक किरकिरणार

अन्न, वस्त्र, अन् नसे निवारा
आभाळ उंच अन् खचे वसुंधरा
पाऊल पहिले पडे वाकडे, वाकडेच फिरणार

उंटा तुझे रे काय वाकडे
काय सरळ ते हेचि कोडे
माणुस आम्ही, आम्हालाही, असतो हो संसार

असा मनाचा होतो कोळसा
भय भोवरा नैराश्येचा
विध्वंस मनाचा आधी होतो, नंतर मग संहार

भयामुळे जव गुन्हा घडतो
स्वयेची माणुस भय असतो
भयभीतांना तुम्ही शिकवा, निर्भय अन् निर्धार

अजाणता जे काही घडले
प्रायश्चित्त तयाचे आम्ही भोगले
स्नेहज्योत विझवुन तुम्ही का, बोटच दाखविणार

दिशाहिनांना दिशा दाखवा
अंधारातच दीपक लावा
निखंदूनी काढू जात आमुची, आम्हीच गुन्हेगार

आमुचेही नांव माणूस आहे
चैतन्य सारे एकच आहे
कलंक आमुचा धुवूनी आम्ही, वाट नवी धरणार

जगा तुम्ही अन् अम्हास जगवा
सहानुभूतीची ओल दाखवा
माणुसकीचा सोनस्पर्श हा, अश्रू हे पुसणार

माणुसकी ही निर्भर असते
अभय सर्वांना ती देते
कुणी देवदूत निश्चित पुढती, शापमुक्त करणार

इथेच नांदेल समता, शांती
करूणाद्वारा समाज क्रान्ती
सत्य ठरो वा स्वप्न ठरो हे, मंगल ते असणार

नव निर्मिती नव्या जगाची
नव प्रभेची, नव्या मनुची
पहाट निश्चित येईल, येवो, गीत गात येणार ० ०

११ ऑगस्ट ११६९

## तेथे मी जाणार, आता, घरास मी जाणार !

घरास मी जाणार, आता घरास मी जाणार !
तेथे मी जाणार, आता तेथे मी जाणार
ते घर आगळे, जगावेगळे, तेथे मी जाणार
ती दुनिया माझी, नवलाईची, तुम्हा नच कळणार
अनंत आनंदाचे घर ते, आनंद मी होणार
आता, तेथे मी जाणार

तिथे न वेडा, वा शहाणा वा कसला अधिकार
तिथे न घेणे, काही देणे ना कसला व्यवहार
तिथे न भावना, कशी वेदना तिथे मग उरणार
कुणी न कुणाचा दास, कसा उपहास, तिथे असणार
तिथे न घडणे, तसे मोडणे, तेथे हो नसणार
तिथे न घटना, तशी विघटना, तेथे हो नसणार
तिथे न भरती, तशी ओहटी तेथे हो नसणार
तिथे नसे चल, तैसे अचल, तेथे हो नसणार
तिथे नसे स्थिर, तैसे अस्थिर तेथे हो नसणार
नसेल अैसे तसेच तैसे काहीच हो नसणार
परि नसुनी सर्वच आदी अंती तेच ते असणार
हे ब्रह्मांड जेव्हा नव्हते, तेव्हा जे होते, ते नित्य जेथे असते
तेथे मी जाणार

जे आहे म्हणता नसते, नाही म्हणता असते
ही माया तैशी आहे, अन्ती ब्रह्मच उरते
मी आहे म्हणता नसतो, नाही म्हणता असतो
प्रतिबिंब केवळ आरश्यातिल, आणिक मी ठरतो
जे फोल जया न मोल, ते फेकून मी देणार
मीपणाचे टरफल फेकुन मी मात्र जगणार
हे कोटि सूर्य इथले, निष्प्रभ जेथे ठरले, तेथे मी जाणार
आता, तेथे मी जाणार

हे स्थूल जेथुनी येते अन् सूक्ष्मामध्ये जाते
वा बीजातुन वृक्ष होउनी पुन्हा बीज होते
हे दृष्य जेथुनी येते, परि हे दृश्य जेथे नसते
हे जेथुनी हो उपजते, आणि अन्ती विलया जाते
विलयातुनी विलयासाठी जे पुनः पुन्हा उपजते
कालचक्र हे असे अनादी, अनंत हो फिरते
हे सत्य जेथुनी येते, अन् सत्यच केवळ उरते
हे पुरातन, तत्व सनातन, सत्यच मी होणार
तेथे मी जाणार

ही अनंत आकाशाची, ही बाग नवलाईची
चांदण्याचे पितात पाणी, फुले नक्षत्रांची
हा वनमाळी कोण ? असतो आणि कोठे ?
ठावे आहे मजला, जाईन मी हो तेथे
हे इन्द्रधनुचे रंग, जेथुनी येती सांग, तेथे मी जाणार
आता तेथे मी जाणार

ना राजदंड राजाचा ना कलंक हा माथ्याचा
ना प्रकांड पंडित कोणी, ना धनि अज्ञानाचा
त्या मंगल वाटेवरती, माझे पाऊल हो पडणार
तेथे मी जाणार

सागरामधली लाट, कां वेगळी काढली कोणी ?
कां लहरी मधला गंध, वेगळा हुंगला कोणी ?
झपाटलेल्या झाडास आता, रोधू कोण शकणार ?
तेथे मी जाणार

वाऱ्यात मिसळला वारा, छायेत मिसळली छाया
मग कोठे उरली काया ? मी छायेतच जाणार
रंगात मिसळता रंग, गंधात मिसळता गंध
रूपात हरविले रूप, की जेथे होती अरूप
तेथे मी जाणार

मातीत मिसळता माती, मरणाची कवणा क्षिती
युगायुगाचा अमृतदाता, का मृत्युला डरणार
तो मृत्यु दयाळू, आहे कृपाळू, गुजगोष्टी करणार
तेथे मी जाणार

या विश्वाचा जो पिता, तो विश्वाची हो जननी
स्तन्य तिचे पितांना, कां बालक रडते कोणी ?
ते अमृततत्व आनंदाचे, मी मनसोक्त हो पिणार
तेथे मी जाणार

हे वेडे कुरूप रूप, मन अंधारलेले
हे बोल अज्ञानाचे, अन् कृत्य काजळलेले
काम क्रोध लोभ अन् मद मत्सर मोह
वा असेल मनामध्ये जर लपलेला संमोह
माझ्या सवे जळून जातील, मी 'मी' न मग उरणार
या विश्वसिंधुतिल, अेक बिंदु मी, सिंधूतच मिळणार
अनंत प्रकाशाचे घर ते, मी प्रकाशमय होणार
आता घरास मी जाणार ○○

१२ ऑगस्ट १९६९

# छाया

वेडानं वेडात लावली आग
आणि झालो जळून खाक
आता उरली फक्त राख
चिमुटभर...

गेलेलं परत येत नाही
हे कां मला कळत नाही
अजून मी कां जात नाही
एकच प्रश्न...

मुसळाला कोंब फुटत नाही
उंबराला फूल लागत नाही
माझं आक्रंदन सरत नाही
दिन रात...

जगत असून जगणं नाही
श्वास शेवटचा ठरत नाही
वाट ही सरत नाही
सरणार...

आता फक्त असं वाटतं
कापरासारखं उडून जावं
आणि अज्ञानाकडून जावं
अनंताकडे...

सर्वच गेलेत, मी उरलो
उरलो कसला, तेव्हाच गेलो
आता उरली माझी काया
केवळ छाया... ○○

१७ ऑगस्ट १९६९

# एकटा

तुझे जाणे असे अचानक
आता उरले सर्व दाहक
तुझे न माझे स्वप्न स्मरते
अन् मजला रडे कोसळते...

अवचित रात्री जाग येता
आकाशातिल नक्षी दिसता
चांदण्याला आग लागते
अन् मजला रडे कोसळते...

कुणी चिमणा करी धिंगाणा
चिमणीसाठी होई दिवाणा
नकोच बाई चिमणी म्हणते
अन् मजला रडे कोसळते...

चिवचिवणारी कुणी चिमणी
चोचीत पिलाच्या दाणा देई
डोळ्यात आभाळ भरूनी येते
अन् मजला रडे कोसळते...

कुणी अनामिक असा दिसतो
देवाला तो फुले अर्पितो
काळाची करणी काळिज चिरते
अन् मजला रडे कोसळते...

चित्र शिशूचे दृष्टिस पडता
मम बाल्यांचे शब्द स्मरता
डोळ्यात माझ्या धुके दाटते
अन् मजला रडे कोसळते .

जेव्हा मी मला विसरतो
अजाणता मी बालक होतो
बाळ माझे मला खुणविते
अन् मजला रडे कोसळते...

पाऊस सरसर पडत असतो
कुणी बोबडे बोल बोलतो
नावेसाठी रुसून बसतो
हे खेळ शेवटी स्वप्नच ठरते
अन् मजला रडे कोसळते ..

भास माझा उपहास करिती
ज्ञानेंद्रिये मला हिणविती
मन कुढते . . जळत असते
अन् मजला रडे कोसळते...

हृद्‌पिंजऱ्यातील प्राणपाखरु
उडविणे न हातां मी काय करु
मागे राहिले हे कां एकटे
म्हणूनि मजला रडे कोसळते...

असे स्मरावे तसे स्मरावे
असे छळावे तसे छळावे
ही सान्त काया तरिही उरते
अन् मजला रडे कोसळते...

सोबत आता गाठू म्हणतो
तरिही एकटा मीच उरतो
एकाकी अंतर चालणे उरते
अन् मजला रडे कोसळते... ○○

२० ऑगस्ट १९६९

# हे प्रभो

असे वाटते क्षणाक्षणाला गीत तुझे गावे
किंवा ऐसे कणाकणांनी मीच गीत व्हावे...

असे वाटते सुरासुरांनी तुला आळवावे
किंवा ऐसे भावभावनी स्वये सूर व्हावे...

असे वाटते तुझ्या मंदिरी धावत मी यावे
धावत असता हे प्रभो मी पायवाट व्हावे ..

असे वाटते तुझ्या मंदिरी पायरी व्हावे
किंवा होऊनी स्नेह, दिपातील जळून मी जावे...

असे वाटते नीत प्रभो मी चरण वंदावे
किंवा ऐसे पायतळीचा धूलीकण व्हावे...

असे वाटते करूनी भक्ति, भक्तीच मी व्हावे
जीवन माझे तुला अर्पुनी ओझे फेकावे...

असे वाटते तुज प्रभो हे अश्रू अर्पावे
हे प्रभो तू तू न उरावे, मीही आणि मी न उरावे... ० ०

२० ऑगस्ट १९६९

# अर्ध बुडबुडा

लहान बुडबुडा महान बुडबुडा
सान थोर तरी बुडबुडा
खुळा शहाणा तरी बुडबुडा
जीवन केवळ आहे बुडबुडा
आणि क्षणार्थ अर्ध बुडबुडा
रे, जीवन म्हणजे अर्ध बुडबुडा..

रंगी बेरंगी असा बुडबुडा
सप्तरंगी तसा बुडबुडा
उषःकालचा हा बुडबुडा
संध्याकालचा तो बुडबुडा
डांबरकाळा असा बुडबुडा
नीलाकाशी तसा बुडबुडा
रक्ताळलेला लाल बुडबुडा
हरीत हिरवा असा बुडबुडा
फेनधवल जरी बुडबुडा
रंगरहीत तरी बुडबुडा
रे, जीवन म्हणजे अर्ध बुडबुडा ..

प्रतिबिंबातच दंग बुडबुडा
खुदमस्तीतच संग बुडबुडा
मदमोहातच मग्न बुडबुडा
भोगात भंगतो असा बुडबुडा
तट्टाम् तट्ट फुगतो बुडबुडा
फुगुनी फुटतो फट्ट बुडबुडा
रे, जीवन म्हणजे अर्ध बुडबुडा...

क्षणार्धाच्या कुबड्या घेऊनी
मी मी माझे जपतो बुडबुडा
धाव धावतो तसा बुडबुडा
खडा टाकतो असा बुडबुडा
पापाचा भरतो घडा–घडा
रे, जीवन म्हणजे अर्ध बुडबुडा...

मृगजळ पितो घटाघटा
मायांकीत असा बुडबुडा
दागिन्यास्तव मढ्यावरती
कुणी ओढतो ओरखडा
कुणी रडतो, कुणी हसतो
कुणी फोडतो, हंबरडा
रे, जीवन म्हणजे अर्ध बुडबुडा...

कुणी तापसी, कुणी तामसी
कुणी फसतो, कुणी डसतो
नाग फिरतो कडा–कडा
असा तृष्णेचा वाजे खुळखुळा
अतृप्त खुळा तरी बुडबुडा
रे, जीवन म्हणजे अर्ध बुडबुडा ..

काय जीवन म्हणजे अेक बुडबुडा
अरे, अेक जगती कुणीच नाही
अेक जगती काह्रीच नाही
अेक पूर्ण केवळ सच्चिदानंदघन जो
नित्य सत्य अेकच अेक तो
मग कुणी गाजवो पांडित्य कितीह्री
वा कुणीह्री काह्री बडबडा
रे, जीवन म्हणजे अर्ध बुडबुडा... ○○

२६ ऑगस्ट १९६९

## "डोळे एकदा तपासून पहा"

जर नजर दगा देते
जर जग अजगर भासते
वा, चिरडणारी गुहा
डोळे एकदा तपासून पहा...

ताऱ्यांचा असतो संप
पायाखाली धरणीकंप
भिंतीवरच्या उभट सावल्या
दाखवितात वाकुल्या
लांब जिभेची कुणी कृत्या
गिरविते अभद्र आकृत्या
हे वखवखणारे भास
गरगरणारे उपहास
जाणिवेला वनवास
रोधतात श्वास
तोंडाला पडते कोरड
छातीवरती पक्का दगड
आ वासूनी बघते मगर
दगा देते आपुलीच नजर
जग म्हणजे भासते लाव्हा
डोळे अेकदा तपासून पहा...

दृष्टीस येणारी हरेक व्यक्ति
हरेक विचार हरेक स्मृति
वाढवितात गुंतागुंती
फोफावते नग्न विकृति
शब्दाशब्दाचे सुप्त अर्थ
शत प्रतिमा शत अनर्थ
कधी भासतात कधी दिसतात
कधी असतात कधी नसतात
जाणीवेवर करतात मात
कपाळावर जातात हात
जीवन म्हणजे प्रदीर्घ रात
रात्रीला जिव्हा दहा
डोळे एकदा तपासून पहा...

प्रत्येकाला डोळ्याचं वरदान असतं
म्हणूनच काही जन्मांधांनाही लख्ख दिसतं
केव्हा उजाडतं, केव्हा मावळतं
कारण खाचातून पाणी गळतं
इतिहासाच्या पानोपानी
अितिहास घडविला अश्या डोळ्यांनी
वाल्याला वाट विचारून पहा
डोळे एकदा तपासून पहा. . ○○

सप्टेंबर १९६९

## शपथ

तेच दे अमृत तुषार
तीच दे पावलं सात
तेच दे आई–बाप
देऊ नकोस वेडाचा शाप. .

तोच संसार, तेच घर
त्याच समईज्योती देवघर
मग वाटल्यास उभा काप
पण देऊ नकोस वेडाचा शाप ..

तोच सातपुडा दृष्टी समोर
तीच दे तापाई
तीच दे पाखरं सारी
तीच दे आंबराई ..

तीच दे माणसं मायेची
तीच माती त्याच गावची
तीच थिके तेच हात
देऊ नकोस वेडाचा शाप...

त्याच माता त्याच भगिनी
तेच पुत्र तीच कामिनी
कर मला खुशाल खाक
देऊ नकोस वेडाचा शाप ..

तेच सोयरे तीच नाती
तीच बंधने तीच गती
कर माझी खुशाल राख
देऊ नकोस वेडाचा शाप...

तेच बंधु तेच मित्रजन
तीच हितगुजे तीच भाषणं
मग काटयांचा सडा टाक
पण देऊ नकोस वेडाचा शाप...

त्याच सरिता, तेच निर्झर
तेच गुंजन, तेच डोंगर
तीच माया, दे तेच पाश
पण देऊ नकोस वेडाचा शाप...

तीच माझी भक्तीस्थानं
तीच कीर्तने, तीच भजनं
वाटल्यास दे उरावर ताप
पण देऊ नकोस वेडाचा शाप...

तेच तारे तेच चांदणे
तेच नभ तीच अंगणे
दे तीच वाट तीच घाट
पण देऊ नकोस वेडाचा शाप ...

तीच गाणी ओठावरची
तीच शीळ गुलमोहराची
तीच मी फुलवीन बाग
पण देऊ नकोस वेडाचा शाप...

त्याच पाणपोया, तेच चढात
माझ्यावर कर अग्नीवर्षाव
पण करू नकोस असा घात,
देऊ नकोस वेडाचा शाप...

मी तर बांबूची काडी
तेच उदाचे कण मिळू दे
सुगंध सारा त्यांचाच रे
मला काडी परी पुन्हा जळू दे...

देऊ नकोस काचेचं मन
अटळ त्यापायी वेडं होणं
वाळू सरकता क्षणाक्षणाला
जमेल का कधी चालणं...

जीवन तुझं तुलाच देतो
काय ठेवलस माझं शिल्लक
अश्रु असूदे माझ्यापाशी
तूच केलस मला कफल्लक...

मला देतांना पुनर्जन्म
नीट ठेव ही आठवण
देऊ नकोस वेड आणि
देऊ नकोस काचेचं मन...

दे सारं तेच ते
वेड नको वा शापित मन
शपथ घालतो मी तुला
सुटली असं तू म्हण...

जर पुन्हा देणार असशील वेड
तर काहीच देवू नको
तुझ्या दारी आल्यावर
पुन्हा दूर लोटू नको... ० ०

२ सप्टेंबर १९६९

# पोळा

म्हणे आज आहे पोळा, फडकतो डोळा
अश्रू झाले गोळा, स्मृतींनी
बाळाच्या स्मृतींनी, उरात काहूर
बाळ गेला दूर, जावे तेथे...

पेरकंडाची जोडी, त्याची भारी गोडी
आज माया वेडी, हंबरते
पोळ्याची चाहूल, कितीतरी आधी
हंबा लक्ष वेधी, मातीचा रे
रंग गेरुचा, मातीच्या हंबाचा
तुझ्या रे लाडाचा, फार फार
हंबाशी बोलणे, हंबासम चालणे
मान डोलाविणे, छंद तुझा
हंबासह खाणे, हंबासह झोपणे
उठणे बसणे, सर्व काही ..

...आला आला पोळा, सण झाले गोळा
पहिला सोहळा, आनंदाचा
पहाटे उठून, होई सडासंमार्जन
रंगीत अंगण, रांगोळीने
अन्न रे सुग्रास, मधूर येई वास
परि हंबाचा ध्यास, बाळाला रे...

गावाच्या मातीत, घरात, दारात
आनंदरव करीत, गोपाळ गोपाळ

खांद्याखांद्यावर, ओट्याओट्यावर
रस्त्यारस्त्यावर, गोपाळ गोपाळ

लहान थोरात, स्त्रिया पुरुषांत
आनंदाची खैरात, गोपाळ गोपाळ...

काळ्या चिऱ्याची, धवळ्या गोऱ्ह्याची
न्हाऊ घालण्याची, वेळ झाली

घासून पुसून, हंबा केले छान
आले नदीहून, परतूनी

वाडा शृंगारला, घर शृंगारले
तोरण बांधिले, गल्लोगल्ली

हंबाच्या घरात, मोठ्याश्या वाड्यात
दुडूदुडू धावत, बाळ येई

बाळाची धांदल, हंबाशी बोलणं
गोऱ्ह्याला पैंजण, घाल बाबा

बांधियला खांबा, मोठ्ठा मोठ्ठा हंबा
बाळाला अचंबा, पाहिजे तो

बाळाची गट्टी, सर्व हंबाशी
याचे त्याचेपाशी, नेई बाबा

दोर मी धरीन, हंबाला पळवीन
पोळा मी फोडीन, आज बाबा

मी मोठ्ठा होईन, हंबागाडी घेईन
मळ्यात जाईन, हंबासंगे

मी इन्हये म्हणेन, मग हंबा धावेन
झुमझुम डोलेन, मळ्यात मी

विहीरीचे पाणी, हंबाला पाजूनी
मग मी पिऊनी, काम करू

मळ्यांतील द्राक्षे, मळ्यांतील आंबे
हंबाच्या संगे, खाईन मी
लिल्याच्या हंबाहून, यात्याच्या हंबाहून
कसा छान छान, हंबा माझा
माझा उजा हंबा, तसा दुजा लाल
कपाळी गुलाल, लावीतो मी
माझ्या हंबांना, मी सजवीतो
शिंगे रंगवितो, लाल लाल...

बाळ दुडूदुडू धावे, थोपटे हंबाला
नाही कौतुकाला, पारावार
हातांच्या टाळ्या, वाजती चिपळ्या
आनंदाच्या उकळ्या, आनंदाला
आनंदी आनंद, सर्वत्र आनंद
आनंद भेटीला, आनंदाला
ब्रह्मनाद झाले, ब्रह्मही उतरले
ब्रह्मही रंगले, ब्रह्मानंदी...

बाळ मालक राजा, घराचा दाराचा
सर्वच हंब्यांचा, प्रेमाचा जो
गडी माणसांशी, त्याची खास नाती
सर्वा रिझविती, बोल गोड
प्रेमाचे हो राज्य, आनंदाच्या गावाला
आल्हाद, उत्साह, सांगू कसा...

आई आणि आजी, काका आणि बाबा
डोलती आबा, शब्द ब्रह्मे...

हंबाच्या गळ्यात, फुलांची माळ
घंटानाद मंजूळ, गोपाळ गोपाळ
हंबाच्या माथोटीला, लाललाल मणी
सृष्टीचा चिंतामणी, गोपाळ गोपाळ

हंबाच्या कपाळी, बाशिंग रंगीत
सृष्टीचे संगीत, गोपाळ गोपाळ
हंबाच्या पायात, छम् छम् पैंजण
सृष्टीचे नर्तन, गोपाळ गोपाळ

हंबाच्या पाठीवर, नक्षीदार झूल
सृष्टीचे मूल, गोपाळ गोपाळ
हंबाच्या शिंगांना, झोकेदार गोंडा
सृष्टीचा झेंडा, गोपाळ गोपाळ

हंबाच्या डोळ्यात, अश्रू तरारले
ब्रह्मची पाहीले, गोपाळ गोपाळ
हंबाच्या मातेला, अवेळी पान्हा
चाटते तान्हा, गोपाळ गोपाळ
हंबा हंबरतो, माय हंबरते
आनंदाचे भरते, गोपाळ गोपाळ

वाद्यांच्या गजरात, चाले मिरवणूक
घालीत रे हाक, प्रत्येकाला
ताशा नी ढोल, तसे मंगल वाद्य
आनंदाचे खाद्य, आज खाती
आज रे सृष्टी, महादेव, नंदी
सर्वच आनंदी, चिंबचिंब
आनंदची 'घ्या' रे, आनंदची 'द्या' रे
आनंदाचे वारे, वहाताती
बाबांच्या कडेवर, आबांच्या खांद्यावर
कधी डोक्यावर, बाळराजा
डोळ्यांची पाखरं, करीती भिरभिरं
कुतुहल अपार, मनामधी
नेहरू सदरा, नेहरू पायजमा
साथीला लवाजमा, बाळराजाचा

डोक्याला फेटा, काठी मुठीत
गालावर तीट, हासतसे
हंबाच्या पाठीला, मोरपंखी स्पर्श
बाळाचा हर्ष, माववेना.

मरीआईच्या देवळा, गाव झाले गोळा
हंबा हाती धरीला, अेकेकाने
आले रे पाटील, आले रे तलाठी
हातात काठी, घेवोनिया
आले सरपंच, आला वाडा, वाडा
हर्षाचा घडा, भरलेला
आले गावकरी, गावकामगार
थाट हो अपार, सर्वांचाच
जमले जमले, सगळे जमले
हे ते राहिले, तेही हो आले.
इन्द्रधनुष्याचे, रेखिले रंग सात
तोरण दारात, नभाच्या रे
ऊन हे सोनेरी, केशरी या सरी
गंधमय लहरी, आल्या आल्या
सावध सावध, मुहूर्त साधा रे
सर्व 'लक्ष द्वारे', बाराकडे.
झाला बंदूकीचा बार, हंबा धावे फार
केली खूण पार, सहजची
वाजे वाद्यवृंद मेळा, गुलाल उधळा
सारे हा सोहळा, पाहताती
जे कारे पडले, उठोनी धावले
त्यांच्या सह हसले, सर्वजण
फुटला फुटला, पोळा हो फुटला
गाव मग बोलला, हर्षूनिया.

देवांच्या देवाला, शंभो महादेवाला
आणि नंदीदेवाला, नारळ फोडू
मंत्रांचे पठन, हंबाचे पूजन
सुग्रास भोजन, नंदी देवा
आली घरधणीन, हंबास ओवाळून
पुष्प पत्र वाहून, हात जोडी
आणि घरधनी, हरखून मनी
नेत्रनिरांजनी, ओवाळीतो
बाळ कौतुकाने, वाहो पुष्पपाने
हंबाच्या भोजने, तृप्त होई.

आज माझा बाळ, काऊ–चिऊ भूलला
मुखी घास दिला, नंदीदेवा
तूचि रे बाप, तूचि रे आई
किती उतराई, होऊ देवा.
आम्ही भूमि पुत्र, तू सांभाळ रे सूत्र
मग आनंद सर्वत्र, तिन्ही लोकी.
देवा तू महान, तुझे गुणगान
आम्ही रे अजाण, नंदीदेवा
भक्तीची पाकळी, करी जवळी
सर्वांना सांभाळी, नंदीदेवा.

या ग या लहरींनो, या ग या सरींनो
या रे या किरणांनो, या या इथे
या रे या फुलांनो, या रे या फळांनो
या ग लता वेलींनो, या या इथे
या रे या मेघांनो, या रे या खगांनो
साऱ्या चराचरांनो, या या इथे
या रे या गीतांनो, या रे या सुरांनो
या ग भावनांनो, या या इथे

या रे गात गात, तुळशीच्या वनांत
माणूस माणूस, पहा पहा
चैतन्याची पूजा, चैतन्याची आरती
चैतन्याची भक्ती, चैतन्यचि करी
यारे या सारे, हा माणूस पहारे
खूण ही जपारे, चैतन्याची
या पोलादी बाहूत, दगडी छातीत
धारा वहातात, चैतन्याच्या
धरती नटली, सृष्टी ही सजली
अमृताच्या पखाली, हाचि वाही.

हाची चक्रधर, हाचि हलधर
हाचि जलधर, हाचि हाचि
हाच रे गोकुळ, हाच रे गोपाळ
हाच कृष्ण बाळ, हाचि हाचि
चैतन्याची जात, चैतन्याचा धर्म
चैतन्याचा पंथ, गोपाळ गोपाळ
अेक याची जात, अेक याचा धर्म
अेक याचा पंथ, गोपाळ गोपाळ
शतभावांचे तुषार, हर्षाचे तुषार
अमृताचे तुषार, गोपाळ गोपाळ

या नाना, अण्णा, या दादा भाऊ
प्रसाद हा खाऊ, देवाचा रे
मोठ्यांची पंगत, छोट्यांची संगत
त्यांची ती गंम्मत, वेगळीची.
पुरणपोळी खीर, वरती तुपाची धार
तृप्तीचा ढेकर, अन्नब्रह्मे
नंदीचा कृपाग्रह, आईचा आग्रह
गजबजले गृह, आनंदाने

मध्ये नंदी येती, नैवेद्य ते खाती
नारळ आणि हाती, गोपाळाच्या

म्हणे आज आहे पोळा, हृदयी दाटतो उमाळा
आसवांच्या माळा, डोळ्यांमधी

बाळ गेला सुदूर, दूर अनंतात
मी दुःखाच्या खाईत, चूर चूर

आजवरी हंबा, बाबांचा तू केला
मध्येच का रे गेला, राजहंसा
गाव, घर दूर, गेला तू सुदूर
मनी हे काहूर, साहवेना

गेले माझे बाल्य, गेले बालपण
मागे मी राहून, काय करू
गेले माझे खेळ, गेले रे खेळणे
कशास जगणे, अेकट्याने
वासराविना गाय, लेकराविना माय
देवाविना देवालय, स्मशानच
मीही येतो बाळा, तुझ्या रे मागुती
पुन्हा होऊ सांगाती, जन्मोजन्मी ○ ○

११ सप्टेंबर १९६९

# एक वाईट असतं

देव कळाल्यावर, एक वाईट असतं
त्याला दोष देता येत नाही...

आत्मा उमजल्यावर, एक वाईट असतं
त्याला गुन्हेगार म्हणता येत नाही...

चैतन्य समजल्यावर, एक वाईट असतं
त्याला वेठीवर धरता येत नाही...

चांगला असल्यावर, एक वाईट असतं ..
वाईटाला वाईट म्हणता येत नाही...

वेडं झाल्यावर, एक वाईट असतं
शहाणं कुणीच दिसत नाही...

शहाणं झाल्यावर एक वाईट असतं
वेडा कुणाला म्हणता येत नाही ..

या वाईटात एक वाईट असतं
झोडीत सुटतो माणूस दैवाला
या झोडपण्यात एक वाईट असतं
खदखदा हसतं दैव खुळ्याला... ○○

१२ सप्टेंबर १९६९

# अिथं माणूस दिसतो

पाषाणांच्या जीवनाचं जरी त्रुकतं सुकाणू
त्यांच्यातही असतात रे पाण्याचे अणूरेणू
पूर्व सुकृताचे शाप ते सारेजण भोगतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

आयुष्याची होवून जाते कधी निव्वळ निखळ माती
तापून विझते, नंतर भिजते, ऊब धरते अशी माती
त्या मातीतच बीजांना खरे डोहाळे लागतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

निखाऱ्यांच्या प्रकाशात वाटचाल केलेले
भयाण भुयारात दुःखाच्या, अश्रूंनी न्हालेले
त्यांच्याही वनात रे बाभुळी बहरतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

अंधारातही उठून दिसतो कलंक माथ्याचा
कलंकाला आसरा पुन्हा पुन्हा अंधाराचा
चक्राला चकवून जे वाट नवी धरतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

पोलादी साखळदंडानी कायेला ताडलेले
थंड शिळांच्या ढिगाऱ्यात असतात पिचलेले
त्यांच्याही मनामध्ये मोर थयथय नाचतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात ..

भांगेच्या रानातही गंध येतो तुळशीचा
एरंडाच्या मुळाशी कोंब लवलवे उसाचा
जहर हे घ्यालेले, अमृतबोल बोलतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

किती उसासे दुःखाचे, किती श्वास शेवटचे
किती सोबत अंधाराची, किती स्वप्ने अखेरचे
थंड या शिळा जेव्हा, स्वप्ने ती सांगतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

कुणी अभागी थकलेला, दिशाभूल झालेला
कुणी कंगाल, कफल्लक, वेडाने हरलेला
जेव्हा धीराचे दोन शब्द, वेद गाल असतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

यमनियमांनी असती जरी सर्वच बांधलेले
प्रारब्धाच्या सूत्राने जवळ दूर झालेले
माणूसकीचे सोनस्पर्श जेव्हा गीता सांगतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात...

आता बेरीज वजाबाकी, जीवनाच्या सायंकाळी
बेरीज असेल–नसेल, मात्र ऋण आहे माझ्या भाळी
अशी खुळी ऋणी माणसं, ऋण जेव्हा स्मरतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात..

माणसामधला माणूस शोधणे खोड मला जन्माची
या पाणपोईवर पाणी पीत धुंद-फुंद जगण्याची
या पाणपोया नेहमीच अवतीभवती असतात
अिथं माणूस दिसतो, अिथं माणसं रहातात .. ○○

२६ सप्टेंबर १९६९

# उमाळा

माझे रे चुकले
फत्तरा पुजिले
तन - मन दिले
देवा तुला...

लटकेच आज
शिव्यांची लाखोली
कशास हमाली
दिली मज...

आता तरी माझे
जीवनाचे ओझे
सांभाळ तू तुझे
नको मज...

दूर दूर उभा
हससि गुलामा
भक्ताचिया कामा
येशी म्हणे...

ये रे ये जवळ
पहा रे हे वळ
सांग तुझे बळ
गेले कोठे...

अंतर्बाह्य काळा
तुझा तोंडवळा
झाकसी उमाळा
म्हणूनी का...

मांडीयला आता
तुझ्याशी संसार
नटखट फार
पांडुरंगा...

○ ○

२६ सप्टेंबर १९६९

# रात

भर निद्रेत गूढ सृष्टी
स्वप्नी निरागस हासत असते.
अंधारावर वलये रेखित
खडे क्षणांचे रात झेलीते. .

प्रशांत सारे निरव तारे
निस्तब्ध रेखीव चित्र असते
स्मृतीधागे उसवित उसवित
रात रात्रपाळी करते...

कातर सुरात गात एकटी
रात बांधिते भाव हिंदोळा
वियोगाच्या आसवांना
हळूच पहाटे फुटतो डोळा... ○○

सप्टेंबर १९६९

# वेड

स्वप्नी शतसंभोग जडले
म्हणूनी का ते खरेची घडले
की स्वप्नी कोणी सुळी चढला
म्हणूनी तो खरेची मेला...

मृगजळी तैसा कोणी पडला
म्हणूनी का तो बुडून मेला
जे नाही कधीच घडते
वेडात परी ते खरे भासते...

सुप्त मनातील (अ) विचारांचा
क्षणाक्षणाला सतत कल्लोळ
दग्ध करीती मनास आणि
हे असंबद्ध अग्नीगोल...

शब्द स्वतःचे होती दुष्मन
जाणिवेशी उभा दावा
शब्दांचेही अर्थ वेगळे
आवाजाचा त्यात चकवा...

डोळ्यांचीही फंदफितूरी
असते काही दिसे वेगळे
नजर कुणाची छद्मी दिसते
काहीही म्हणती वाटे सगळे...

वर्तुळे डोक्यामध्ये पोकळ
हातापायांना होतो लकवा
जिभेस कोरड पडे तरीही
उभ्या जगाला लावे वणवा...

भिती भयानक नाकारतांना
अतर्क्य भलते कृत्य घडते
गर्द हिरव्या रंगावरती
लालजर्द जखम होते ..

दुष्मन होता स्वतःचा
स्वतःस करीतो नामशेष
वेड सरते आणि उरतो
लोंबणारा अवशेष...

कालक्रमे जाणिव येता
हे वेड दुःस्वप्न भासते
अर्धे मुर्धे काही स्मरता
अवशेषाची छाती पिचते... ○ ○

८ आक्टोबर १९६९

# गीत

नाहीस तू म्हणूनी हे गीत वेदनेचे
नाहीस तू म्हणूनी जीवन वैफल्याचे

नाही उरात उरली आशा अता कशाची
नाही ओळ झरली व्यथेविना मनाची
नाहीस तू म्हणूनी हे सूर अेकटचाचे
नाहीस तू म्हणूनी जीवन वैफल्याचे...

दिनरात गतकथेचा माग चालवितो
धागे तुझ्या स्मृतीचे ओलेते करीतो
वेड जडले मनाला तुज शून्यात शोधण्याचे
नाहीस तू म्हणूनी जीवन वैफल्याचे...

काही क्षणी भास आहेस तू जवळी
काही क्षणी स्वप्ने स्मरतात अवेळी
भान हरपतांना बळे बळे सावरण्याचे
नाहीस तू म्हणूनी जीवन वैफल्याचे...

लेण्यात हृदयीच्या शिल्प कोरलेले
जपतो जरी अता ते उध्वस्त जाहलेले
नाहीस तू म्हणूनी अवशेष हे स्मृतींचे
नाहीस तू म्हणूनी जीवन वैफल्याचे... ○○

३ नोव्हेंबर १९६९

# शिळा

मिटल्या मुठीत होती तारका उद्याची
हुंकारात पहिल्या ओळ भावगीताची...

कुतूहल हृदयीचे घेऊन नेत्रज्योती
नवथर कौतुकांचे जग शोधीत होती ..

भरला शिडात वारा डौलात नौका होती
निस्तब्ध पाकळ्यात स्वप्ने कित्येक होती...

पल्याड क्षितीजांच्या घेऊनी उंच भरारी
रोमरोमी पक्षांची ती दुनियाच न्यारी...

सुरात बासरीच्या पिसे मनात जडली
पान उलटतांना ती स्वप्नेच ठरली...

अर्ध्यात मूठ उघडी तारका नव्हे ती
शापित संचिताची ती शिळाच होती...

शिळेत शोधतांना अहल्येस निरंतर
प्रीतस्पर्शे पुन्हा कोरीन शिल्प सुंदर. . ००

२३ नोव्हेंबर १९६९

## छंद

आसवांचे काव्य आणि आसवांच्या ओळी
आसवांची फुले आणि आसवांच्या वेली...

आसवांचे देवघर आसवांचा देव
आसवांची आरती अन् आसवांचा भाव...

आसवांच्या संगमात आसवांचे तीर्थ
दूर जाशी कोठे ? काय भ्रमंतीत अर्थ...

आसवाच्या बिंदूला ब्रह्मांडही थिटे
आसवाच्या पुजाऱ्याला जगत्‌जेठी भेटे...

आसवाच्या जीवनाला आसवाचा गंध
आसवाच्या मनाला ठिपकण्याचा छंद... ००

२३ नोव्हेंबर १९६९

# खेळणं

अरे माझं खेळणं काय झालं ?
कुठे हरवलं ?
शोधतोय मी केव्हाचा
अजून कसं सापडत नाही ?
तुम्हाला का माहित नाही ?
माझं खेळणं कुणी नेलं ?
मला सोडून कुठे रमलं ?
कुठे गमलं ?

हा कागदांचा पसारा
चिंध्यांचा ढिगारा
उपसतोय केव्हाचा
शोध शोध शोधतोय मी
अहो खेळणं
माझं खेळणं
हे जुनं झबलं, हा सदरा, ही चड्डी...
कपाटाचा आडोसा
...पण..खेळणं काय झालय ?

ही शिट्टी...? ह्या गोट्या
हे खडू, पेन्सिलीचे तुकडे
कुणी फेकले इकडे तिकडे ?
  हा तांगा ..हा झुलता घोडा...
  हा हंबा...ही हंबागाडी...
    ही पोम् पोम्
चावी संपलीय तिची ? मग चावी दे ना
    चावीच हरवली वाटतं ?

सर्व वेंधळ्यासारखं काय करता ?
  ह्या नाचणाऱ्या बाहुलीचा
  पाय मोडला कोणी ?
  ही सायकल आडवी पडलीय ?
झुक झुक गाडीची चाकं गेलीत कुठे ?
  शोधा शोधा सर्वजण !
मी शोधतोय दिसत नाही का तुम्हाला ?

अरे, हा खाऊ इथं कसा ?
    आकूचा असेल
या खाऊला मुंग्या लागल्या की
आकू उपाशी राहील तर
खेळणं रागे भरेल ना।
    हे विमान–
असे मान मोडल्यागत काय पडलय ?
    त्याचे पंख. .?
ही गाडी.. वाजंत्रीनं भरलीय ?
    पण खेळणं गेलं कुठे ?
शोधा–शोधा–मी शोधतोय
मख्खासारखे काय उभे राहिलात ?
वेड्यांनो, झालय् काय ?
  माझं खेळणं काय झालं ?

तुम्हाला मदत करायची नसेल
तर खांबासारखे मुके उभे राहू नका.
आणि कृपाकरून माझ्याकडे पाहून रडू नका.
माझं हसरं खेळणं
माझ्या खेळण्याला रडणं आवडत नाही !
पण–माझं खेळणं कुठे गेलं ?
अवेळी अंधारलं वाटतंय् तरी–?
मला शोधलच पाहिजे
दुसऱ्या घरी– ! ○ ○

११ डिसेंबर १९६९

# मी स्टेग्नॉसॉरस

मी स्टेग्नॉसॉरस ?
अति प्राचिन काळाच्या उदरात
गडप झालेला
अवाढव्य आकार
प्रचंड विस्तार
पर्वतप्राय देह–
पाठीवर लोहाचे सुपाएवढे खवले–
शेपटावर शेकडो अणकुचीदार भाले–
डोळ्यात निखारे–
पोटात सल्फ्युरिक ॲसीडची धग
तोंडात ज्वालामुखी
श्वासात तप्त वादळी वाऱ्यांचे स्रोत
डोळ्यात सदैव भक्ष्याचा शोध !
सागर काठचे किरकोळ प्राणी
जिण्याची धडपड करतात केविलवाणी..
त्यांना
सहज श्वासातून ओढून
करवती दातांना
लांबसडक सुळ्यांना
त्रास न देता
जबड्याच्या पिंजऱ्यातून–
गळ्याच्या भुयारातून
ढकलतो पोटात

केव्हा केवळ गंमत म्हणून
जिभेच्या मैदानावर भक्ष्य
खेळवीत
चघळतो ओठात
रिचवितो
आणि
थांबवितो
त्यांचे श्रम जगण्याचे–!

या मुखाग्नीच्या ज्वालांनी
भरून जातो आसमंत
झाडे झुडपे जळून जातात ?
ही
धुंवाधार सतत वर्षा
ही
तप्त लोखंडी धरा
माझं काय वाकडं करू शकणार ?
एक शेपटीचा फटकारा
पुरे धरणीकंपाला
मी स्टेग्नॉसॉरस !
सर्व शक्तीमान मी– !
मी स्टेग्नॉसॉरस !!

...नजर जाते तोपर्यंत औषधालाही
चिटपांखरूं शिल्लक नाही
हा
भुकेचा डोंब !
हा
जड विशाल देह
सूतभर सरकण्याचं त्राण नाही
भूक–भूक–भूक– !

आग–आग–आग–!
बस्स !
भक्ष्य पाहिजे भक्ष्य !
या पोलादी सुळ्यांना
चढलाय गंज !
भक्ष्य
नाहीतर
नामशेष !
मी स्टेग्नॉसॉरस

अनभिषिक्त जीवसम्राट
आणि नामशेष– ?
हा पर्वतप्राय देह
पोटाची विशालदरी, हे बळ
आणि नामशेष ?
ही मुसळधार वर्षा
प्रलय–थैमान
कोसळणारे पर्वत
पालापाचोळ्यासारखे उडणारे वृक्ष
या चिखलाच्या टेकड्या
तसूभर हलता येत नाही
मी स्टेग्नॉसॉरस– !

गाडलो जाईन
या पहाडी थडग्यात !
पण–
नामशेष होणार नाही !
या प्रवृत्तीचा वारसा
याहीपेक्षा भयानक
चालवितील
पुढे कुणीतरी . . .

मासा !  मांजर !!  माणूस !!!
मोठे मासे लहान माशांना गिळतात
मांजर–
तर विलक्षणच !
गर्भाभोवती लाळ गाळीत
नऊ महीने
मिटल्या डोळ्यांनी
हवेत मिटक्या मारते !
वीतें आणि मटकावते !!
माणूस–
प्राणी श्रेष्ठ–अजिंक्य माणूस ?
त्याच्यात लपलेला माझा अंश
(मानवच नामशेष करीतो–मानववंश !)
मी स्टेग्नॉसॉरस

मी
नामशेष झालो नाही–
होणार नाही–
मी स्टेग्नॉसॉरस ! ?

○○

१२ डिसेंबर १९६९

# स्मृति

तुझा डाव रंगलेला
तुझ्या ध्यानीमनी नाही
दूर कुणी अनामिक
तुज निरखून पाही...

आज तुला पाहतांना
काळ माघारी वळला
गर्द घाव उरातला
हिरवाकंच पालवला...

आज तुला पाहतांना
हृदयात खळबळ
अंतरीची यातना
पाणावली अवखळ...

आज तुला पाहतांना
तुला न मी पाहिले
अंतरीचे ध्यासचित्र
तुझ्याठायी प्रकटले...

आज तुला पाहतांना
तुला न मी पाहिले
तुझ्या अनोळखी रूपात
रूप ओळखीचे दिसले...

आज तुला पाहतांना
तुला न मी पाहिले
स्मृतीत पांखराच्या
अश्रू दोन ओघळले ..

००

२१ डिसेंबर १९६९

# पंखा

पंखा म्हणजे पंखा इतुकेच मला कळते
कसे अचानक कळत नाही त्याचे पाते फिरते
क्षणाक्षणाला वेग तयाचा वाढतच असतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो . .

डोक्याच्या पोकळीत मजला वाटे त्याचे स्थान
अतर्क्य दुर्बोध विचारांचे जेथे माजले रान
आपोआपच विचार, 'सरकती' जेव्हा पंखा फिरतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो. . .

वस्तुवस्तुचे अर्थ विचित्र तैसे अश्लील दिसती
सुप्तमनातील सुप्तप्रतिमा बुजबुजाट करिती
अनर्थ चिकटती याला त्याला स्मरणात जो येतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो. . .

धान्याचे पोते फाटता दाणे जैसे गळती
सुप्तमनातील दुर्बोध विचार स्वैर तसे धावती
आवाजाचा देऊन चकवा शत आवर्तने घेतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो . .

या पंख्याला थांबविणे माझ्या नाही हाती
वा थांबणे तयालाही नाही कधी माहिती
कमीजास्त वेगे मात्र सतत तो फिरतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो. . .

पंखा वेगामध्ये असता, काही बोलतो वा घडवितो
मज भीतीने लकवा होतो वा क्रोधे उफाळत असतो
विकृत विचारांनी मजला क्षणी खिळवून तो टाकतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

सुरुवातीचे काही भासते, वेगात जाणीव हरपते
अंती काही घडून येता आवर्तने उशिरा कळते
पळापळाला गरगरणारी तो आंदोलने घेतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

विचित्र भास विचारांचे जड डोळ्यापुढे दिसतो
मम शरीर बदलते वा पाय अवचित लांबती
वस्तु वस्तुला आणि मजला रुपे नाना देतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

मीच मजला होइ वेगळा, माझ्यातुनी निघुनी
कुरूप विचार–प्रतिमा टाकती मजला वेढुनी
वेडात काही घडता नंतर तो संकेती बोलतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

कानी पडता कुरुप शब्द मज शब्दांचीही भीती
शब्दाशब्दांचे (अन्) अर्थ ओंगळ आणि मजला डसती
वा ओंगळ अर्थाचा चिखल तो कुणावरही फेकतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

वेडात भासला सदैव मजला 'तो' दुसरा कोणी
सतत वेडावुनी म्हणतो काहीही कोणी
बघणारा मज छद्मी हसतो, काहीही म्हणतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

आयुष्यामधि नग्नमनाने जे ऐकले वाचले
जाणिव नेणिवेत काही अनुभवले पाहिले
नग्न मनात अटळ विकृति नंतर जन्मला 'तो'
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

# पंखा

पंखा म्हणजे पंखा इतुकेच मला कळते
कसे अचानक कळत नाही त्याचे पाते फिरते
क्षणाक्षणाला वेग तयाचा वाढतच असतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो . .

डोक्याच्या पोकळीत मजला वाटे त्याचे स्थान
अतर्क्य दुर्बोध विचारांचे जेथे माजले रान
आपोआपच विचार, 'सरकती' जेव्हा पंखा फिरतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो . . .

वस्तुवस्तुचे अर्थ विचित्र तैसे अश्लील दिसती
सुप्तमनातील सुप्तप्रतिमा बुजबुजाट करिती
अनर्थ चिकटती याला त्याला स्मरणात जो येतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो . . .

धान्याचे पोते फाटता दाणे जैसे गळती
सुप्तमनातील दुर्बोध विचार स्वैर तसे धावती
आवाजाचा देऊन चकवा शत आवर्तने घेतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो . .

या पंख्याला थांबविणे माझ्या नाही हाती
वा थांबणे तयालाही नाही कधी माहिती
कमीजास्त वेगे मात्र सतत तो फिरतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो . . .

वेडात 'तो' चे नांव नंतर 'अनोळखी अधिकारी'
'तो' म्हणतो मजला काहीही वा भीतीने मारी
पंखा सरकवी विचार विकृत ते 'अधिकारी' ओळखतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

पंख्यासवे मी फिरतो आणि फिरते सारे
भिवविती 'अधिकारी' देतो शब्दांचे फटकारे
विरोध त्याला मनात करुनी मी थकुनी जातो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

परिस्थितीचे भान न उरते शुद्ध कशाची नसते
असंबद्ध विचारांनी भेदरता काहि तरी घडते
क्षणाक्षणाला दाबुनी मजला 'तो' भेडसावतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो ..

नग्न मनाच्या शापकारणे वेड जन्माला आले
'आजपावेतो' 'लोकांनी' जे अपशब्द त्यावर फेकले
भासले, विसरले, ते ते 'तो' जाणिवेत आणितो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

हरेक प्रसंग जाणिवेत येतो काही विकृती घेवुनी
'सरकणारे' विचार विकृत चिकटती त्याच त्याक्षणी
विकृत विचार ते वेडावुनी मज 'अधिकारी' सांगतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो ..

नग्न मनामुळे उद्भवलेले ('तो' चे) काल्पनिक व्यक्तिमत्व
वेडात मजला खरेच भासले घेऊन गेले सत्त्व
शरीर एकच जरी अमुचे, व्यक्तिमत्वेभिन्न 'तो'
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो ..

मेणाची बाहुली तयाने हस्ते दाबावी
'नाही' 'नाही' म्हणत मनी मी बोंब मारावी
सगे सोयरे नाती गोती 'बाहुली' बनवितो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

समजत नाही उमजत नाही आणि कसे कळणार ?
जाणिव नुरते, नेणीव येते काय मज कळणार
विकृत भास चक्कर यांचा पडदा धुके दाटतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

नेणीवेने जाणिवेला दाबून असे घडोघडी
नेणीवेने राज्य केले घडविल्या घडामोडी
दातेरी त्या चक्रामध्ये मी मात्र पिचून जातो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

जे पाहिले वा वाचले, ध्वनि ऐकले सहजतेने
वा अजाणता, अज्ञाताने जे जे टिपले नेणिवेने
भास, भ्रम, चक्कर देवुनी, हा नरक ओतितो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

माझ्याहुनी 'तो' वेगळा, माझ्यातच राहतो
विसंवादी सूर नेहमी ओकीतच असतो,
जाणिवेवर कुर्घोडी आणिक 'तो' करतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

आता 'तो' ची ओळख पटली काय उपयोग ?
नेणिवेने वेडात घडविला विचित्र दैवयोग ?
आता जाग आली तरीही विचार पंखा सरकवतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो ..

त्रयस्त जयाला मी समजलो 'अनोळखी आधिकारी'
'लोक' अथवा 'तो' न कुणी परी मीच वेडाभारी,
स्वतःचा झगडा स्वतःशी हात कपाळी जातो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

वेडाच्या खुणा आता स्पष्ट मजला दिसती
नेणिवेने असे घडविले मालविल्या ज्योती
विकृत विचार अजूनही झर्रकन् सरकतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

अता कशाला बात उद्यांची कशास अन् जगणे
जगणे याला म्हणणे म्हणजे प्रेताने हसणे
मृत्यो तू तर असशी दयाळू वाट तुझी पाहतो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो...

सारे कळते आता मजला तरी पंखा ना थांबतो
वादळ गेले तरीही अजुनी वावटळी उठवितो
काहीही करीत असता अजुनी पंखा विखार ओतितो
पंखा फिरतो आणि मजला फिरवित असतो... ○ ○

२९ डिसेंबर १९६९

## कमळ

शतवर्षांपूर्वी
अेका विशाल सरोवराच्या
पवित्र जलपृष्ठावर
डोकावली
अेक कमल कलिका.

चिखलात रुतलेल्या
आपल्या मुळांचा
क्षणभर विसर पडून
प्रातःकाळचे कोवळे सोनेरी किरण
अंगावर झेलणाऱ्या आजुबाजूच्या
वेली
डोळे मिचकावीत
आपापसात
कुजबुजल्या हळूच –
'आली ग आली'
'काय ?'
'ती बघ दूर अेक गंमत !'
'अग पण काय ?'
'कमलकलिका !'

'इश्य, त्यात काय विशेष ?–
या सरोवरात
कमलकलिका जन्मायच्याच !'
'वेडे ! प्रत्येक सूर्योदयाबरोबर –
प्रत्येक वायुलहरीबरोबर
प्रत्येक क्षणलहरीबरोबर
जिची जन्मप्रतीक्षा होती –
या सरोवराचा कणकण
डोळ्यात प्राण आणून
आतुरतेनं क्षणाक्षणाला
करीत होता जिची जन्मप्रतिक्षा
ती कमलकलिका आलीय
जन्माला ! !'

आणि –
त्या वेली डोलू लागल्या !
पाने टाळ्या वाजवू लागली !
जललहर अचंबळू लागली !
गंधित वायुलहर सर्वत्र शुभसंदेश
देत स्वैर धावू लागली ।

आणि –
रोज त्यांना अेक छंदच लागला !
सप्तरंगी सूर्यकिरणात –
शीत चंद्र किरणात
न्हाणाऱ्या
त्या कमलकलिकेची
बातमी न् बातमी
सर्वत्र सांगत सुटायची । ।
त्या कलिकेचं
सहस्रदली, सहस्ररंगी
प्रफुल्ल कमळात
रुपांतर झालं
तेव्हा तर सारी आनंदानं वेडी झाली ?

आणि –

प्रत्येकाच्या हृदयात कमळ ।
प्रत्येकाच्या डोळ्यात कमळ ।
प्रत्येकाच्या जिव्हेवर कमळ ।
प्रत्येकाच्या कानावर कमळ ।
प्रत्येकाचे पाय कमळसरोवराकडे
प्रत्येकाचं मन कमळवाढीकडे ।
सरोवराचा कणकण
दिनरात, क्षणक्षण –
गाऊ लागला – कमळ – कमळ ! !

दशदिशांना एकच नाद
अेकच छंद – कमळ, कमळ ! !
त्या विशाल दिव्य कमळाची
एक पाकळी सत्याची ।
दुसरी पाकळी अहिंसेची ।
तिसरी पाकळी मानवतेची ।
चौथी पाकळी बंधुभावाची ।
पाचवी पाकळी समतेची ।
सहावी पाकळी शांतीची
सातवी पाकळी सेवेची
आठवी पाकळी कल्याणाची ।
नववी पाकळी सत्याग्रहाची

आणि –

प्रत्येक पाकळी पाकळीतून
शब्द हुंकारला
'स्वातंत्र्य ! स्वातंत्र्य ! !'
साऱ्या विश्वातून –
प्रतिध्वनी प्रकटला
'स्वातंत्र्य ! स्वातंत्र्य ! !'
सरोवराच्या पृष्ठावर शततरंग निर्माण झाले ।

एका तरंगातून दुसरा तरंग !
शतलहरी निर्माण झाल्या –
एका लहरीतून दुसरी लहर !
आणि
एका प्रसन्न पौर्णिमेच्या रात्री,
स्वातंत्र्यचंद्रमा
स्वतंत्र, शीत किरणांनी–सरोवरास
न्हाऊ लागला –
प्रत्येकाच्या डोळ्यातून
आनंद वाहू लागला
ओठातून गाणे स्त्रवू लागले –
हात टाळ्या वाजवू लागले –
जिव्हा जयजयकार करू लागल्या
वृक्षावृक्षावर ध्वज उंच उंच चढू लागले
चक्रे वेगाने फिरू लागली –
– स्वातंत्र्याचा विजय असो !
– कमळाचा विजय असो !
पण
हा आनंद अल्पजीवी ठरला
कारण
अत्यानंदात काही माथी फिरली
रक्ताच्या नद्या वाहू लागल्या
आपल्या गळणाऱ्या प्रिय पाकळ्याकडे
व्यथित अंत:करणानं –
बघण्याची सवड होती कुणाला ?
बंधुभावना करीत जागृत
'शांती' 'शांती' करीत जप
थरथरत्या नजरेनं न्याहाळीत प्रेतांना
'पाणी' 'पाणी' असा आक्रोश करणाऱ्या
भावंडाच्या मुखात
अश्रुधारा ओतीत होतं ! !

– आणि त्यात पुन्हा काही दिवसांनी
हाःहाःकार झाला –
ते सहस्त्रदली, सहस्त्ररंगी, दिव्य, तेजस्वी
कमळ
परमेश्वराच्या चिंतनात असता –
अेका माजलेल्या रेड्यानं
निष्ठूरपणे चिरडलं
– सरोवराच्या पाण्याला
आग लागली ।
– माणुसकीच्या तोंडाला
काळोखी लागली ।
– भयंकर धरणीकंपात
हिमालय हादरला ।
– भयानक प्रलयात
सूर्य निखळला ।
– आकाशाच्या डोळ्याला
अश्रुधारा लागल्या ।
रेड्यालाही आशीर्वाद देत –
‘हे राम’ ‘हे राम’ उच्चारीत –
रामाचं प्यारं कमळ
रामाशी एकरूप झालं । ००

१८ फेब्रुवारी १९७०

# अरे, . . . पहा !

अरे, लोहधनू मोडलेस तू
पण माझी वज्रव्यथा वाकवून पहा
अरे, विषकुंभ रिचविलास तू
पण हा घोट अेक घेऊन पहा . . .

अरे, पाताळतळी असतोस तू
पण या व्यथेचा तळ शोधून पहा
अरे विश्वाचा भार तोलतोस तू
पण हा अश्रू अेक पेलून पहा . . .

अरे अवतार शेकडो घेतलेस तू
पण रूप माझं घेऊन पहा
अरे वृक्षाआडून वालीस विंधलेस तू
आता माझ्यासमोर तरी येऊन पहा . . .

१९७०

# वारकरी

अश्रू माझा भाव
अश्रू माझा देव
अश्रू हाचि राव
पंढरीचा...

हातांची करणी
कठोर वाणी
अश्रूची झरणी
धुवा देवा...

म्हणो कुणी मुका
अथवा रडका
अश्रू रे बोलका
गाभाऱ्यात...

गोऱ्ह्याचे रडणे
किंवा हंबरणे
सहजचि जाणे
गाय माय...

माझे विव्हळणे
मनी आक्रंदणे
अश्रू माझा जाणे
मायेपरी...

करी हा सांत्वन
शांतवो हे मन
जैसे स्तनपान
बालकासी...

डोळ्यांत पंढरी
मी रे वारकरी
ना टळो ही वारी
विठूराया... ००

१९७०

## हुरहुर

मातीचा मी गोळा
दिलासी तू डोळा...

मनीं होतो कष्टी
दिलीस तू दृष्टी...

तरी तू रे दूर
पुन्हा हुरहुर... ○○

१९७०

# भास

तुला विसरता येई न मजला
तव आठवण येते कसे म्हणू मी ?
जातांना तू तव श्वास विसरली
हे श्वासही माझे कसे म्हणू मी ?...

अजूनी अैकतो तव बोल कानी
हे श्रवण माझे कसे म्हणू मी ?
दिनरात प्रतिमा तुझिच नेत्री
हे नेत्रही माझे कसे म्हणू मी ?...

हृदयासनी तूच वैसली
हे हृदय माझे कसे म्हणू मी ?
गेलीस, पण ही प्रीति दिली तू
निर्दय तुजला कसे म्हणू मी ?...

भासात मज तू अशी गवसते
तुझिया संगे मी रंगतो
जाणिव येता परी पुन्हा
अेकाकी मी केवळ उरतो...

ही जाणिव होते वैरीण माझी
हे अंतर पोळते मग हृदयाला
वेड्यापरी मी दिशा धुंडतो
तुला शोधतो क्षणाक्षणाला...

तुजला आर्त साद घालून
तुडवितो मी हरेक वाट
होईल कधी मिलन अपुले
या भग्न जीवनाचा शेवट... ०० 

७ एप्रिल १९७०

## मासा

आता तुझी
कृपा नको
दया नको
माया नको
छाया नको
आता तुझी
कृपा नको...

म्हणे,
तू अेकचि
आहे कर्ता
तू अेकचि
करविता.
ठिक आहे !
ठिक आहे !!
तू शाश्वत
तू निर्माता
स्थिती आणि
लय कर्ता
बरं बरं... !

म्हणे,
हा अटळ
जन्ममृत्यू
यांचा खेळ !
असं, असं !!
म्हणे,
मृत्यूही
जीवासह
जन्मतोचि,
पाळण्यासह
कबरही
येतेचि !!
बरं बरं !!...

पण न्याय
हा कुठला
सांग मला
तू रे न्याय
हा कोठला...

ताज्या ताज्या
पिलासाठी
जिभेवर
मांजराच्या
खळबळ,...

मोठा मासा
गिळतसे
त्याचीच रे
पिलावळ ..

सांग सांग
तूच मला
असे न्याय
हा कुठला
उफराटा
न्याय असा
का निर्मिला
सांग सांग
तूच मला...

देतोस मृत्यु, ठीक आहे
पण–
माझाही प्रश्न एक आहे
तसाच का ?
कर्त्या अरे, करवित्या
अरे, निर्मात्या
तसाच का ?
तसाच का ?...

तूच तूच मला
वेडा वेडा केला
तूच रे वेडात
फसविले मला...

तूच तूच असा
टाकलास फासा
मला, मला केला
मोठा, मोठा, 'मासा'...

अरे,
सृष्टीच्या निर्मात्या
आणि नाशकर्त्या,
तुझी अशी कृति
गिळतो निर्मिती !
तूही सांगू कसा
मोठ्यातला मोठा
अेकमेव 'मासा'...

कुणी दुःखीत पित्याने
किंवा पहिल्या माश्याने,
तुला, पित्यांच्या पित्याला
तुला, विश्वनिर्मात्याला
असेल, हा शाप दिला,
आणि तूही मासा झाला

निर्मिती, पालन, लयकर्त्या
अरे, अनादी...अनंता
अरे, जनकांच्या जनका
अेक कधी विसरू नको
मला तोंड तुझं दावू नको
चुकूनही प्रसन्न होऊ नको...

तू पिता आहेस ना ? म्हणून शाप देतो तुला
माझ्या दुःखासम दुःख येवो तुझ्याही वाट्याला
जाळोत, रे तुझ्याही काळजाला
या, तुझ्या पुत्र वियोगाच्या ज्वाला
म्हणून तोंड दावू नकोस मला
म्हणून प्रसन्न होवू नकोस मला ..

अरे,
मासाही मासा
मांजर मासा
मानव मासा
दानव मासा
तू आद्य मासा
माश्यांचा मासा
'देवमासा !'...

मला अधिक ताप देण्याची
शक्ति तुझ्यात नाही रे...
माझ्या असीम दुःखानं
तुझ्या शक्तीच्या सीमा रेखिल्या रे !!

केवळ माझ्याच मनींच्या
माझ्याच प्रश्नाचे घणांवर घण
अेकाच प्रश्नाचे रात्रंदिन
शेकडो, शेकडो प्रतिध्वनी पण !!
तसाच का ? तसाच का ?
मी मोठा मासा झालोच का ?
हेच शल्य, हेच व्रण
हेच पुन्हा पुन्हा स्मरण
हाच प्रश्न विचारी पुन्हा पुन्हा मन
मोठा 'मासा' आहे हा 'प्रश्नही' पण !!

बाकी मग
काही नाही
तूही नाही
मीही नाही
हाही नाही
तोही नाही
हेही नाही
तेही नाही
असं नाही
तसं नाही
बाकी मग
काही नाही
काही नाही ..

आता तुझी
कृपा नको
दया नको
माया नको
छाया नको
काही नको
काही नको !! ...

२० मे १९७०

# हा माणूस झोपलाय्

हा माणूस झोपलाय्
त्याला आता उठवू नका
हा जळून विझलाय्
त्याला आता पेटवू नका...

हा माणूस मिटलाय्
त्याला आता फुलवू नका
गळालेल्या पाकळ्यांना
वृथा आता जोडू नका...

हा घरी पोहोचलाय्
दारी त्याला ओढू नका
हा आता हसतोय्
तुम्ही उगाच रडू नका...

शोषणा झाली जन्मभरी
घोषणा आता देऊ नका
हा होता पायतळी
खांद्यावर आता घेऊ नका...

हा अगदी अेकटा होता
गर्दी आता करू नका
हा स्वतःला विसरलाय्
याद याची काढू नका... ०○

२० जून १९७०

# ...चं घेऊन बसलात काय ?

सागर तृष्णा शमवित नाही,
मृगजळाचं घेऊन बसलात काय ?
काटे गुलाबाला आहेत,
बाभुळीचं घेऊन बसलात काय ?

देव देवळात नाही तिथं,
संसाराचं घेऊन बसलात काय ?
शहाणादेखिल वेडा जिथं,
वेड्याचं घेऊन बसलात काय ?

डाग सूर्यावरही आहेत,
चंद्राचं घेऊन बसलात काय ?
अरे, तो विठ्ठलदेखिल काळा आहे,
कोळश्याचं घेऊन बसलात काय ?

२० जुलै १९७०

## हात

या हातांनी कळी खुडली
या हातांना सुळी चढवा
या हातांनी आग लागली
या हातांची होळी पेटवा...

फुत्कार विषारी या हातांचा
धिक्कार असो या हातांचा
हे हात नुरले अता कुणाचे
कुणी न उरला या हातांचा...

या हातांची अघोर करणी
प्रित आणि पुसली निशाणी
या हातांना फटके मारा
शंभरास दहा मोजूनी ..

हे हात वेडे शुद्धीवर आले
पापांचा पाढा वाचू लागले
कधी कुणाच्या मनास छळीले
कधी कुणाचे घर पेटविले...

पश्चात्तापे दग्ध जरी हे
वणव्यात पुन्हा फेका यांना
लाव्हारसाचे चटके देऊन
सोलून काढा ह्या हातांना

या हातावर खिळे ठोका
तलवारीने छाटून टाका
या हातांना उखडून फेका
करवतीने कापून टाका...

हे हात करंटे घेऊनी आले
शाप अश्वत्थामा, वाल्याचा
नकाच देऊ या हातांना
उःशाप राम श्रीकृष्णाचा... ○ ○

४ जुलै १९७०

## जखम

जखमी मंदीर
जखमीच मूर्ती
जखमी पुजारी
जखमीच भक्ती...

जखमीच विश्व
जखमीच सृष्टी
जखमी सांगतो
जखमीच गोष्टी

अेकरूप दोघे
जखम, जखमी
खेळात जाह्ली
जखम जखमी...

जखमी ही वाट
जखमी वळणे
जखमेसंगती
जखमीने जाणे... ○ ○

४ जुलै १९७०

# आता उजाडेल

आता उजाडेल
रात्रभर तळमळत,
ज्या पहाटेची तू प्रतिक्षा करीत होतास,
ती पहाट आता रुणझुणत येईल
स्वर्गीय रंग उधळत येईल
फुले फुलवत येईल
चैतन्य गीत गात येईल
अमृताचे सडे शिंपीत येईल
...आता उजाडेल !

आता उजाडेल
ज्या पांघरुणात तू स्वतःला
लपेटून घेतलं आहेस,
ते सोडून दे.
सहजपणे
कारण –
आता उजाडेल !

पूर्वेला दृष्टी अचल ठेवून
मान उंचावून,
गळा फुगवून
आरवणाऱ्या त्या कोंबड्याची बांग
तू अैकलीस का ?
तो डौलात उभा आहे
मागची बोटं अधांतरी सोडून,
आणि पुढच्या पंजावर
जोर देवून
तो सूर्याला साद घालीत आहे,
केव्हाचाच
...आता उजाडेल !

आता उजाडेल !
हा झुळझुळ वहाणारा गार वारा
ही घरट्यातील पाखरांची किलबिल
ही वृक्षराजीतून घुमणारी हलकी शीळ
हे मंदीरातील काकड आरतीचे
मंजुळ मधूर घंटानाद
आणि दुरून येणारी
बासरीची सुरेल धून –
तू अैकतो आहेस ना ?
ही खूण अन् खूण सांगतेय्
आता उजाडेल –

रात्रीचा काळोख आठवतोस कशाला ?
त्या काजळी धरलेल्या क्षणांनी कुढतोस कशाला ?
मिलनाच्या त्या संकेतस्थली तुला जायचय् ना ?
मग उठ,
आता उजाडेल !

तू बर्फासारखा घन अस
की जलासारखा प्रवाही अस
की बाष्पासारखा विदेही अस
त्या महासागराचं घनगंभीर संगीत,
तू ऐकतो आहेस ना ?
आता तर सूर जुळले आहेत.
सिंधूशी अेकात्म होउन बिंदूनं सिंधू होण्याचे – !
ते सागरसंगीतही सुचवतय्
आता उजाडेल ।

आता उजाडेल
नीट निरखन बघ
अंधारात जो झरोका
अस्तित्वशून्य झाला होता
त्यातूनच आता आकाश
नितळ उजळलेलं दिसतय्

तो बघ,
मधुरसाच्या लोभानं कमळात
कारावास भोगणारा भ्रमर आता मुक्त
झाला आहे.

अरे ऊठ, आता उजाडलं आहे
आणि तूही पांघरूण फेकलं आहेस–
मग तर खरच आता उजाडलं आहे ! ○ ○

१२ जुलै १९७०

# नशिब

अेखाद्याच्या छातीवर
शिल्प शुभ्र पाषाणाचे
आसवांची फुले आणि
कोरलेले नांव त्याचे...

अेखाद्याच्या छातीवर
असे मूठभर माती
ढुंकून ना पाही कोणी
मातीखालची ही माती!...

अेखाद्याच्या छातीवर
कोल्ह्या कुत्र्यांची पंगत
घारी गिधाडी फिरती
टक लावूनी मजेत!... ○○

२० जुलै १९७०

# बाभुळीची फुले

उद्यानी फुलतो गुलाब, मोगरा, जाईजुईही तशी
शेवंती, रातराणी, चमेली स्वप्नांशी खेळती
सरोवरात कमळ असते निजरंगात रंगलेले
सोडूनी तयांना कोण धरील हृदयी ही बाभुळीची फुले ! . . .

ना सुरंग, रूप, गंध, मकरंद तेथे भ्रमर कसा येईल ?
मिळता अमृततुल्य मधुरस कोण घोट कडू घेईल ?
कोण माधी घेईल उन्हे, सोडूनी चैत्रातील चांदणे ?
कोण गुहेत शिरेल दिसता प्रासाद ते देखणे ?

आकाशी असती कितीक तारका ग्रहगोलही तसे
चंद्र, रवि, शनि, मंगळ, ध्रुव गुरुही तसे !
शुक्र, सप्तर्षि, धुमकेतू, शत नक्षत्रांच्या माळा
सोडूनी बरे कोण पाहील या विझलेल्या उल्काशिळा . . .

निखळता तारा प्रतापी, उल्का म्हणती त्यासी
दुर्दैवे जर जळून उरला तर अशनी अवशेषासी
साम्राज्य इथेही जिकडे तिकडे संगमरवराचे
अशनी शिल्पून कोण बांधील मग मंदीर देवाचे . . .

माझ्या बाभळीच्या फुलांनो, अशनी शिळांनो
आतल्या डोळ्यांनो, वंचित बाळांनो
येईल, येईल, निश्चित येईल, गात भाविक गाणी
प्रेमभरे ओंजळ भरता पडाल प्रभूचे चरणी . . ०  ०

२० जुलै १९७०

## खोड जुनं

धडपड करता येत नाही
अशी देहाची पडझड झाली आहे !
हातून वर्षांचे गेले बंदे रुपये
चिल्लर वरकड उरली आहे !

पुर्वीचा दरारा राहीला नाही
पोरं आजकाल मातली आहे !
कोणी काही अैकेना तरी
बडबड मात्र चालली आहे !

रात्री गडबड सर्व झोपून गेली
पण अडगळ मात्र जागी आहे !
ओठातल्या ओठात पुटपुटत
तडफड काहीतरी चालली आहे !

काळउंदीरानं खडबड करीत
पहाटे अखेरचं कुरतडलं आहे
श्वास मेघांची मघा गडगड झाली
तेव्हाच खोड जुनं उखडलं आहे ! ००

१५ सप्टेंबर १९७०

# जर

सूर्य तर अनेक पाहीले
चंद्राची तर गणतीच नाही
गणती करूनही काय करायचे ?
जर काजवाही झालो नाही...

महाकवी तर अनेक झाले
कविवर्यांची गणतीच नाही
गणती करूनही काय करायचे ?
जर शब्दही माझा फुललाच नाही...

आम्रवृक्ष तर अनेक झाले
वट-पिम्पळांची गणतीच नाही !
गणती करूनही काय करायचे
जर रोपानं मूळ धरलच नाही...

गणितज्ञ तर अनेक झालेत
हिशेबींची तर गणतीच नाही
गणती करूनही काय करायचे ?
जर 'अेक' ही माझा झालाच नाही !

असं काही झालो नाही,
तसं काही झालो नाही
गणती उगाच काय करायची
जर काहीच आता व्हायचं नाही ..

○○

११ आक्टोबर १९७०

# तुटलेला तारा

आकाशाच्या प्रांगणात मजेत तेजत असता
धरेवरती सहज कधी पाषाण मजला दिसता
मी गर्वभराने फुगूनी त्यासी धिक्कारत राही
रे, धोंड्याच्या जीवनाला अर्थच काही नाही ! . . .

मी चकाकतो पहा किती रे पहा माझी दिप्ती
विश्वाचे मी भस्म करीन रे इतुकी माझी शक्ती
कृपा माझी म्हणूनी तुमची वाट उजळली जाते
चराचरांचा मीच स्वामी, साम्राज्य हे माझे . . .

ना तेजस्वी, ना तपस्वी असे तुम्ही पाषाण
ना चेतना, ना जीवन नसे काही प्राण
उगाच अपुले रडता भडता ढिम्म पडूनी असता
कर्महीनांना रोज द्याव्या मोजून शंभर लाथा . . .

असे पाषाणांना हिणवायाते झेप घेता पृथ्वीकडे
सहज वळूनी मी पाहीले दूरस्थ तारका समूहाकडे
दूरस्थ त्या काजव्यापरी मोहि निरुपयोगी ठरलो
तुटलेला तारा मीही हाय ! पाषाण होऊनी पडलो . . .

○ ○

१९७०

# निखारा

मी न पारा, मी न हिरा, मी न चमकता तारा
मी तर केवळ सर्व दिशांनी, जळता एक निखारा...

मी न सूर्य कुण्या कुलातील
मी न चंद्रमा कुण्या नयनातील
मी न कुणी दिवा अथवा
मी न कुणी काजवा
मी न विद्युत्‌रेखा अथवा मी न सतेज धारा. .

मी न स्वप्न कुणा पडलेले
मी न रत्न कुणी चितलेले
मी न मोती कुण्या गळ्यातील
मी न ज्योती कुण्या हृदयातील
मी तर ज्वालेविना वणवा, मी न कुणा आसरा...

मी न फूल जास्वंदीचे
अथवा कोमल केतकीचे
मी न अलंकार सौभाग्याचा
शृंगार अथवा लावण्याचा
मी न कुणी रंगोल वा गुलाब कुणी गोजिरा ..

कर्पूरापरी भाग्य न माझे
गंधवीत जग जळून जायचे
साथ अधुरी प्रीतज्वालेची
नंतर सोबत नित विरहाची
वियोगाचा रुते निरंतर, लखलखणारा सुरा... ००

१९७०

# असणे काही असेचना

ही वाट अशी पायतळी की,
चालणेही जमेचना
अंधारी ही रात अशी की,
किरण कोठे दिसेचना...

ही भूल अशी घडली की,
दिशा काही कळेचना
वैफल्याची रास अशी की,
शीग काही ढळेचना...

फोसळणे हे असले की,
सावरणे काही जमेचना
मिटणे हे असेच की,
फुलणे काही फुलेचना...

उन्मळणे हे असले की,
उठणे काही जमेचना
नेणिव ही असली की,
जाणिव काही जाणवेचना. .

हे जीवन झाले असले की,
जगणे काही स्फुरेचना
हे असणे आहे असले की,
असणे काही असेचना... ००

१९७०

# खेळी

कुठे राख तर कुठे रांगोळी
होळी कुठे तर कुठे दिवाळी...

कुठे वन तर कुठे उपवन
कुठे बाभूळ, कुठे चंदन
कुठे पौर्णिमा कुशीत कुणाच्या, कुठे रात्र काजळी...

कुठे सागरा भरती येते
कुठे मृगजळ कुणा चकविते
तुषारास्तव तृषार्त कोठे, धरतीवर कोसळी...

कुठे मिलन पाखरांचे
कुठे तुटते नाते नाळेचे
कुठे हितगुज प्रेमिकांचे, कुठे आसवांच्या ओळी...

कुठे खरेचि स्वप्न जगते
कुठे जगणे स्वप्न ठरते
पायतळीचा घेई लाव्हा, कुठे उंच उसळी...

कुठे प्रीतीचे दीप तेवती
कुठे हाती भग्न पणती
गंधशीतल लहर कोठे, हवा कुठे वादळी...

कुठे प्रीतीचा डाव मांडता
क्षणाक्षणाला खेळ रंगता
मध्येच अवचित काळ येऊनी, खेळूनी जातो खेळी... ००

३० आक्टोबर १९७०

# फसवणूक

सणावारी आनंदाचा पाऊस जिथे पडणार आहे
जिथे जाऊन आज मी थोडा अभिनय करणार आहे !
सर्वांसह खूपखूपसा आज मी हसणार आहे !
आज मी स्वतःला मस्त विसरून जाणार आहे ! ..

करता आलं तर मनाला, मी चूप्प करणार आहे !
आज देहाला मी मात्र खुशाल फुगे बांधणार आहे
चालता आलं हवेतून, तर थोडा चालणार आहे
मीच मला उडतांना थोडा अनोळखी होणार आहे...

झोपलेल्या शब्दांना, मी जागं करणार आहे
आज गळ्याच्या चरख्यानं सुरांचं सूत कातणार आहे
आज जीभेची मान धरून नवरसात बुडविणार आहे
आज दोन्ही हातांनी मी ढोल बडविणार आहे....

आंसू आवरून उरातले, आज मी हसणार आहे
असं कुणाला फसवितांना आज मीच फसणार आहे. ○○

४ नोव्हेंबर १९७०

# सुधारणा

धीर कुणाला देता देता,
मीच मनात खचत असतो.
भूतकाळातील खड्यांना,
वरचेवर झेलीत असतो...

सावरतांना कधी कुणाला,
मनास आवर घालीत असतो
पाया तरीही वाळूचा,
आतल्या आत ढळत असतो !

अश्रू कुणाचे पुसतांना,
मी कोठे भानावर असतो ?
अेक अेक घाव आत,
हिरवा हिरवा हुंदका देतो

दाखवून बोट माझ्याकडे
अेक दुसऱ्याला सांगत असतो
पूर्वी हा वेडा होता,
आता सुधारलेला दिसतो ○○

१९७०

# वचनं

चितेवरती जळे निरंतर मैफील स्वप्नांची
जीवनाच्या वेलीस लागली फुले वैफल्याची...

सांगितलेस नाते मजला जन्मोजन्मीचे
तू ना पाळीले वचन अवघे दोन दिवसांचे
जा, कळली मजला प्रित तुझी अन् रीत दुनियेची...

ठाऊक नव्हते असेच असते मोल शब्दांचे
तुझ्याविना हे ओझे आता फोल जगण्याचे
वाऱ्यावरती कोरलीस लेणी शब्दशिल्पांची...

तुटल्या ताऱ्यापरी भोगतो शाप पाषाणाचा
अर्थशून्य या दिशा दाही, सूर्य माथ्यावरचा
ओढ मजला मनी लागली तुझिया वाटेची... ○○

१९७०

# पेला

माझा जहराचा पेला तुझ्या ओठास लागला
आणि माझ्या व्यथेला नवा अंकूर फुटला
दैवाने केला असा घात साथ तुझी अंतरली
विझले दीप सारे रात उरात दाटली...

निखळला सूर्य आणि वेडावल्या दाही दिशा
स्वतःलाही विसरलो झाली अशी माझी दशा
चक्रावले मन माझे भान नुरले कशाचे
कधीच सरले बळ आभाळ तोलण्याचे...

फसगत झाली अशी जळतो मी क्षणोक्षणी
पक्षी घोटाळतो आणि अनंतात जाय पक्षिणी
कासाविस तुझ्याविण जगण्याचा शोण झाला
अंकूरल्या व्रणांनी पेला रिता पुन्हा भरला...

१९७०

# मुखवटे

जग हे मुखवटयांचे...
कुणी जळतो उरी निरंतर
घाव, झेलूनि तोडी अंतर
परी गातो कुणासाठी, गीत हास्याचे...

सुखाभास निर्माण करूनी
जातो कुणी ज्वालेमधूनी
कुणासाठी तरी सोसतो दुःख जखमांचे...

कुठे अभिनय असे प्रितीचा
चेहरा उसना कुठे नितीचा
असेही चालती उफराटे, खेळ दुनियेचे...

पैसा पैसा कुणी जपतो
अधर्म करणी रोज करीतो
दानशूर हा मग बांधितो, मंदीर देवाचे...

गरीब गरीब कुणी म्हणवितो
गरीबांचे परी गळे कापितो
सज्जनाचा भाव वरूनी, आचार दुर्जनांचे. . ०० 

१९७०

# असेच जुळते नाते

झुळूक अवचित गंध शोधित शीळ घुमवीत येते
दोन दिसांच्या वाटेवरती असेच जुळते नाते...

अनोळखी ही वाट आणिक अनोळखी गाव
अनोळखी मुसाफिराला नसते काही नाव
अनोळखी डोळ्यात रूजती ओळखीचे भाव
त्या नजरेमधूनी सहजस्फूर्त ही प्रित पहिली फुलते...

नंतर दोघे अेकच असती घडता कोठे भेटी
अेकच गाणे सहज झरते दोघांचेही ओठी
इंद्रधनुचे रंग लाजती पाहूनी गहिरी दिठी
प्रीतिपुष्प हे विकसित होते, किरण कलिका भेटे...

त्या दिवसांना पंख फुटती क्षणी उडुनी ते जाती
कालगतीची दोरी असते अदृष्टाचे हाती
व्यथा सोसणे नंतर उरते अश्रूंचे सांगाती
अक्षयतेचे वरदान घेऊनी रात्र निरंतर येते... ०० 

१९७०

# आरसा

मी आरसा, मी आरसा

तुझे रंग जसे, रूप जसे
दाविन मी तुला तसे
तुझ्या हातावर, भाळावर
तुझ्या कर्माचे रे ठसे

तुझे खरेपण, खोटेपण
लहान वा मोठेपण
तुझे ज्ञान, वेडेपण
पाप पुण्याची रे खूण
पहा पहा माणसा...

तुझे सोंग, तुझे ढोंग
लपलेले नाना संग
तुळशीच्या आड जी रे
वाढविली आहे भांग

तुझी अंडी आणि पिले
तुझ्या आतडीची मुळे
किती खोल, किती दूर
तू आहे लपविले
पहा पहा माणसा...

तुझे खरे दात, खरे ओठ
पडजीभ तसे पोट
खरे पाय, खरे हात
तुझी छाया काळरात

तू कितीजणा फसविले
किती घास पळविले
किती श्वास दुखविले
किती फुलं तुडविले
फसवशिल मजला कसा...

तुझा रंग डांबराचा
आत अग्नि वासनांचा
तुझा डंख जहराचा
तुझा हात काळोखाचा

तुझे इंगळचाचे डोळे
वर आहे भोळे भोळे
परी आत पाप खेळे
भोग विषाची रे फळे
विसरलास मजला कसा...

तडलेला, टिचलेला
काचलेला, फुटलेला
दोष देशी तू मला
मी रे परि चांगभला

विचार तू प्रतिमेला
सांगेन ती खरे तुला
अरे तुझा तोंडावळा
तडलेला, सडलेला
नासलेला आंबा जसा... ○○

जानेवारी १९७१

## वढाळ ढोर

लई वंगाळ, वंगाळ बोलतं, लई तोंडाळ बाई हे दिसतं
अहो, वाऱ्यावानी हे पळतं, लई वढाळ ढोर हे दिसतं !

अहो, लेक लाडकी नवसाची मी मोठ्याच्या घरची
अन् उंबरठ्याच्या आतच झाले मोठी मी लहानाची !
अवं मजला काही ठाउक नाही शपतवार सांगते
अन् आता का बरं मनात माझ्या काहीच्याबाही येते !
अहो, मला हे ढुसण्या देतं, लई वढाळ ढोर हे दिसतं ! . . .

अवं देहाच्या या दनकट आनि बुलंद किल्ल्यामधी
मी मनास माझ्या समजत व्हते जनमठेपेचा बंदी !
अवं शिपायांना यानं चारली सपनांची चंदी
बघा सारे फितुर लागले याच्या की हो नांदी !
अहो, दावं तोडून हे पळतं, लई वढाळ ढोर हे दिसतं ! . . .

अहो हे वैर धरतं माझ्यासंग अन् रात रात छळतं
कानावरती शीळ पडता चुळबुळ हे करतं !
हे मळ्याच्या वाटेवरती खेचून मजला नेई
अन् जाते कशी मी माझं मजला काही कळत न्हाई !
अहो, लोढणाला घेऊन पळतं, लई वढाळ ढोर हे दिसतं ! . . .

कसं बाई चेटूक करतं अन् चटका लावतं मला
भुरळ देऊनी चांदन्यात ते न्हाऊ घालतं मला !
अवं डोळे कुनाचे माझ्यासंग लई लई बोलती
लाज लाजते तवां रानची गंधवती शेवंती !
अवं, हे उभ्या पिकामधी चरतं, लई वढाळ ढोर हे दिसतं ! . . .

कसा आवर घालू सांगा वढाळ या ढोराला
चोरवाटा माहीत याला अन् चोर ठरवितं मला !
तेच वैरी झालं भुलता वैऱ्याच्या नजरेला
अन् काय करता येईल सांगा मला अेकटीला !
अवं, दारची वोढं हे धरतं, लई वढाळ ढोर हे दिसतं ! . . . ○ ○

१९७१

# भरतीच्या लाटेसंगे

पुसणं टुसणं काही नाही तरी येतो निमित्तानं
भरतीच्या लाटेसंगे जाते मीही वाहून !...

मी तर बाई कुलवंताची लेक असे
लोकलाजेची मनात मजला भीति असे
धटींगणाच्या धिटाईला तर वेळ नसे
तुला पाहता रे जाई, भान हरपून...

अशी कशी ही मुलुखाची रे शिरजोरी
हवीहवीशी जरी तुझी रे बळजबरी
कुठे जाण्याचीही झाली मज चोरी
घरीदारी बघती सारे, डोळे वटारून...

मध्येच सोडुनी कधी मला रे जाऊ नको
चरणावरच्या या फुलाला तुडवू नको
लटके हसुनी उगाच मजला फसवू नको
ओवाळीन तुझियावरूनी, सारे त्रिभुवन... ○○

१० जानेवारी १९७१

## स्वप्नभूल

आज बागेतील रंभा का स्वयेंचि लाजली
पाहुनिया पाण्यात बिंब पापणी का मोडली...

झुळझुळु पाणी वहाते, का नवे गुज सांगते
आज अपुल्याचि रूपाला, का दृष्ट अपुली लागते
दर्पणी देखणी प्रतिमा, का अशी बावरली !...

रूपगर्विता ही कुणी, का जलक्रिडा खेळते
स्वप्नभूल आज नेत्री का तिच्या अंकुरते ?
मोतियांच्या तुषारांनी ओलेती ही शोभली...

काय वेडे वेड जडले का तिला हे उमगले
की लहरींनी हळूच कुणाचे निरोप आज सांगितले
की कुणाच्या दर्शनाने आज ही मोहरली... ○○

२५ जानेवारी १९७१

# संभ्रमित

हरविले ते शोधित का मी, आलो भलत्या पथा ?
नावे का ठेविता, मजला, नावे का ठेविता ?

दूर धुक्यातुनी प्रिया हसते
हाक देऊनी ती खुणविते
तिकडे माझे पाय वळता, मजला का रोधिता ?

आर्त सूर ते दुरुनी येती
ते भाव मनाला व्याकुळ करीती
मी नाव प्रियेचे घेता घेता, वृक्षलता कवळिता ?

चांदण्यांची लेवूनी वसने
प्रिया गाते नवथर गाणे
मूर्तिमंत ती उभी तरीही, अमूर्त का म्हणता ?...

आभासाचे का हे विभ्रम
की प्रीतीचे नावचि संभ्रम
मी अेकान्ती हितगुज करीता, का हो मज हसता...

हसा, फत्तर मारा अथवा
खुशाल अपुल्या मना तोषवा
मदिरेवाचून मी तर उरलो, केवळ पेला रिता... ○○

२५ जानेवारी १९७१

# शस्त्रक्रिया

गुंतवितो मी मनास माझ्या, हसतो आणि पितो
सलणाऱ्या सखी शल्यावरती, शस्त्रक्रिया करितो...

विसरलेसे वाटे सारे, विसरलेसे तुला
स्मरणही सखी विसरलो, विसरे माझे मला
विसरलेसे वाटे परंतु, विसरणे विसरतो...

मीच मजला परका होतो, पुसता साऱ्या खुणा
मीच माझ्या घरात असता मीच मला पाहुणा
मीच माझ्या हातांनी या, थडगे हे बांधितो...

कीव माझी मजला येते, मीच मला हासतो
जगात जाता पुन्हा मुखाला, रंग मी फासतो
सरणाऱ्या या दिवसावरती, अेक फुली रेखितो... ○ ○

२७ जानेवारी १९७१

# पोरका

अेकही नसते रात्री तारका
मी असतो सुखास पारखा
मग दारी येतो दिवस परका
जणू माझ्यापरी तोही पोरका...

दिवस आपुलं नुस्त म्हणायचं
तो रात्रीहूनही भकास असतो
जणू दिवस बिचारा पळापळांनी
त्याचे दिवस कंठत असतो...

असतो उपाशी, नागडाउघडा
नसतो त्याला मुळीही चेहरा
लक्तरासम झिपऱ्या उडती
गळ्यात असतो 'बाबा' हसरा...

ओरडतो मी, नीघ अिथुनी
तू माझा कोणी नाही
तोंड काळे कर अिथुनी
मी तुझा कोणी नाही ..

तरी परका, दिवस पोरका
काऊचिऊचे गातो अभंग
शांतवलेल्या जलाशयी मग
हळूच उठतात भावतरंग...

तू परका, मी परका, तू पोरका
मी पोरका, तुला, मला कोणी नाही
अरे तू माझा, मी तुझा अन्
हळूच अेक हुंदका येई... ०○

३० जानेवारी १९७१

# मर्डर

मी माझा खून केला आहे !
प्रथम अेकदा, नंतर अनेकदा
चक्क खून –

प्रथम थर्रारलो, नंतर निर्ढावलो
आता तर करतो खुनामागून खून
मस्त झिंगून –

– आणि आता तर मी ढाण्या वाघासारखा चटावलो आहे
माझ्याच रक्ताला, खुनाला.

तरीही मी नेहमी निर्दोष सुटलो आहे –
टाळ्यांच्या कडकडाटात !
कारण माझा बुद्धीमान वकील
न्यायमूर्तींचेच हात बांधतो –
– त्याच्याच कायद्यानं !

खून, बलात्कार, फसवणूक, लाचलुचपत, चोरी, अफरातफर
माझ्या वकीलाला मुखोद्गत आहे –
तर मला हस्तगत – !
आता कोण भ्याड लेकाचा स्युसाईड करील ?
मी करतो, मर्डर !
तुम्ही – ?

○ ○

१८ फेब्रुवारी १९७१

# शर

चांदणे चैत्रातले हे, चांदवा हा पाहूनी
आठवांचा शर जातो, मृगहृदया विंधूनी...

कालव्याघ्र घेऊनी गेला, झेप मृगीवर घालूनी
पाडसांचा कळप गेला त्याच मार्गी विखरूनी
पाठलागी व्याध माझ्या, नेम आता साधूनी...

मिलनरात्री दाविला जो नभी तारा लाजूनी
वादळीही अचल तेथे ध्रुव आहे अजूनी
ज्या खुणांची ही कहाणी, त्या खुणा तारांगणी

साथ अधुरी देउनिया, जाहली तू हवा
दूर देशी उडुनी गेला, पाखरांचा तो थवा
संपली मैफिल सारी, साज मागे ठेवूनी...

चांदणे हे मज आता–शल्य होऊनी बोचते
हरविले ते गोड गाणे हृदय अेकटे रिते
दिवस भिजतो आसवांनी, रात्र होते वैरिणी ..

१९७१

## बाळा हाक कुणा मारू ?

अंगणातूनी स्वर्गी गेला माझा कल्पतरू
हाक कुणा मारू बाळा, हाक कुणा मारू...

सूर्य तेव्हा होता ढळला
अता राहुने चंद्र गिळला
धरतीवरती अंधाराचे, राज्य जहाले सुरू...

आरास होती तुझी मन्मनी
अभागिनीचा श्वास जीवनी
तुझ्याचसाठी बळे रेटिले, वैधव्याचे तारू...

पित्यामागुनी पोरही गेले
पुन्हा शिरावर वज्र पडले
खचून आता मोहि गेले, ढासळला रे मेरू...

वासराविन, गाय जैसी
लेकराविन माय तैसी
पक्षिणीला सोडून गेले, घरट्यातून पाखरू...

पिलावीन जशी पक्षिणी
पाडसाविन जशी हरीणी
तसेच झाले आई असूनी, अंतरता लेकरू...

वक्षी कुणाच्या मूल खेळते
माझ्यावर परि वीज पडते
माय लेकरू पाहूनी माझे, मन लागते झुरू...

तारकाविन गगन जैसे
बालकाविन सदन तैसे
स्मशान ते तर अता जाहले, काय तया मी करू...

फुलाविन उपवन जैसे
मुलाविन त्रिभूवन तैसे
वाळवंटावरी अशा मी, राज्य कैसे करू ?

वात्सल्य वक्षी जे साकळते
अश्रु होऊनी ते पाझरते
नेत्रसागरा भरती येते, ओटीस ओहटी सुरू...

ना उरले आई, उरली माता
अंतरता मज माझी ममता
आधार गेला बाळा आता, कुबडी कोणती धरू...

हातांचे हे नको पाळणे
इन्द्रासन वाटे लोभसवाणे
ऐरावताचे तिथे खेळणे-का म्हणूनी जाई लेकरू...

की पान्हा माझा उणा वाटूनी
चन्द्र पाझर देखणा गमे त्याहुनी
म्हणूनी गेला चकोर तेथे, बांधुन का घुंगरू ..

की अमृत आणि कुबेराची
संगत तैसी नील पऱ्यांची
विसरला रमूनी त्यातच बाळा, मी कसे विसरू...

जी न जहाली कधी जननी
भिकारीण ती विश्वस्वामीनी
मातृत्वाविन स्त्री ही उणी, तेच तिजला गुरू...

रूस हवे तर आईवरती
घेईन चुंबूनी हृदयी, पोटी
न तुटती रे नाळेची नाती, ये, परत ये कोकरू... ○○

३ एप्रिल १९७१

# रांगोळी

सरणावर चढलीस तू
जळालीस तू, गेलीस तू
इच्छा तुझी – !
पण
राख मात्र झाली माझी.

मग तू असं छळलं !
की मला अेक वेड जडलं
या राखेची रांगोळी काढण्याचं –

रांगोळी !
पण तिचा रंग राखेचाच
बाकी तिला रंग नाहीत.
(–आणि असतील कसे ? जातांना तू –
तुझ्यासंग सारे रंग घेऊन गेली नाहीस का ?)

अिथं उरला अेकच रंग
वैफल्याचा रंग–राखेचा रंग !
आणि मी ?
या शब्दांच्या चौकटीत –
एकाच भावनेच्या –
एकाच रंगाच्या –
वेगवेगळच्या रांगोळच्या रेखाटत बसलोय्.
कधीपासूनच . . .
कधीपासूनच – !

पण अजून नीटस रांगोळी जमत नाही.
किंवा जमलीशी वाटते
तोच वाटतं–छे ? जमलीच नाही !
दुसरी काढावी
अर्थात राखेचीच !!
आणि

हलक्या हातानं शब्द खोडावा –
रिमझिम बरसणाऱ्या वर्षेनं धुळीला अलगद पुसावं–
तस्स अगदी तस्सच –
मी आसवांनी ती अधूरी रांगोळी –
हळूवारपणे पुसून टाकतो !

–अन् कदाचित रांगोळी पूर्ण झालीच
तरी तृप्ती होत नाही.
मग पुन्हा दुसरी–
पुन्हा तिसरी–
तरीही अतृप्तच !
हे असं कोठवर चालणार आहे ?
खरच ग ! कोठवर चालणार आहे ?

तू असतीस तर–
मला हसली असतीस
नेहमी हसायचीस तशी–
मिश्किलपणे–
मान वेळावून धुंद कटाक्ष फेकीत–
खटचाळपणे.
तू किती सुंदर रांगोळी काढायचीस् ?
अनंत रंगछटांनी शोभणाऱ्या–
पिसासारखी
पहाटेसारखी !
इन्द्रधनुसारखी !
शिंपल्यासारखी !

अन् तुझ्या रांगोळीला ध्वनिही असायचा–
पानांच्या सळसळीसारखा
निर्झराच्या अवखळ प्रवाहासारखा
–इतकी सुरेल, बोलघेवडी रांगोळी मी दुसरी
पाहीलीच नाही !

आणि माझ्या रांगोळीला तर ध्वनि नाहीच !
असलाच तर आहे मूक–
बर्फाप्रमाणे गारठल्यासारखा !
गंधर्वाची वाचा गेल्यासारखा !

तुझं सारच वेगळं–
तुझ्या हृदयात रंगपंचमी खेळत असायची
अन् तू प्रत्येक लयबद्ध आविर्भावांची–
रांगोळी रेखाटत सुटायची–!
–त्या रेखीव, कातीव रेखा मला
कशा जमतील ग ?

अन् तुझ्या रांगोळीचं पोत तरी मुलायम
किती ?
थेट फुलपाखरी पंखासारखं
प्राजक्ताच्या पाकळीसारखं
किती हळवी असायची तुझी रांगोळी ?
नाजूक आणि प्रसन्नही–
तुझ्या गालावरील गोड खळीसारखी
लाजाळूच्या कळीसारखी
निळचा–काळचा आकाशपटलावर चांदण्यांची
रांगोळी खुलून दिसते ना ?
तशी !

तुजी प्रत्येक रांगोळी नेत्रपटलावरून
हसत हसत घरंगळत धावायची अन्
मनात खोल कप्प्यात दडून बसायची
कृपणाच्या तिजोरितील गुप्त धनासारखी.

तुझ्या कितीतरी रांगोळ्या मी पाहिल्या
पण–
राखेचीही रांगोळी काढतात हे मात्र मला
ठाऊक नव्हतं.
तू गेल्यावर हे कळलं.

कुंद काळ्याशार आभाळानं–
चांदण्याची रांगोळी पुसून टाकली–
त्या रात्रीपासूनच मी ही
राखेची रांगोळी काढतोय–

शब्दांच्या चौकटीत
अेकाच रंगाची
अेकाच भावनेची–
रांगोळी काढतोय
आणि काढत राहीन–
राखेत पूर्ण मिसळून जाईपर्यंत ! ○ ○

३ एप्रिल १९७१

# येऊ नको

तू मनात माझ्या येऊ नको
उगाच आता छळू नको...

का गेली सीमेपार
सोडोनिया माझे घर
कां गेली दूर दूर
शिरी ठेवोनिया भार

येता आठवांना पूर
घाली कुणी उरी वार
आता झाले चक्काचूर
माझे काचेचे हे घर
आता स्मृतीत माझ्या येऊ नको...

आता अेकटचा या राती
विझलेल्या साऱ्या ज्योती
माझा कुणी नाही साथी
वियोगाचा भोग माथी

तू येशी स्वप्नामधी
रोज अर्ध्यामुर्ध्या राती
परी पुन्हा नाही हाती
माझे डोळे पाणावती
आता स्वप्नात हुरहुर लावू नको ..

मी चालतांना, बोलतांना
निजतांना, उठतांना
हसतांना, रडतांना
पडतांना, झडतांना

तुझ्या स्मृतीचे मोहळ
भावनांचे हे वादळ
मला आणिते भोवळ
करी व्याकूळ, विव्हळ
तू मनात मुळी येऊ नको... ०२

८ एप्रिल १९७१

# प्रवास

इमानासी जागलो मी, जागतो जीवनासही
भोगिले मी राज्य, आता भोगितो वनवासही...

स्विकारूनी तुझे देणे, उन्हे अथवा चांदणे
पोळताही गायिले मी नित्य गाणे देखणे
हृदयी धरीले मी प्रवासी मृत्तिकाकनकासही...

देवूनी रे पंख तूचि, तव सुरीने कापिले
तव पूल अथवा फत्तराला आपुले मी मानिले
भोगितो अंधार हा मी, भोगिली आरासही...

बोल तुजला काय द्यावा, भुलूनी आभासास या
आपुलेसे रंग म्हटले, जे दिले जीवनास या
सुखे गिळतो झोळीतले हे, मी विखारी घासही...

प्रेम केले, प्रेम करीतो, प्रेमचि करणार मी
प्रेम माझे घेवोनिया तुझ्या गावी येणार मी
ओंजळीत घेईन तेथे, गौरवा रौरवासही... ○○

१९७१

## क्रंदन

लाव्हाळली धरती
धग कणात कणात
ओला चातकाचा डोळा
दृष्टी आकाशी शून्यात...

मेघ सावळा सावळा
धावा चालतसे आर्त
जीव तान्हेला तान्हेला
प्राण तृषार्त तृषार्त...

मेघ विरला विरला
सारं असार असार
प्राण विझला विझला
क्रंदत, तुषार, तुषार !...  ○○

१९७१

## नक्षी

तू दिलेले जपून ठेवले
ते गहीरे क्षण वेदनेचे
अेकांतात आसवांनी
ढेपाळते ढेकूळ मातीचे...

तरी मीही माझ्यापरी वाटतो
क्षण मधाळ हर्षाचे
तुलाच सांगतो तेव्हा असते
काळीज माझे दगडाचे...

अेकटेपणाचा अेकाकी भुंगा
पोखरतो काष्ट देहाचे
ते तकलादू झाले तरी
उरले काम नक्षीचे... ○○

१८ एप्रिल १९७१

# शून्य

शून्याचे हे विश्व शेवटी शून्य उरे अेकटे
शून्यावरती शून्य चढविते शून्याची का पुटे ?

हाती होते ते शून्यचि कळते
हात रिते तर शून्यचि असते
शून्य तेव्हा, शून्य आता, ओढ परी ना तुटे !

मी न माझा तर कोण माझा ?
अर्थ काय रे व्यर्थ जिण्याचा
ओंजळीतले शून्य गमते, शून्यचि मागे-पुढे !

ते शून्य अनंत आकाशाचे
त्यात शून्य हे बुडबुड्यांचे
शून्यापासूनी शून्य जन्मते, शून्य विरते कुठे ?

शून्याचा हा खेळ खेळूनी
काय साधिले न कळले कोणी
मुक्त कुणी ना शून्यापासुनी, गाठ तरी ना सुटे !

२७ एप्रिल १९७१

# हसणे केवळ वरवर असते

कुणी पाहिला पीळ तारेचा, सूर अैकता भान हरपते
कुणी शोधिला तळ मनाचा, हसणे केवळ वरवर असते...

धाव धावतो चारी वाटा
हसरा, फसवा असा मुखवटा
जरी निर्मितो आभास सुखाचा, घर व्यथेचे हृदयी असते...

विदुषकाचे चाळे करीतो
मौजमजेचे नाटक करीतो
खरे नाटक कोण पहातो, ते तर पडद्याआतच असते...

जीवन असते वैफल्याचे
काटे सलती वर शल्याचे
अंतर्यामी हिमनद आणि वरती उसनी खळखळ असते...

अशा व्यथेच्या कळा लपवूनी
कुणास्तव कुणी गातो गाणी
जरी दाखवी नशा जीवनी, आत बाटली खाली असते... ○ ○

२ मे १९७१

# पौर्णिमा

धुंद नयनी आणि वदनी लाजरा हा रक्तिमा
ये सखी, ये मज कळले आज आहे पौर्णिमा...

मी प्रतिक्षा करीत होतो प्रश्नभार हा घेऊनी
मोहळ ते उडूनी गेले दूर तू दिसताक्षणी
आलीस अैसी बावरी जणू अधिर आतूर संगमा...

पापण्या का मोडीती ते दूरदूरचे दिवे
काय त्यांनाही कळाले, तुला, मजला जे हवे
मूकभाषा शिकविली ही, कोणी त्यांना प्रियतमा ..

नवा उखाणा घालीतो का, हा दिवाणा गारवा
का स्पर्शाला हवा आहे आज बहाणा नवा
का मिसळता छायेत छाया, नभात हसला चंद्रमा... ० ०

९ मे १९७१

# वाटचाल

कुंद कुंद सुख दुःख
स्तब्ध झाले शब्द मूक
नसे दिन नसे रात
कसलीही मना भूक...

उर्मी अशी मनी थिजे
जीवनाला कसे वेधू
कडाक्याच्या गारठ्यात
जलस्पंदन लागे गोठू...

जीव जगतो, जगतो तरी
कश्यासाठी कोण जाणे
क्षितीजाचा कांठ हाती
सांग कोण धरू जाणे?...

जन्म, मृत्यू आदी अन्त
जीव झाला मध्ये दुवा
जन्मतो हा कश्यासाठी?
कश्यासाठी घेई विसावा?...

जीवनाच्या गर्भामध्ये
डोकावेसे वाटे मला
कोणत्या रे बीजापासूनी
हा वृक्ष असे बहरला? ..

जीवनाची चाहुल अशी
घेत, करीतो वाटचाल
अमृताची गोडी नुरे
सुखे पितो हलाहल... ○○

११ मे १९७१

# उमर खय्याम

जेव्हा तू आभास असतेस
अन् मीही केवळ भास असतो
तेव्हा अेका विरक्त फुलाचा
मनास भुलवणारा वास असतो...

तुला काही अर्थ नसतो
मीही केवळ व्यर्थ असतो
प्राणधारी उपमा लेवून
आपण देहधारी मर्त्य असतो ..

जवळ येणे, दूर जाणे
विरह कधी, वियोग होणे
पुढल्या जन्मी जवळ येता
पुन्हा असते तेच गाऱ्हाणे...

मग वाल्यावर वारूळ चढते
मग सिद्धार्थ वनात जातो
पण यशोधरेला काय सांगावं
असा मला प्रश्न पडतो...

नि माझं बळ अिथच सरतं
मी उमरखय्याम होतो
कोण सर्व ही हूल देतो
तुझ्या गात्री ती चाहूल घेतो... ○○

१७ जुलै १९७१

# प्रेमधर्म

का देहास झाकसी तू, का देह भगवा आहे ?
प्रभू पुढती वेड्या, तू नागवा आहे !

मन झाकसी कैसे, देहास पांघरोनी
तिथे वासनांचा, तर पारवा आहे

नागवाच येशी तैसा, नागवाच जाशी रे
व्यर्थ चिटोऱ्यांचा, हा गवगवा आहे !

सोंगात रंगसी का, विसरून मालकाला
हृदयांतरी तुझिया, जो चांदवा आहे

त्यागूनी मध फुलांचा, भुंगा भुग्यास पाडी
मंझिल दूर तैसी, दूर कारवां आहे

प्रेमात प्रभु राहे, जर प्रेमधर्म हा कळला
सूर्यंही तुझ्या पुढती, मग काजवा आहे. ००

२५ जुलै १९७१

# घरटे

सकाळी असते चिवचिव
दुपारी होते कावकाव
सायंकाळी पडत असतात
घावावर आणखी घाव !...

तेव्हा पंख असतात थकलेले
डंख असतात पेटलेले
प्रत्येकाची पिसे असतात
एक–दोन झडलेले !...

प्रत्येक घरट्यात असच असतं
दिसतं, कुठे दिसत नसतं
चोचीतलं फळ नेहमी
आंबट–चिंबट गोड असतं !...

मग डुलत झुलत रात्र येते
अन् पुन्हा जुळते नवे नाते
एक चोच दुसऱ्या चोचीत
विसावत नीज घेते...

मग एक मन एक तन
एक मत, एक दिल,
अशी रात्र सरते आणि
पहाटे पुन्हा किलबिल !...

१९७१

# देवाशप्पत आज किनई . . . !

माझ्यासकट आज मला खूप खूप विसरायचं आहे
देवाशप्पत आज किनई मला खूप हसायचं आहे !

पण काय केलं म्हणजे मग खरं हसू येतं हो
हसू नका मला जरा, थोडं काही सांगा हो !
पण ते कार्टून जोक्स सांगू नका, त्यानं हसू येत नाही
त्या जाडचारडचांना बोलवू नका, आता मी फसत नाही
मला किनई हरवलेलं आज काही शोधायचं आहे . . .

पत्त्यातील जोकराचा, पत्ता मला ठाऊक आहे
पण वरवर दात दाखविणं तिथेही घाऊक आहे
तसं बिचारं हसेन मी, पण मला अस्स नको
केवळ पास होईन मी पण मला तस्स नको
म्हणजे किनई मला अगदी तळापासून उमळायचं आहे . . .

लोक कसं काय हसतात हो ? तुम्ही कधी हसता का ?
मला तुम्ही पूर्वी तरी हसतांना पाहिलय् का ?
मी खूप खदखदायचे विस्तवावरही, कढीसारखा
अंग घुसळून खूप हसायचो वादळातही, झाडासारखा
मग आत्ता ते का जमत नाही, तेच मला जमवायचं आहे . . .

मला ते नाही आठवत हो मी कधी हसलो होतो
लोक काय फसवितात हो म्हणतात मी हसरा होतो
म्हणे काहीही झालं की उगाच खूप हसत होतो
काही नाही झालं तरी मजले उंच चढवित होतो
खोट्टं खोट्टं बोलतात तरी आज तस्सच वाग्गायचं आहे...

काय येऊन मिळालं म्हणजे रडणंही हसणंही होतं हो ?
काय सोडून गेलं म्हणजे हसणंही रडणंही होतं हो ?
असं काय झालं म्हणजे भरलेलं रितं होतं हो ?
किंवा कसं झालं म्हणजे रितं भरून जातं हो ?
नाहीतर हसणं माझं जिथ्थ गेलं, तिथ्थ मलाही जायचं आहे... ○ ○

७ ऑगस्ट १९७१

# कोजागिरी

घट दुधाचा शिरी घेऊनी राधा ठुमकत चाले
डुचमळले जे दुग्ध तयाचे आज चांदणे झाले

कृष्णनयना, आतुरमिलना, होत खुळी बावरी
राधा गवळण आज विसरली लाजलज्जा सारी

कृष्णवेडी कृष्ण शोधीते कृष्ण दिसावा कसा ?
कृष्णनेत्री कृष्ण असता जगास घेते वळसा

फेनधवल ही जरी वरूनी मन आतूनी काळे
कृष्ण वसतो तिथे म्हणूनी हृदयही काळे काळे

संमोहिते का अैकुन चालसी सूर बासरीचे
गे ! पहा हृदयी नासविते का घडे दुग्धाचे

आकाशी हे तुषार उडती त्याच का चांदण्या ?
की या असती कृष्णप्रितीच्या लावण्यमयी लावण्या ?

बिंदू बिंदू हे दुग्धाचे की अमृत प्रितीचे
की पूर्व रात्रीचे मधुकण हे मधूर चुंबनाचे

ओसांडतो उरी चंद्रघट परी भान राधेला नसे
पदर ढळता पुष्ट वक्षी दुग्धमेघ तो दिसे

कृष्णा का रे छळसी तिजला दे हाक सुरातूनी
का तिला चकवितो, उगा फसवितो खटयाळसे हसूनी

अरे उरी धरावी क्षणैक केवळ अशी कोजागिरी
मरणास निमंत्रूनी खुशाल म्हणावे, आता थांबव मुसाफिरी ! ○ ○

१५ सप्टेंबर १९७१

# नाते

मी नाते जोडीले . .
मी नाते जोडीले, कुठे रक्ताचे
कुठे मासांचे
कुठे वंशाचे
कुठे हाडाचे
कुठे नाळेचे
कुठे तनाचे
कुठे मनाचे
कुठे धनाचे
कुठे दिवसाचे
कुठे रात्रीचेही–मी नाते जोडीले

मी नाते जोडीले. . .
मी नाते जोडीले, कुठे ताऱ्याचे
कुठे वाऱ्याचे
कुठे हिऱ्याचे
कुठे पाऱ्याचे
कुठे काचेचे
कुठे वाचेचे
कुठे सुखाचे
कुठे दुःखाचे
कुठे वाटेचे
कुठे आडवाटेचेही,–मी नाते जोडीले

अेकदा आकाशात अेक चांदणीही नव्हती
आसमंतात काजळीची पेरणी झाली होती
तेव्हा या सोयऱ्यांची जमली होती
मजेत मैफील

मी जाताच, तोंड फिरवून, ओळख विचारून
प्रत्येकानं केले मला खजील !

मग मी हाडाला विचारलं,
मांसाला विचारलं,
रक्ताला विचारलं,
कायेला विचारलं,
वाचेला विचारलं,
तनाला विचारलं,
मनाला विचारलं
हृदयाला विचारलं,
विचारायचं त्या त्या प्रत्येकाला विचारलं

तेव्हा प्रत्येकानं सांगितलं,
तू अनोळखी आहेस,
सतावू नकोस फाजील !

अेव्हाना पहाटेचा तारा उगवला होता–
पश्चिम क्षितीजावर

आणि मी पिसाटून उपस उपस उपसत होतो–
रुपेरी रात्रीतील अंधार राशी

तेव्हा कळलं, माझ्या नात्याची होती, आहे अणि असेल,
केवळ छायाच माझी माझ्यापाशी

००

२ डिसेंबर १९७१

# जीवन

ज्योतीवर जो जळत नाही त्याला पतंग म्हणत नाही
झोकून जे दिलं नाही, त्याला जीवन म्हणत नाही...

हात आखडून घेतला तर हातांचा उपयोग काय ?
हातचं राखून ठेवलं तर हाताला करायचं काय
दोन हात दूर राहून हातभर बोलतात जे
इकडे तिकडे सावध पाहून हातवारे करतात जे
असे खोटे, थिटे हात कधी जिवन्त असत नाही ..

उगाच आपलं तोंडदेखलं काही काम करायचं
तोंडावर तोंड पडतं म्हणून राम राम म्हणायचं
कपाळावरच्या आठीला मात्र नेहमी जपत रहायचं
कुठं उगाच ताठर होऊन कुठं चुळबुळ करायचं
असं लाचारीच्या लाळेतील हसणं कधी खुलत नाही ..

जपून जपून तोल सावरून, माफक सारं करीत जाणं
अस्तित्वाला वेगळं ठेवून जगणं असं केविलवाणं
जेव्हढ्यापुरतं तेव्हढं असं त्रैराशिक मांडून जे
अलगसलग राहून उगाच येतात आणि जातात ते
अश्या डबक्यातील आंघोळीला पोहणं कधी म्हणत नाही...

अरे खड्डे, गड्डे खाच खळगे बेलाशक तुडवावे
काटेकुटे दगड धोंडे बेधडक उडवावे
भले तडे डोंगरकडे पायतळी ठेचावे
शीळ घालीत रानातून मस्तपैकी मिरवावे
असं तापून जे उजळत नाही, त्याला कांचन म्हणत नाही...

पाऊल असं टाकावं की काहीही मग खुशाल घडो
कुर्बान असं होऊन जावं लाखवेळा देह पडो
सुखाचे भरून पेले खुशाल ढेकर देत जावे
दुःखाच्या सुरईला बेगुमान रिचवित जावे
अरे, घोटभर पिण्याला पिणं कधी म्हणत नाही...

दिल खोलून हसावं दिल भरून रडावं
तळहाती धरावं दिल आपलं जाळावं
करायच जे काही इमानानं करावं
पात्र कसं नेहमी काठोकाठ भरावं
असं धनघन जीवन कधी उणंऋणं ठरत नाही...   ○ ○

१९७१

# आम्ही

कधीतरी, केव्हातरी, एखाद्या चुकार स्वप्ना तरी
– तुम्ही केलं होतं का अस्सं ?
आम्ही साक्षात घडविलं तस्सं !
तुम्ही कधीतरी दिला होता काय –
कुण्या कलेवराला –
कुडीतून काढून आपुला प्राण ?

की कुणाला अन्यायाच्या जोखडातून –
हाके सरशी करून मुक्त –
आणि छातीवर ओल्या जखमांची गौरवचिन्हे
स्वतःसाठी ठेवून फक्त –
केलत कधी स्वातंत्र्याचे महन्मंगल दान ?

बोला, समतेच्या गप्पा ठोकणाऱ्या वाचाळांनो,
कधीतरी तुमचा बिजागरीचा हात
चंदन होऊन झिजला होता का ?
गारठलेल्या रक्ताला ऊब देण्यासाठी –
कधीतरी तुमचा देह –
इंधन होऊन जळला होता का ?

बंधुत्वाचा फक्त गवगवा करीत –
जगाच्या उद्धाराचा आव आणीत –
भिन्न कातडीच्या पण सहोदराच्याच आतडीत
तुमच्या उदराचा जंत –
पोसत ठेवला तुम्ही – !
बोला, कुणासाठी तरी –
तुमच्या अितिहासाच्या अेखाद्या ओळीत तरी
कधीतरी धगधगला होता का वन्ही ?

अरे, मानभावीपणानं मानवतेला नेहमीच –
शस्त्रांनी जखमी केलं तुम्ही
आणि मानवतेच्या जखमेवर मनोभावे –
शस्त्रांनीच शस्त्रक्रिया केली आम्ही ! !

समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या वल्गना
करणाऱ्या दांभिकांनो –
हे आम्ही केलं. होय, आम्हीच !
आणि हे आम्ही करू शकतो – फक्त आम्हीच !

कारण –
प्रत्येक नव्या पहाटेचा नवा सूर्य
नेहमी पूर्वेलाच उगवला आहे –

– हे सत्य जाणून शांत असतो आम्ही
तर नेमकं हेच सोयिस्करपणे विसरून
स्वतःची अ–पूर्व दिशाभूल स्वतःच करता तुम्ही !! ○○

३ जानेवारी १९७२

# तफावत

अेक दिवस येण्याचा
अेक दिवस जाण्याचा
मधला दिवस असतो
प्रवासात कामाचा ..

अेक अंक सुरवातीचा
अेक अंक अखेरचा
नाटकातील मधला अंक
नाट्याच्या उत्कर्षाचा ..

अेक बाजू जमेची
अेक बाजू खर्चाची
जीवन म्हणजे तफावत
मधल्या आकडेमोडीची ... ○○

७ मार्च १९७२

# कळभोगी

नाही पाहीलीस
निघतांना वेळ
कोठूनिया आणू
जगण्याचे बळ ?

वेळात वेळ
निवडीली अवेळ
ठेवोनिया गेली
कळ केवळ...

आता कळभोगी काटा
फुलतो, फुलतो
फुलता फुलता
स्कुंदतो, स्कुंदतो– ! ○ ○

१८ मार्च १९७२

# खडा

हा निसर्ग– अफाट आहे !
हे विश्व– अमर्याद आहे !
जग– प्रचंड आहे !
देश– विशाल आहे !
गाव– मोठे आहे !
घर– वजनदार आहे !

अरे थांबवा, थांबवा हा पाढा, परवचा
थांबवा रे सारं !
मला पेलवत नाही !!
अरे, बारीक चाळणीतून गळालोय मी–
खड्यासारखा !

अेकटा ! अगदी अेकटा !!
–काय अेकटा ?
अरे नाही...नाही !
अजून कुणीतरी आहे– जो मला
पेलवत नाही !!
– कोण आहे ?
कोण आहे ?

अरे, हा आतून दार ठोठावणारा– कोण आहे ?
अरे हा बाहेर पहारा देणारा–
कोण आहे ?

कां हा अंतर्बाह्य व्याप्त अेकच अेक आहे ?
माझ्यासंगे आलेला ?
— लावा रे ! अजून चाळणी लावा !
वगळून टाका—या खड्यातील 'खड्याला'
खड्यासारखा ! !
बारीक चाळणीतून गळालेला
हा असीम, अनंत, चेतनाणू आहे !
बहुरुपी आहे
अरे पण बोचतोय् ना मला तो टाचणीसारखा !
पापणीतील खड्यासारखा !
अरे, वगळून टाका त्यालाही—
तोही मला पेलवत नाही !
अरे, तो माझ्यासंगे कां आला ?
सर्वांनी मला अलग तोडल्यावरही ?

आतापर्यंत तो कुठे होता ?
त्यानं काय पाहीलं !
कवटीच्या अंधार कोठडीत— ?
छातीच्या पिंजऱ्यात— ?
पोटाच्या भयाण भुयारात ?

काय मीच त्याला नकळत डांबलं होतं ?
आणि तरी हा जीवन्त !
मुक्त ! !
आणि मी मात्र बद्ध !
पाशयुक्त ! !

काय हा माझ्या कारागृहात नाही ?
मीच याच्या पिंजऱ्यात आहे ?

कुठेही गेलो तरी–
कसाही असलो तरी
अेकटं अेकटं म्हटलं तरी
याच्या सुक्ष्म वा
व्यापक पिंजऱ्यात ?

अरे, हाच तर तो नाही ना ?
तेहेतीस कोटी देवांना कारागृहात डांबणारा
रावणही–
ज्याला बंधनात जखडू शकला नाही तो ?
तर उलट ज्याच्या बंधनात राहूनच
मुक्त झाला तो ?

अरे, हाच तर तो नाही ना ?
देवकीच्या सात अर्भकांना क्रूरपणे यमसदनाला
पाठविणारा कंसही
–ज्याला नुसता स्पर्श
करण्यासही धजला नाही तो ?

माझ्यासंगे आलेला हा त्याचा अंशात्मक कण तर नाही ?
अरे ! तर मग चाळणी लावाच– !
वगळून टाका त्यालाही !
तोही मला पेलवत नाही
त्या तेजस्वी कणाची धग मला कणाकणानं जाळतेय् !

अरे, मला अजून गडद अंधारात घेऊन चला रे
कोणी !
मला अंधार भोगायचाय्
आणि या तेजस खड्यात तर भूतार्थ
मला वेडावित आहे ! !

अरे, वगळून टाका रे कुणीतरी
कुणातरी अेकाला
मला– अंधार खड्याला किंवा या खड्यातील
खड्याला– प्रकाशकणाला–तरी !
हा छाया प्रकाशाचा तमाशा पुरे
नाही का झाला ?
मला अेक तर असू द्या–गच्च अंधार
किंवा फक्त प्रकाश !
किट्ट काळोखात–
हे प्रकाशाचे कवडसे नकोत !
किंवा कवडश्यांच्या अदृष्य काठालगत
काळोखाचे कमी–अधिक ओझे नको

अरे, ही अशी भेसळ नको !
मला ही भेसळ पेलवत नाही !!
अरे लावा, अजून चाळणी लावा
भेसळ वगळून टाका !
खेड्यातील खड्याला–प्रकाश कणाला
वगळून टाका !
– काय ? असं वगळता येणार नाही ?
– तर मग मी मोकळा श्वास घेऊ शकणार
नाही !! ...
○ ○

१८ एप्रिल १९७२

# दुखणं

ज्याला मुळी अस्तित्वच नाही
जो जागा व्यापत नाही
त्याला बिंदू म्हणतात.

बिंदूची ही व्याख्या सारेच गृहीत धरतात
पण कधी सिद्धांतात जे साध्य असतं
ते सिद्ध करण्यासाठी—
तर कधी इप्सीत साध्याच्या सिद्धतेसाठी—

तर कधी बिंदूशिवाय सिंधूही सिद्ध करता
येत नाही म्हणून
कधी कधी रचनाकृतीत बिंदूला जागा
देतात.

— आता जर बिंदूचं अस्तित्वच नाकारतात
तर आकृतीत जागा कां देतात ?
आणि जर जागा देतात
तर अस्तित्व कां नाकारतात ?

तर म्हणतात, बिंदूचं स्थान बिंदूमात्र !
आणि काहीच नसणं
हेच बिंदूचं असणं आहे !

— तसंच या जगाच्या प्रचंड गर्दीमध्ये
मी बिंदूमात्रही नसून देखिल
कुठेतरी माझं 'असणं' आहे !
— आणि नेमकं हेच माझं 'दुखणं' आहे !

३० एप्रिल १९७२

# तू कणभर फुलता

तू कणभर फुलतां
मी मनभर फुलतो
तू क्षणभर हसतां
मी दिनभर हसतो...

तू बिंदूमात्र तोषतां
मी इन्दुपरी संतोषितो
तू थेंबभर भरतां
मी सिंधूपरी भरतो...

तू अल्पसीही झुमतां
मी उंच उंच झेपावतो
तू अेक रेखा रेखितां
मी इंन्द्रधनू चितारतो...

तू अेक ओळ गातां
मी गीत गीत गातो
तू अेक सूर छेडितां
मी सप्तसूर छेडितो...

तू रतिभर हर्षतां
मी अति अति आनंदतो
तू स्वल्पसीही सुखी होतां
मी किती किती सुखावतो...

तू अेक अश्रू ढाळता
मी सावन बरसतो
जखम होते तुज आणि
जखमी मात्र मी होतो... ००

१९७२

## छंद

वाट तुझी पहातांना डोळे वाटेला फुटले
शोध शोधतांना तुला चंद्रसुर्यही थकले...

वाट तुझी पहातांना नवी पालवी फुटते
कधी लवलवते पापणी केव्हा कुसळ सलते...

वाट तुझी पहातांना नेत्री प्राणांचा मेळावा
कधी स्पंदनात दंग कधी मूक मूक व्हावा...

वाट तुझी पहातांना आता आनंदी आनंद
वाट पहातांना जडला तुझ्या वाटेचाच छंद... ○○

मे १९७२

# आता नका विचारू

आता नका विचारू काहीच साहलेले
प्रथम पाहीले मला मी शांत झोपलेले...

आता नका विचारू ते सूर्य मारलेले
उल्का प्रवासी झाल्या अशनी विझलेले. .

आता नका विचारू ते शिल्प कोरलेले
हातात आज त्यांचे अवशेष लोंबलेले...

आता नका विचारू ते काव्य मंत्रलेले
पानावरूनी अर्ध्या शब्द उठलेले...

आता नका विचारू ते फेर गुंफलेले
अवघाच गर्भपात वस्त्र डागलेले...

आता नका विचारू ते मंथन रंगलेले
रत्नात अग्रगण्य मी विष प्राशिलेले...

आता नका विचारू ते चैतन्य चेतलेले
चिता रचून झाली प्रेत उचललेले... ○○

३ मे १९७२

## रूंझलेल्या डोळीयात

रूंझलेल्या डोळीयांचे पाझरणे थांबलेले
आत परि आसवांचे पूर आहे तुंबलेले...

डोळीयात जखमही बाहेरून सुकलेली
आत व्यथा वर्षावात ओलेती ही न्हालेली...

डोळीयांनी आता जरी सांजवात लावलेली
मळभाच्या सावटांची स्मृती आहे काजळेली...

डोळीयांना दृष्टी तरी बाहुली ही रुसलेली
जवळचे पाहीचना दूर दूर गुंतलेली...

डोळे जरी करितात स्मितासाठी कधी स्मित
व्याकूळती आठवून स्मितांचे ते जूने गीत...

पहातांना वाट डोळे दिनरात जागतात
गुंढाळावे अखेरीस पापण्यांच्या कफनात...

८ मे १९७२

# जाहला सूना पिंपळपार

उन्मळले हे जीवन अवघे, नसे कुठे आधार
जाहला सूना पिंपळपार !

या पाराची खटय़ाळ संगत
अवखळ गंमत, अविट रंगत
लावणीसह अभंगांची पंगत
पांगली ही सोबत रूतता, हृदयात कुठार !

पर्णांचे ते हळूच हसणे
अंकूरांचे किलबिल गाणे
डहाळीचे डुलणे–झुलणे
वादळात विकलांग जाहला, सूरांचा दरबार !

उरला केवळ अता सापळा
सोडूनी गेला हिरवा मेळा
जणू वैफल्याचा अिथे सोहळा
हे अंधाराचे झाड कोरितो, मनपक्षी सुतार ! ○○

मे १९७२

## खांद्यावरुनी ओझे

खांद्यावरूनी ओझे मी माझेच नेत आहे
रक्तात माखलेले हे माझेच प्रेत आहे...

निर्वासित जहाले सौभाग्य फुलण्याचे
ओसाड जाहलेले हे माझेच शेत आहे...

जगण्यात अर्थ नाही मरण्यात मुक्ति नाही
अधांतरी लोंबलेले हे माझेच भूत आहे...

संपर्क या जगाशी कोणताही नाही
वाळीत टाकलेले हे माझेच बेट आहे...

वैफल्य घेवोनिया छळण्यास स्वप्न आले
गर्भस्वप्नात नासलेले हे माझेच रेत आहे ..○○

१५ मे १९७२

# खांद्यावरूनी ओझे

खांद्यावरूनी ओझे  मी माझेच नेत आहे
रक्तात माखलेले  हे माझेच प्रेत आहे...

निर्वासित जहाले  सौभाग्य फुलण्याचे
ओसाड जाहलेले  हे माझेच शेत आहे...

जगण्यात अर्थ नाही  मरण्यात मुक्ति नाही
अधांतरी लोंबलेले  हे माझेच भूत आहे...

संपर्क या जगाशी  कोणताही नाही
वाळीत टाकलेले  हे माझेच बेट आहे...

वैफल्य घेवोनिया  छळण्यास स्वप्न आले
गर्भस्वप्नात नासलेले  हे माझेच रेत आहे... ○ ○

१५ मे १९७२

# ठिणगी

रानात असे दीप अेकला
मालवलेली ज्याची ज्योत
इवलीशी परि अजून आहे
ठिणगी वातेवरी खेळत– !

प्रकाशाशी कधीच तुटली
अवघी सुंदर नाती गोती
दीप जपतो ठिणगीला तरी
आणि तीही जळते कुणासाठी ?

कलंदर कुणी मुसाफीर
भटकला जर काळोखात
आधार शोधतांना त्यासी
दिसेल ठिणगीत–ज्योत !

पेटविल तो दीप तयाचा
प्रसन्न शीळ घालीत
विझता विझता ठिणगी
पाहील, दुजी दीपज्योत !

म्हणेल ठिणगी धन्यतेने,
'मी आज सूर्य झाल्ये
प्रकाशाशी माझे नाते
चिरंतन जुळले !' ○○

१७ मे १९७२

## माझं आहे

ते स्मशान माझं आहे
जिथं राखच राख आहे
कोपऱ्यात थोडी आग आहे
ते स्मशान माझं आहे...

ती रात्र माझी आहे
जिथं आसमंतात काजळी आहे
दूर चांदण्यांची डहाळी आहे
ती रात्र माझी आहे...

ती मरुभूमि माझी आहे
जिथं मृगतृष्णेची तप्तभूल आहे
दूर ओयासिस्‌चं सुंदर फूल आहे
...ती मरूभूमि माझी आहे... ००

१९ मे १९७२

# अजून

रे मुसाफिरा, मन विझेल तेव्हा विझू दे
पण जळतय् तर जळू दे
अजून ठिणगी पडू दे
अजून ज्वाला निघू दे
अजून वणवा भडकू दे !
तुझ्याच चितेच्या प्रकाशात
वाट शोधायची –
धमक तुझ्यात येऊ दे !

अरे, मनच मुळी असतं
ज्वलनशील !
ते जळत रहाणारच !
आणि अश्रू असतात
स्खलनशील !
ते गळत रहाणारच !

म्हणून काय –
यत्न करायचा
मन विझविण्याचा ?
विझेल, तेव्हा विझेल रे,
पण आज तर योग
जळण्याचा

आणि एकदा –
जळतांनाही हसून बघ,
तुला अर्थ उमगेल
जळण्याचा, हसण्याचा, जीवनाचा ! ○○

१९ मे १९७२

# कधीमधी

वाटे केतकी पर्णिकेचा –
गंध यावा कधीमधी
– डंख करावा कधीमधी...

वाटे चंदनचारोळीचा –
सोस धरावा कधीमधी
– घास घ्यावा कधीमधी...

वाटे सुवर्णमृगीचा –
शोध करावा कधीमधी
– वेध घ्यावा कधीमधी...

वाटे अग्नीशिखेचा –
पदर ढळावा कधीमधी
– अधर जळावा कधीमधी...

वाटे हिर्व्या चिंचेचा –
बहर झेलावा कधीमधी
– गर चोखावा कधीमधी...

वाटे रेशमी पटलाचा –
धागा उसवावा कधीमधी
– ठसा ठसवावा कधीमधी...

वाटे चैत्रचांदणीची –
मूस तापावी कधीमधी
– फूस लावावी कधीमधी...

वाटे निर्मळ नेत्रांनाही –
आमिष दाखवावे कधीमधी
– किल्मिष ठसवावे कधीमधी...

वाटे अधर अधरांना –
कावा शिकवावा कधीमधी
– चावा घ्यावा कधीमधी...

वाटे हिमानी हिमांगीला –
साज चढवावा कधीमधी
– डाग द्यावा कधीमधी...

वाटे कोण्या कवितेची –
खोज काढावी कधीमधी
– शेज करावी कधीमधी... ००

२१ मे १९७२

# दुःख माझे नाव

दुःख माझे नाव आणिक व्यथे माझी तू प्रिया
घेऊ पेले हे विखारी संगती झोकोनिया– !

तुला मजला नाही वाली कोणीही या जगती
लांछती ते आपुल्याला सारे सुखाचे सोबती
मी तुला आलिंगितो गे जग हे त्यागोनिया ! . . .

तृषित मी तुझ्यासाठी सखी तुजला शोधिले
संगतीने चालतांना मी शतदा चुंबिले
तू तरी त्यागू नको गे प्रीत ही फेकोनिया– ! . . .

कळते तेव्हापासुनि मी हृदयी धरीले तुला
फळशोभनात सखी सर्वस्व अर्पिले तुला
घे कसोटी अजूनही तू, घे कस लावोनिया– . . .

तुझ्याविना जीवन ओझे, शून्य रिते, अेकटे
ये अजूनी जवळी माझ्या का हे नाते विसरते
जन्मजन्मांतरी राहू बाहूत बाहू गुंफोनिया . . .

तुच्छति जे आपुल्याला ते सखी हे विसरले
आपणचि मार्ग त्यांना मंदीराचे दाविले
शापिले तर शापू दे तरी शाप हे झेलोनिया . .     ००

२७ मे १९७२

## दर्शन

तू अनामिका
मी अनामिक
तुझ्या गावीही नाही
तू दिला क्षण अेक...

मनी होता माझ्या
खिन्न खिन्न सूर
तुज बघूनी केवळ
त्याचा पालटला नूर...

तुझे नवथर वय
थोडे अिकडे-तिकडे
तुझ्या उत्फुल्ल ओठात
गीत गोड बागडे...

मुग्ध नेत्र तुझे
करीती स्वप्नसंग
त्याचे कपोली उठले
लाजरे रंग तरंग...

रूप नितळ कर्पूरी
थोडी गुलाबी झाक
निर्मळ हिमगौरीच्या
उरी अवखळ हाक...

सौंदर्य वेचता टिपता
तनमन गळते
अशा तरल क्षणात
विश्व विरघळते...

असे पाहीले मी तुला
तू पाहीलेही नाही
या प्रसन्न दर्शनात
मज गवसले काही...

माझ्या अंधार मनात
झुलले झुंबर
आरास देखूनी
झुमले अंबर...

माझ्या निबर मनाला
फुटला अंकूर
तू तुटल्या तारेत
भरला झंकार...

तू आवडलीस मला
तुज सांगू परी कसे ?
पंख माझे तुटलेले
तुला कोवळी कोवळी पिसे !

जा, जा अशीच तरंगत
फुलव कुणाचे घर
मी माझ्या घरापासून
फार ..फार दूर... !

१२ जून १९७२

# रात

रात –
मुग्धा. ऋतुवंता.
नयनी रूजले स्वप्न कोवळे –
चंद्राचे !

रात –
यौवना. ऋतुस्नाता.
चेहऱ्यावरती मुरूम उठले –
चांदण्यांचे !

रात –
प्रौढा. स्वप्नभग्ना.
मुरूमातून फुकट वाहले –
तारूण्य रात्रीचे !

रात –
वृद्धा. प्रीतदग्धा.
(तारूण्यपिटीका ? छे ! . . )
ते तर भासती फोड देवीचे –
निस्तेज चांदण्यांचे !

रात –
अभुक्ता. परित्यक्ता.
– अशी सरते रात
वाट पहात . . . !
– अशी सरते रात
वाट पहात . . . !

०० 

१३ जून १९७२

# त्रिशूळ

माणूस असतो अस्मानात –
अस्मानात असतात स्वप्न –
स्वप्नात असतात पंख –
पंखात असतात –
भूकेचे ठसठसणारे डंख !

अस्मान भूक शमवित नाही – !
स्वप्न भूक भागवित नाही – !
पंख भूक मिटवित नाही –
– ते तर नेतात उंचउंच,
अधांतरी वरवर –
मग माणूस उतरतो जमिनीवर – ! !

नंतर जमिन – अस्मानाचं समायोजन
– जे स्वप्नापासून दूर लक्षयोजन – !

तरी मस्तक असतं अस्मानात,
आणि धड जमिनीवर – !

– अेवढीशीच तर तडजोड – !
बारीकशी तर मोडतोड – ! !

तरी मस्तक करतं अस्मानात –
स्वप्नांचं रवंथ !
धड मात्र जमिनीवर –
भूक भागवितं संथ – ! !

पण – तडजोडीत भूक भागत नाही
तडफड काही सरत नाही

भूक पेटत असते – ज्वलंत –
आणि पायांना ओढते पाताळात –
मांड्यापर्यंत – !

– पुन्हा थोडीशीच तर तडजोड !
बारीकशी तर तोडफोड ! !

– पण पाताळात असतं काय ?
तरी पाताळ मात्र गिळतं पाय ! !

मस्तक तर उडालेलं –
असतच अस्मानात !
मांड्याही गाडल्या जातात –
खोल पाताळात – !

आणि धूड –
धुरकट धगधगतं जमिनीवर –
भूकेच्या वणव्यात – !

पण काहीही झालं –
तरी माणूस म्हणजे माणूसच !

माणूस असतो अस्मानात –
माणूस असतो पाताळात –
माणूस असतो जमिनीवर
त्रिशुळाच्या तीन पात्यावर –
तरी जीवन फिदा माणसावर – ! !   ० ०

१३ जून १९७२

# देह आणि आत्मा

तू जे बोलतोस
तेच तर मीही बोलत असतो

(फक्त फरक अितकाच असतो–)

तू अगदी 'तळापासून' बोलतोस
तर मी नुसता 'काठावरून' बोलतो–! ○○

१९७२

## ओल्या तंद्रीत

तू अैकव म्हणालीस,
म्हणून तुला,
अैकवित असता-
अेक कविता- !

तू ओल्या तंद्रीत-
का मिटलेस
हळूच डोळे- ?

तेव्हा.

- मी वाचत असता
तुझ्या डोळ्यात
माझी कविता- ! ○ ○

२१ जून १९७२

# कटीवस्त्रात कामिनी

कटीवस्त्रात कामिनी कटी केसरी कंचुकीत कुचकुंभ
कुंतलात कुरळचा का लपविशी केतकी मुखरंग
नेत्रकलशात लपविशी मदीरा लहरी ओठात गीतछंद
गे ! तुला न जमले परि लपविणे हा बहरगंध–धुंद !

लतिका न लपविते कधी पर्णांनी गोंडस गोड फुलोरा
प्रभा न छपविते कधी स्वयेंचि लोभस रंग पिसारा
भरवसा जरी तू ठेवूनी रमणी वसनावरती सारा
गे ! तुला न जमले तरी अडविणे मदनाचा हा वारा !

रक्षकही तो ठाऊक मजला ज्याचा गर्वोद्धत तोरा
सौंदर्याच्या खजिन्यावरती जो 'तीळ' करी पहारा
शापभ्रष्ट तो कारण काळा तू तरी दिला आसरा
तो गौरांग चुंबितो तुझे अहर्निश अन मला न देशी थारा !

वाटते तुझ्या त्या रक्षकासी ईर्षेने झुंजावे
जिंकावे अन् पराभूताचे मस्त चुंबन घ्यावे
परवशतेचे पाश कशाला सौंदर्यासी हवे
नवरसांना, नवरंगांना मुक्त द्वार व्हावे !

जखडशी का बंधनात तू रक्षकाच्या बरे ?
मी परवशतेचे पाश तोडीन हे वचन माझे खरे !
संकेतार्थ तव नेत्रपल्लवी वा अेक कटाक्ष पुरे
मी तळ्याकाठी उभा असूनी जलासाठी झुरे !

देह तुझा तर भासे मजला कोष रेशिमाचा
की त्यास म्हणावा रसरसलेला फेस सुवर्णाचा
की बांधा हा जणू कुणी बांधिला गुच्छ रश्मींचा
हा हृदयी धरुनी चुंबित जावा पंखा मोरपिसांचा !

धग न विझते प्रेमसिंचने आग उलट वाढते
प्रीतीचे ग गणित मोहीनी उफराटे असते
नियम नसती प्रेमाला परि अपवाद चोहीकडे
प्रेमिकांचे प्रलाप ऐकता प्रवाद दाहीकडे !

तू झोकावे, मी झेलावे, बाहूत तुला अलगद
वा हळुच उचलूनी उंच उडावे हाती धरुनी हात
स्वप्नांनी यावे पंख पसरुनी आकाशी तरंगत
तुझ्यासंगती रोजच यावी मनोज्ञ ही रंगत ! ○ ○

१४ जुलै १९७२

# ही रात्र रात्र वेडी

ही रात्र रात्र वेडी छेडीत तार आहे
हे गात्र गात्र वेडे झाले सतार आहे !

घेवोनि सोंग नुसते मी झोपलो जरी गे
रंगित स्वप्नियांचा नेत्री मिनार आहे !

मम जागता पहारा तुझिया घरासमोरी
उरला प्रहर अेक मध्ये दिवार आहे !

तुजला तरी कळावी ही स्पंदने मनाची
ये पांखरा उडोनी हृदयात प्यार आहे !

वा सांगून दे हवेला तू अेक शब्द नुसता
मरणास तो पुरेसा मज आधार आहे !

○○

२५ जुलै १९७२

# नागवा

मी जन्मलो तेव्हा नागडाच होतो !
–तुम्ही कसे होता ?

हसायचं असेल तर हसा !
'–पण काही माणसं तंतोतंत कपडे चढवूनच जन्माला
येत असावेत–'
...असं मला सारखं वाटतं, म्हणून विचारलं ! !
'–पण मी मात्र नागडाच होतो.

नंतर कुणीतरी मला हौसेने झबलं–टोपलं चढविलं
–का ते मला माहीत नाही.

पुढे माझ्यावर कपड्यांचे संस्कार केले.
–का ते मला ठाऊक नाही.

पण कुठे जरासा झालो उघडा
की कुणीही म्हणायचं–आहेस तू वेडा ?
नाही ना ? मग घाल कपडा !

कुणी असं का म्हणायचे
ते मला कळलं नाही !
...पण झालं काय ?
...कपड्यांनी मला अगदी जखडून टाकलं
–आणि मन पेटून उठलं !

मग त्यात काय, कसं काहीच कळलं नाही–
–झालो मी केव्हा नागडा !
आणि केव्हा किंचाळल्या दशदिशा, 'वेडा ! वेडा !'

–काही काळानं कानोकानी सर्वांना कळाली वार्ता.
–माझ्या पुनर्जन्माची !
–नेहमी प्रमाणे नवजन्माची कळावी तशी !

–तेव्हा सुसंस्कृत जग पुन्हा माझ्याकडे–
लगबगीनं घेऊन आलं–झबलं, टोपलं !

मी इतकचं म्हटलं,–मी तर वेडावाकडा !
राहू द्या ना नागडा !!
असाच उघडा !!

मग ते सुसंस्कृत जग–सुसंस्कृत असं
कायसं कुजबुजलं

–पुन्हा मी केवळ अितकच म्हटलं,–
समजा, मी अणीकुचीदार फत्तरांचा
काळा स्तंभ असेन–
– तर उगाच गिळगिळीत गिलावा करता कशाला ?
– चुन्याचा

समजा, मी असेन – टोकदार लोहखंड –
– तर उगाच मिळमिळीत मुलामा
चढविता कशाला ? – सुवर्णाचा !

– समजा, मी काटा असेन – तर, मऊशार
पाकळ्यांनी झाकता कशाला ?
आणि जर निवडुंग असेन –
तर उगाच बहर लादता कशाला ?

आणि ... आणि जर मी अमृत असेन –
तर विषकुंभात लपविता कशाला ?
किंवा मी जर तारा असेन –
तर कृष्णमेघात छपविता कशाला ?

– ... आता आहे, असंच जरा बरं वाटतं –
म्हणजे आपलं मोकळंचोकळं...
अस्सल नागडं उघडं
असंच वेडंवाकडं !
म्हणतात –,
म्हणतात आता सुसंस्कृत जगाला असं झालय् की,
मी मरतो केव्हा !
आणि माझ्या मढ्याला कपड्यांनी मढवून
त्याच्यावर ते कफन चढवितात केव्हा ! !

○○

२८ जुलै १९७२

# होईन म्हटलं

मोरपंख होईन म्हटलं
झालो काकपंख
माणिकमोती होईन म्हटलं
झालो सागरशंख...

इक्षुकांड होईन म्हटलं
झालो अेरंड
स्वर्णदंड होईन म्हटलं
झालो लोखंड...

मधुकुंभ होईन म्हटलं
झालो विषकुंभ
स्वप्नरंग होईन म्हटलं
झालो स्वप्नभंग...

बहर मी होईन म्हटलं
झालो पानगळ
निर्झर मी होईन म्हटलं
झालो हिमनद...

सायंतारा होईन म्हटलं
झालो मी निखारा
पहाटवारा होईन म्हटलं
झालो धुईधारा...

प्रेमगाथा होईन म्हटलं
झालो हृद्व्यथा
काव्यकथा होईन म्हटलं
झालो शब्द रिता...

○○

२ ऑगस्ट १९७२

# नाहीतर

तू आहेस–

नेत्रात – ओठात
मनात – हृदयात
शब्दात – कवनात
सूरात – स्वप्नात– !

पण आता तुला मूर्त शोधिन म्हणतो–

दारात – घरात
वनात – उपवनात
रस्त्यात – प्रासादात
मद्यालयात – मंदीरात
शिशिरात – बहरात
उन्हात – चांदण्यात– !

तू नाहीस – ते घर माझं नाही
ते मंदीर माझं नाही.

म्हणून आता तुला शोधिन म्हणतो– !

तू गवसायचं केलस
तर ठीक आहे.
–नाहीतर स्वतःला
गमाविन म्हणतो– ! !

२ ऑगस्ट १९७२

## पाटी

कोऱ्या पाटीवर–
लेखणीनं केला–
पहीला संस्कार–!
–देव आहे !

मी घरोघर सांगत सुटलो–!
देव आहे !
देव आहे !!
देव आहे !!

केव्हातरी, गिचमिड पाटीवर
लेखणीनं ओढला–
फंकराचा ओरखडा–!

मी शहारलो–!
ओरखडा किंचाळला–
देव कुठे आहे ?

मी घरोघर विचारीत सुटलो–
देव कुठे आहे ?
देव कुठे आहे ?
देव कुठे आहे ?

प्रथमही कुणी डोललं नव्हतं !
नंतरही कुणी बोललं नाही !!
–तरी सर्वजण पाट्या खरडण्यात
मात्र दंग होते–!

○ ○

७ ऑगस्ट १९७२

# कमळ

शेवाळ शेवाळ जळ
चिखलात गुंतलेली मुळं
पायतळ निरखित –
उगवले कमळ !

कमळ !
जणू कुण्या निसरड्या नेत्रात
पापणीच्या काठावर
कज्जलरेखेच्या देठावर
थरथरणारा निरागस –
थेंब नितळ – !

○ ○

९ सप्टेंबर १९७२

## माझे शब्द किती भोळे

माझे शब्द किती भोळे–
नवसूरांची पैंजणं लेवून...
नवार्थाची रांजणं भरून ..
धुंद नाचले जीवन्त होऊन !...

माझे शब्द किती भोळे–
माझ्यावर पूर्ण भाळून...
आले ते मोहिनी होऊन...
अेक आगळे स्वप्न घेऊन– !...

माझे शब्द किती भोळे–
खरंच–किती किती भोळे
माझ्या मस्तकावर हात ठेवून...
गेलेत माझा घात करून...
आयुष्याची राख करून– !... ○○

२७ सप्टेंबर १९७२

# ग़ज़ल

घे मिरवूनी चंद्रा तुझी राज्यद्वाही
रे ! प्रिया आज माझी मैफलीत नाही !

तू भिकारी जन्मजात व्यंग करिसी तशात
खरे, सवितास्त होता दीप गर्वात येई !

कलंकीत जरी तू यश हे मलीन
राव वनवासी होता रंक कैफात येई !

घे मजला छळूनि तुज संधी नामी
मी वियोगे व्यथित दे ही डौलात ग्वाही !

रे, तिला शोधितो मी, तिला शोधितो मी
ती हृदयी विराजे तरी नजरेत नाही !

रे गर्वोद्धता हे तुला काय ठावे ?
तिच्या स्पर्शात होते ते तुझ्या स्वर्गात नाही ! ००

१८ एप्रिल १९७२

## अक्षयी

या रात्रीच्या लक्ष चांदण्या
चंद्रकोर वरती
निष्प्रभ ठरल्या सखी तुझिया
अेक कटाक्षापुढती...

हास्यसुमने तू उधळता
वा नाजूक स्मित
काय म्हणूनी खिन्न जाहला
दारी पारिजात...

अर्धचाप तो आकाशातील
वैभव इंद्राचे
तुझिया गाली किती बहरती
रंग बहारीचे...

चंद्रिकाही व्याकूळ जाहली
कलेकलेने झिजते
अक्षयी तू, तुला पाहूनी
मनात ती झुरते...

शब्दांचे हे चकोर प्राशती
तुझे स्वरचांदणे
दोन दिवाणे डोलत गाती
अेक गोड गाणे...

शब्दामागुनी सूर येती
सूरामागूनी गाणे
शब्द माझे, सूर तुझे हे
शिल्प–लेणे देखणे...

अमृत स्वर्गी का पळाले
का न या जगती ?
कारण याचे काय असावे
सांग तूच अन्ती...! ○○

## वेणा

रक्ताळली कड क्षितिजरेखेची
जीवघेणी कळ नवनिर्मितीची...

भावभावनांचा उरात कल्लोळ
स्वररंग घेती मनात हिंदोल...

क्षण अेक अेक युगाच्या वेषात
तरी तरंगते सूर्य स्वप्न त्यात

'हुंकारतो' क्षण अद्वैताची कथा
हसे सारे विश्व हसे आणि व्यथा-! ○ ○

# आम्रतरूखाली

लकाकती दिवे गाव राही दूर
सुदूर चांदणे सभोती अंधार...

अेक भिकारीण दमली, शिणली
चालतांना वाट वेदनेत न्हाली...

गर्भार तरीही अेकटी अेकटी
शिणलेली काया विटकी विटकी...

लुळी भिकारीण कण्हत बसली
विसावली अन्ती आम्रतरूखाली...

जीवनमृत्युच्या उभी दालनात
राहीली बिचारी अशी हेलावत...

गर्भकोषातून डोकावला गर्भ
वेदनेस आज वेणांचाही गर्व...

चंद्रकोर नभी जशी डोकावली
लुळी भिकारीण प्रसूत जाहली...

परी वेदनांनी जाण हरपली
रक्त ठिपकले आम्रतरूखाली...

अजाण अर्भका शय्या रे पानांची
कोमल बालका इजा दुखण्याची...

डोळे मिटलेले हातपाय हाले
डहाळी, डहाळी आनंदात डोले...

बाळास देखण्या चांदणे रे आले
घरट्यात गोड रव रे घुमले...

वाऱ्यानं आणला क्षणी रानगंध
क्षण क्षण झाला क्षणी धुंद–फुंद...

ठिपके चांदणे आम्रपर्णातूनी
चुंबूनी अर्भका गाई गोड गाणी...

झुळूक फिरवी डोक्यावर हात
थरारे जावळ मंद चांदण्यात...

येई ओला ओला अर्भकाचा गंध
खूण निर्मितीची आनंदी आनंद...

दृष्य गोड गोड आम्रतरूखाली
नियतीच जणू प्रसन्न जाहली...

बाळाने फोडीला टाहो रे पहिला
साद रे कोवळा सर्वांना घातला...

हांक ती पहिली आम्रतरूखाली
अैकूनी ग्लानीत ममता जागली...

म्हणे, 'माझे बाळ किती हे सुंदर
नका लावू टक लागेल नजर' ..

विसरली सारे मागचे ते पाप
बाळास झाकीले चुंबूनी अमाप...

तीन काळ क्रूर सारे विसरली
जेव्हा भिकारीण प्रसूत जहाली...

वक्षास लाविले बाळ गोड सान
कौतुकाने दिले जरी स्तनपान ..

बाळ लोचीतसे कोरडे ते स्तन
क्रूर वर्तमान हसला भयाण...

काळ तो हसला निष्ठूर वदला,
"आणशिल चारा बाळाला कोठला...

भिकारीण तू ग सुंदर ही शिक्षा
पाहूनी तयाला मिळेल का भिक्षा...

दयेचा पाझर फोडावा लागतो
तेव्हा कोठे कोणी आणेली फेकतो...

नरकात सदा रहा तू पडून
दमडी फेकून जाती उद्धरून ...

मरशिल तूही पोर तुझे गुणी
सौंदर्याचा शाप तुज भिकारणी...

पाहूनी बाळाचे शरीर, सौंदर्य
माणसामधील जळेल औदार्य...

बोलता बोलता काळ क्रूर हसे
उपटली त्याने पाखराची पिसे...

बोल ते काळाचे मनी चक्रावले
जागे अनुभव सत्य प्रकटले...

होते मी सुंदर माझ्या बाळावाणी
कधी कधी सांगे आई ती कहाणी ..

बाप तुला नाही नव्हता निवारा
देह विटंबिला पापाचा आसरा...

घेऊनी हातात लाल लाल पळी
डागले तुजला केले मुली, लुळी...

'पांगळी' 'बिचारी' म्हणतात लोक
क्रूर खटाटोप मिळण्यास भिक...

हिच परंपरा कित्येक पिढ्यांची
हिच हीन तऱ्हा पोट जाळण्याची...

देवा कसे दिले फुटके हे कर्म
घडवी हातून अघोर अधर्म...

अशी माझी माय कधी कधी रडे
देवाच्या नावानं दाही बोटं मोडे...

मेली माझी माय सुटली बिचारी
देवा, माझी पाळी आणी लवकरी...

भिकारीण फिरे विचारचक्रात
भयंकर काही निश्चय मनात...

शहारले अंग मन थरारले
पाय अर्भकाचे दोन्हीही पिळले...

पांगळे ते मूल भिकारीण लुळी
फुलण्या आधीच नासली रे कळी...

तेव्हा चंद्रकोर फार विव्हळली
रात्रीनं दवांची आसवं ढाळली...

हा माणूसकीला कलंक लागला
सांगा अता तुम्ही गुन्हा कोणी केला...

काळा रक्तडाग थिजे तरूतळी
रडे भिकारीण आम्रतरूखाली... ○○

## मृगनक्षत्र

विश्वाचा साऱ्या होमकुंड केला
पेटविण्यासाठी सूर्य पुढे झाला...

पृथ्वीला सुटले भयाचे कांपरे
प्रीतीचे का झाले असे हे निखारे...

ओठाला पृथ्वीच्या पडली कोरड
पोळली काया पाण्याचीही रड...

उन्हाळी धुळीचे उडती केस
दीर्घ उसासे तोंडाला फेस...

रणरणत्या उन्हाचे तोंडावर फोड
अंगाअंगावर फुटले कोड...

तळ्यांचे गेले डोळे खोलखोल
सुकल्या सरिता कपोली ओघळ ..

उन्हाचे आसूड वाटेचे वळ
तारुण्याची तेव्हा थांबे सळसळ...

गालावरची ती मिटली लाली
फाटली कांती सुरकुती आली ..

हिरवा शालू झाला विटका
गेले रंगही मध्येच फाटका...

लहाकते ते वातावरण तप्त
दृष्टीपुढे नाचे अवतरण गुप्त...

राजकन्येची ती दिवाळखोरी
चिरयौवना दिसे म्हातारी...

सूर्य नभात सभा भरवी
पृथ्वी आरोपी फिर्यादी रवि...

निवाडा देण्या सप्तर्षि आले
बाकीचे तारे श्रोते बनले...

"नष्ट मी केले पृथ्वीचे यौवन"
बोलता झाला सूर्य संतापून,...

प्रेमात माझ्या पुत्र भागीदार
त्याच्यासाठी सदा ओला का पदर...

तेजस्वी पित्याचा मंद हा पुत्र
दोघे आवडती कैसे हे सुत्र...

बायको माझी प्रेमी तिच्या पोरा
दुर्लक्षिते मज असोनि नवरा...

स्वत:ला मोठी म्हणविते सती
घेते पोरा ओठी अतृप्त पति...

टाळूनी मजला पोरास चुंबिते
माझे रोज स्वप्न अर्ध्यात भंगते ..

त्याला पाहूनिया वात्सल्ये भरते
माझ्या दर्शनाने उगाच तापते...

दिवसा कामाचा असा भडिमार
रात्री पोराची चाले किरकिर...

त्याला खेळविते रात रातभर
म्हणून मी रात्री जातो घराबाहेर...

काय अशी असते सांगा पतिव्रता
तुम्हीच निवाडा करा सारे आता...

ऐकूनी फिर्याद मंडळी हसली
तारकांची तर पापणी लवली...

हसले अत्री हसले वशिष्ठ
तापला सूर्य झाला कोपिष्ठ...

सर्वास सोडूनी चालता झाला
बोलता पृथ्वी हुंदका आला...

"आधी मी माता नंतर कांता
जर मी चुकले क्षमा करा नाथा...

माणसे कसली गिधाडं मेली
बाणांची चोच बाळास टोचली...

चंद्राला माझ्या टोचली चोच
वाहिलं रक्त पडली खोच...

सारेच आता सुटले स्वैर
खाऊनी माझे धरीले वैर...

त्यास्तव मी रे अश्रू रोज ढाळी
देखूनी ऐसे कां फेकली जाळी...

तुझ्या मंदीराचा फेर नाही चुकला
कशासाठी देवा उगाच कोपला..."

"रडू नको पोरी सप्तर्षि म्हणती,
यौवन-प्रेम देईल पति..."

'थांबेल कसे अग्नीचे सत्र?'
ज्येष्ठात हसले मृगनक्षत्र...

हसली पृथ्वी हसला तान्हा
आकाशाला फुटता पान्हा... ००

# रे, हिमालया

रे, फेनधवल हिमालया,
मी करपलेला धुलीकण आहे ।
तुझं ते भव्य-दिव्य रूप-
तुझी ती उत्तुंग कैलास शिखरे-
असू देत तुझ्याजवळ- !

मी तर कुरुप-वेडा धुलीकण आहे !!
तरीही विसरू नकोस-
मी धुलीकण आहे पण-
वादळ भिनलेला
वादळानं झपाटलेला
आणि कधी कधी वादळानं झपाटलेला
धुळीकण-
उंच उंच जातो !
तुझ्या सर्वोत्तुंग शिखराग्रापेक्षाही...!
अर्थात् तसाच खालीही
घसरतो- !

कैलासाग्रापासून तो दरीच्या मुळापर्यंत
पाताळाच्या तळापर्यंत
-हे खरं !

पण अेकदा कां होईना
तो उंच उंच जातो हे ही खरं !!

रे अचल, अढळ हिमालया,
तू विशाल विराट आहेस !
-आणि मी तर अेक जलकण आहे !

हे गिरीराजा,
तुझे हे असंख्य महाकाय हिमनग
असू देत तुझ्याजवळच !
– मी तर अेक जलकण आहे !

तुझ्या गिरीशिखरांची मुळे पाताळात
गेलेली आहेत !
तर माझी मुळे मीच गिळलेली आहेत ?

त्या हिमशिखरांच्या स्थैर्याचा तू –
खुशाल, गर्व वहा !
पण अेक विसरू नकोस
ते स्थैर्य जडतेतून निर्माण झालं आहे
आणि माझं चांचल्य हे –
चेतनेचा आविष्कार आहे !
मी तुझ्या हिमखंडासारखा शुद्ध जड नाही !
वा बाष्पापरी मुक्त, विदेही चैतन्य नाही !

रे, जड आणि चैतन्याचं
सुंदर रसायन म्हणजे मी जलकण !
मी प्रवाही असणारच !

मी तसाच घसरणारच !
तुझ्या जडत्वाला त्यामुळे आनंद होणार असेल
तर जरूर होऊ दे
पण तो तुझा विजय मात्र खासच नाही !
– आणि माझा पराभव तर मुळीच नाही ?

अरे हिमालया
मी रसायनी जलकण – मी घसरणारच !
मी झपाटलेला धुलीकण – मी उंच उंच
उडणारच ! !

○ ○

१९७२

## 'भैरवी'

मैफील ही भैरवीत, विखुरते, अथे-तिथे
संपताच सूर हे, मी कुठे-तू कुठे...?

छेडिल्या अिथे कितीक, धुंद रागरागिण्या
त्याच जाहल्या नभात, आज चंद्र चांदण्या
पूर्वरंग स्वरखुणात, भासतो, अिथे-तिथे...

गाण्यास हवा रंग तसा, मैफीलीसही हवा
सूरस्पर्श तो तुझा, भैरवीसही हवा
गंध हवा भैरवीस, संगती, अिथे-तिथे...

मिलनगाणी गायिलेली, मी नव्याने अैकता
छेडीली विराणी, अता भैरवीत सांगता
कोण गातसे मनात, भैरवी, चहुकडे... ○ ○

३० जून १९७२

REFBK-0020720